CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीय तत्त्वज्ञानच संपूर्णतेची अनुभूती करून देते. हेच तत्त्वज्ञान सर्व मानव जातीला शांती आणि समन्वय देण्यास योग्य आहे. कार्यकर्त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी तत्त्वज्ञानाच्या मूळ विचाराला पुढे न्यावे. कोणतेही संघटन आपल्या कार्यकर्त्यांकडून शक्ती प्राप्त करते. संघटनेच्या सिद्धांताची परीक्षा त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या व्यवहारातून होते.

- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक


## महत्त्वाचे

### दुबईत 'तेजस' कोसळून वैमानिकाचा मृत्य

**दुबई :** दुबई येथे सुरू असलेल्या एअर शो दरम्यान शुक्रवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास कवायती सादर करण्यापूर्वीच भारतीय वायुदलाचे तेजस लढाऊ विमान कोसळले, त्यात वैमानिकाचा होरपळून मृत्यू झाला. या अपघाताच्या चौकशीसाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरीचा आदेश देण्यात आला. वायुदलाने या घटनेला दुजोरा दिला. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, दुबईतील एअर शोमध्ये तेजस लढाऊ विमान सहभागी झाले होते. कवायती करण्यासाठी ते अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आकाशात झेपावले, पण, ते खाली कोसळून स्फोट झाला. त्यानंतर लागलेल्या आगीत वैमानिकाचा मृत्यू झाला.


## कामगार क्षेत्रात क्रांतिकारी सुधारणा

# चार नवे कायदे लागू



नवीन कामगार सुधारणा कायदे स्वावलंबी भारताच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे विकसित भारत २०४७ च्या ध्येयाला नवीन चालना मिळेल. कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेला हा निर्णय भविष्यासाठी तयार असलेले कामगार आणि मजबूत उद्योगांसाठी सहाय्यक ठरेल. कामगारांना सुरक्षा हमी देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला.

**- मनसुख मांडविया** | केंद्रीय कामगार मंत्री



आमच्या सरकारने चार सुधारित कामगार कायदे लागू केले. स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हितासाठी हा सर्वात मोठा निर्णय आहे. यामुळे देशातील कामगारांना मोठ्या प्रमाणात सक्षमता मिळेल, तसेच व्यवसाय सुलभतेला देखील चालना मिळेल. सामाजिक सुरक्षा, वेळेवर वेतन आणि सुरक्षित कार्यस्थळ सुनिश्चित करण्यासाठी सुधारित कायद्यातील तरतुदी महत्त्वाच्या ठरतील.

**- नरेंद्र मोदी** | पंतप्रधान

**● २९ जुने कायदे एकत्र करीत नवीन कायदे ● ४० कोटी कामगारांना मिळणार लाभ**

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने शुक्रवारी ऐतिहासिक निर्णय घेत चार क्रांतिकारी कामगार कायदे देशात लागू केले. हे चार कायदे आजपासून अधिसूचित करण्यात आले, असे केंद्रीय श्रममंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले.

केंद्र सरकारने आज अधिसूचना जारी केल्यामुळे वेतन संहिता-२०१९, औद्योगिक संबंध संहिता-२०२०, सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, स्वास्थ्य आणि कार्यपालन संहिता-२०२० या नव्या कायद्याच्या जागेवर चार सुधारित कायदे देशात लागू झाले आहे. देशातील ४० कोटी कामगारांना या नव्या कायद्याचा लाभ मिळणार आहे.

देशातील वेगवेगळे २९ जुने कायदे एकत्र करीत हे चार नवीन कायदे तयार करण्यात आले, याकडे लक्ष वेधत मांडविया यांनी म्हटले की, हे चार नवीन कायदे देशात लागू झाल्यामुळे कामगारांच्या जीवनात आमूलाग्र असे बदल होणार असून, त्यांचे जीवनमान उंचावणार आहे.

या चार नव्या कायद्यांतून कामगारांना वेळोवेळी किमान वेतनाची हमी मिळेल, यामुळे त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य येईल, तरुणांना नियुक्तीपत्राची हमी मिळेल, यामुळे त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होईल. महिलांना समान वेतन आणि कार्यक्षेत्रात सन्मानाची वागणूक मिळेल. यामुळे कार्यक्षेत्रात लैंगिकतेच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाला आळा बसेल. एवढेच नाही तर, देशातील ४० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षेची हमी मिळणार आहे.



**कामगारांचे जीवनमान बदलणार**
(वृत्त पान ३ वर)

निश्चित अवधीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांना एक वर्षानंतर भविष्यनिर्वाह निधी आणि ग्रॅच्युटीची हमी, ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वर्षातून एकदा नि:शुल्क आरोग्य तपासणीची हमी, अतिरिक्त वेळेत (ओव्हरटाईम) काम केले तर दुप्पट पगाराची हमी मिळणार आहे. धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना १०० टक्के आरोग्य सुरक्षेची हमी तसेच आंतरराष्ट्रीय मानकानुसार कामगारांना सामाजिक सुरक्षेची हमी या चार नव्या आणि सुधारित कायद्यातून मिळणार असल्याचे मांडविया यांनी सांगितले.

हे साधारण बदल नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगार क्षेत्रात व्यापक कल्याणासाठी केलेले महत्वपूर्ण असे बदल असून यामुळे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपली अधिक वेगाने वाटचाल सुरु होणार असल्याचे मांडविया यांनी सांगितले.

देशातील बदलत्या परिस्थितीशी देशातील जुन्या कामगार कायद्याची सांगड घालण्यासाठी तसेच कामगारांच्या व्यापक कल्याणाच्या दृष्टीने अनेक आवश्यक सुधारणा या कायद्यातून करण्यात आल्या असल्याचे मांडविया यांनी स्पष्ट केले. *(तभा वृत्तसेवा)*

# डीपीसी निधीवरून खा.प्रणिती शिंदे यांचा पालकमंत्र्यांवर हल्लाबोल

### निधीसाठी टक्केवारीचा आरोप; आ.कोठेंकडून जोरदार प्रत्युत्तर



**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

डीपीसी म्हणजेच जिल्हा नियोजन समितीमधून महाविकास आघाडीच्या खासदारांना निधी मिळत नसून निधी देण्यासाठी टक्केवारीची अपेक्षा केली जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांनी थेट पालकमंत्र्यांवर केल्याने राजकारण तापले आहे. भाजपाचे आ. देवेंद्र कोठे यांनीही खा. शिंदे यांना जोरदार प्रत्युत्तर देताना जिभेला हाड नसल्याचे शिंदेंनी सिध्द केल्याची टिका केली आहे.

डीपीसीच्या निधीवरून खा. प्रणिती शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना थेट टार्गेट केले आहे. एका कार्यक्रमात खा. शिंदे म्हणाल्या आहेत की, एवढे पालकमंत्री बघितले पण कोणत्याही पालकमंत्र्यांनी डीपीसीचा निधी थांबवला नाही. खा. ओमराजे निंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते-पाटील आणि माझा निधी थांबवला, कारण आमच्याकडून टक्केवारी मिळत नाही. किती खालच्या पातळीचे राजकारण केले जात असल्याचे सांगत खा. शिंदे यांनी खंत व्यक्त केली. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या विरोधात आपण न्यायालयात दाद मागणार आहोत, असेही खा. शिंदे म्हणाल्या. खा. शिंदे यांनी थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप केल्याने सोलापूरचे राजकारण तापले आहे. खा. शिंदे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना भाजपाचे आ. देवेंद्र कोठे म्हणाल की, पालकमंत्री यांच्यावर टक्केवारीचा आरोप करून खा. शिंदे यांनी पुन्हा एकदा सिध्द केले आहे की त्यांच्या जिभेला हाड नाही. पालकमंत्र्यांनी सर्व तालुक्यांना भरघोस निधी दिला आहे. या उलट महाविकास आघाडीचे सरकार असताना देत नव्हते यावर खासदार उत्तर देत नाहीत. केवळ त्यांच्या लेटरहेड पत्रावर निधी मिळत नसल्याने ते खोटे आरोप करीत असल्याचा टोला आ. कोठे यांनी लगावला आहे.

**थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप**

जिल्हा नियोजन समिती म्हणजेच डीपीसीमधून शेकडो कोटींचा निधी जिल्हयासाठी खर्च केला जातो. एका खासदारांनीच थेट पालककमंत्र्यांवर निधीसाठी टक्केवारीचा आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. शासकीय कामासाठी चिरिमिरी जनतेने ऐकली होती. शासनाच्या विविध खात्यांमधून ठेकेदारांना कामे देताना टक्केवारीची चर्चा लोकांनी ऐकली होती. पण एका खासदाराने थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप केल्याने सामान्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# पंतप्रधान मोदी आफ्रिकेत दाखल

◆ **जोहान्सबर्ग, २१ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जी-२० शिखर परिषदेसाठी शुक्रवारी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे आगमन झाले. यावर्षीची जी-२० शिखर परिषद दक्षिण आफ्रिकेत आयोजित करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान दक्षिण आफ्रिकेत असतील.

परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान तीन मुख्य सत्रांमध्ये संबोधन करणार आहेत. शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधान मोदी अनेक देशांच्या नेत्यांसोबत वैयक्तिक चर्चा करणार आहेत. ते भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका देशांच्या बैठकीला देखील उपस्थित राहणार आहेत. २०१६ मध्ये द्विपक्षीय भेट आणि २०१८ आणि २०२३ मध्ये झालेल्या दोन ब्रिक्स शिखर परिषदांनंतर, मोदींचा हा दक्षिण आफ्रिकेचा चौथा अधिकृत दौरा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जी-२० शिखर परिषदेवर बहिष्कार घातला आहे. या परिषदेला अमेरिकेचे कोणतेही अधिकारी उपस्थित नाहीत. *(वृत्तसंस्था)*

# मालेगावमध्ये आंदोलकांचा कोर्टात शिरण्याचा प्रयत्न

### तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून हत्या; आरोपीला फाशी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**नाशिक, दि. २१ नोव्हेंबर-**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव ३ वर्षीय चिमुरडीवरील बलात्कार व हत्येच्या प्रकरणामुळे होरपळून निघाले आहे. या घटनेच्या निषेधार्थ येथील नागरिकांनी शुक्रवारी मालेगाव बंदची हाक देऊन मोर्चा काढला होता. पण मोर्चेकऱ्यांनी थेट स्थानिक न्यायालयाच्या इमारतीत शिरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केल्यामुळे हे प्रकरण चांगलेच चिघळले आहे.

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात एका ३ वर्षीय मुलीवर गावातीलच विजय संजय खैरनार नामक आरोपीने पाशवी बलात्कार केला होता. त्यानंतर दगडाने ठेचून तिची निर्घृण हत्याही केली होती. या प्रकरणाचे सध्या राज्यभरात संतप्त पडसाद उमटत आहेत. या प्रकरणी नागरिकांनी शुक्रवारी मालेगाव बंदची हाक दिली होती. त्याला व्यापारी संघटना, शाळा व महाविद्यालये, विविध सामाजिक व राजकीय संघटनांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या प्रकरणी रामसेतू पुलावरून एक मोर्चाही काढण्यात आला. त्यानंतर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चकऱ्यांनी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

पोलिसांनी प्रसंगावधान राखून मोर्चेकऱ्यांना न्यायालय परिसरात प्रवेश न करता आपल्या मार्गाने जाण्याचे आवाहन केले. पण मोर्चेकऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. अखेर परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी त्यांच्यावर सौम्य लाठीमार केला. हे पाहून मोर्चेकऱ्यांची एकच धावपळ उडाली. या घटनेत काही जण किरकोळ जखमी झाले. या घटनेनंतर शेकडो मोर्चेकरी कोर्टाच्या परिसरात जमले होते. तिथे त्यांची आणखी समजूत काढण्याचा प्रयत्न केला गेला. या घटनेनंतर कोर्टाचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या प्रकरणातील आरोपीची ५ दिवसांची पोलिस कोठडी काल संपुष्टात आली होती. त्याला कोर्टात सादर करत असताना संतप्त महिलांनी पोलिसाना गराडा घातला. यामुळे बाका प्रसंग उद्धवला होता.





**आरोपीची बाजू एकही वकील मांडणार नाही : दादा भुसे**

मोर्चाला मार्गदर्शन करताना राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शहरातील एकही वकील आरोपीची बाजू मांडणार नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, मालेगावच्या वकील संघाने बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीची बाजू कोर्टात न मांडण्याचा निर्णय घेतला आहे. आरोपीची पोलीस कोठडी संपलेली असताना आपले डीवायएसपी बाविस्कर यांनी न्यायालयीन कोठडीची मागणी केली, हे निषेधार्थ आहे. त्याचा मी धिक्कार करतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी या प्रकरणाची दखल घेतली. त्यांनी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची भूमिका घेतली असताना डीवायएसपींनी न्यायालयीन कोठडी मागितली. हे कुणाच्या सांगण्यावरून केले? असा संतप्त सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

**भरचौकात फाशी द्यावी : ज्योती वाघमारे**

पिडित कुटुंबांचे सांत्वन करण्यासाठी गेलेल्या शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, सांत्वनाला आले पण माझ्याकडे शब्दच नाहीत. लोक म्हणतात नराधमाला आमच्या ताब्यात द्या ठेचून मारू. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत आम्ही मुख्यमंत्र्यांकडे मागणी करू की, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा. या वेदनादायी प्रकरणात कायदा बाजूला ठेवून आरोपीला भरचौकात फाशी दिल्यास असे धाडस दुसरे कोणी करणार नाही. बालक व मुलींच्या अशा केसेससाठी फक्त एक कोर्ट असावे, असेही वाघमारे म्हणाल्या.









# पंढरपुरात नगराध्यक्षपदासाठी दुरंगी तर नगरसेवकपदासाठी सरळ लढत

## उमेदवारी अर्ज माघारी नंतर चित्र झाले स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी शुक्रवारी (ता.२१) उमेदवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे उमेदवारी अर्ज माघारी नंतर निवडणूकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. बऱ्याच प्रभागात सरळ लढती आहेत तर नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढतच रंगणार आहे. कारण विठ्ठल साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून सारिका राहुल साबळे यांना नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी देवु केलेली होती. मात्र साबळे यांनी आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी अखेरच्या क्षणी मागे घेतला. त्यामुळे नगराध्यक्षपदाची लढत तिरंगी ऐवजी आता दुरंगीच होणार हे स्पष्ट झाले आहे.

उमेदवारी अर्ज माघारीनंतर रिंगणातील उमेदवारांची पक्षनिहाय, प्रभागा नुसार अंतिम यादी अशी : प्रभाग क्रमांक १ (अ) - संतोष गोरख धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), दत्तात्रय तुकाराम काळे (अपक्ष), लखन मधुकर चौगुले (अपक्ष), शंकर एकनाथ चौगुले (अपक्ष), लखन जंबू चौगुले (भाजपा), अक्षय ज्ञानेश्वर आदलिंगे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १ (ब)** - सुरेखा भारत धोत्रे (अपक्ष), प्रज्ञा पृथ्वीराज भोसले (अपक्ष), मंदा शिवाजी धोत्रे (नँशलिस्ट काँग्रेस पार्टी), अर्चना गणेश शिंदे (भाजपा),

**प्रभाग क्रमांक २ (अ)** - मयुर भारत भिंगे (भाजपा), शुभम संजय पवार (अपक्ष), प्रसाद प्रकाश कळसे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , श्रीनिवास धनंजय बोरगावकर (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर) .

**प्रभाग क्रमांक २ (ब)** - अदिती अमित डोंबे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), प्रणिता किरण घाडगे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) ,विणा सागर यादव (अपक्ष), श्वेता निलराज डोंबे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ३ (अ)** - तेजश्री रोहित पानकर (भाजपा), हर्षदा अमित माने (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), राजश्री प्रताप गंगेकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) .

**प्रभाग क्रमांक ३ (ब)** - संदीप अशोक शिंदे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), वैभव ज्ञानेश्वर फसलकर (अपक्ष), श्रीनिवास राजाराम उपळकर (अपक्ष), कृष्णा दशरथ कवडे (भाजपा), सतीश चंद्रकांत गांडुळे (अपक्ष), संजयकुमार आत्माराम ननवरे (नँशलिस्ट काँग्रेस पार्टी), अक्षय प्रताप गंगेकर (तिर्थक्षत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक ४ (अ)** - विनायक कुमार संगितराव (भाजपा), धनंजय दशरथ कोताळकर (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ४ (ब)** - प्रियांका सागर तारापूरकर (भाजपा), पुनम साईनाथ अभंगराव (अपक्ष),

**प्रभाग क्रमांक ५ (अ) -** कुसुम जगन्नाथ परचंडे ( भाजपा, बिनविरोध)

**प्रभाग क्रमांक ५ (ब)** - सुमित संभाजी शिंदे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), मुकुंद मोहन उत्पात (अपक्ष), श्रीकांत विठ्ठल हरिदास (भाजपा), ओंकार अभय जोशी (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ६ (अ)** - दिवाकर दिगंबर सर्वगोड (तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), सुजितकुमार एकनाथ सर्वगोड (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर), यशोधरा वसंत कांबळे (अपक्ष), दीपक राजाराम नाईकनवरे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ६ (ब)** - अमृता अर्जुन माळवदे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), रेहाना इब्राहिम बोहरी (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर), हुमा मलिक मुजावर(श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर ), भाग्यश्री परसू पवार (अपक्ष), वर्षा विशाल ऐदाळे (अपक्ष), लक्ष्मी चंद्रकांत कदम (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ७ (अ)** - शिला शरद माने (भाजपा), सुनंदा ओदुंबर बोडके (तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर), श्रध्दा शेखर भोसले (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ७ (ब)** - अपिलात गेल्यामुळे निर्णय बाकी

**प्रभाग क्रमांक ८ (अ)** - वर्षा पांडुरंग चौधरी (अपक्ष), वैष्णवी वैभव बडवे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , मनिषा धनंजय देशपांडे (भाजपा), अर्चना सुधीर थिटे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), रेखा दत्तात्रय अदापुरे (अपक्ष).

प्रभाग क्रमांक ८ (ब) - धनंजय मोहन मोरे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), सुनील भाऊसाहेब डोंबे (अपक्ष), संतोष लक्ष्मण कवडे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर),प्रदीप दिलीप पवार (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ९ (अ)** - सविता अशोक करकमकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), प्रतिक्षा विक्रम शिरसट (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ९ (ब)** - श्रीकृष्ण महादेव परचंडराव (अपक्ष), संदिप पांडुरंग अधटराव (भाजपा),

**प्रभाग क्रमांक १० (अ)** - साधना सुधीर धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , उषा अरुण मंजरतकर (भाजपा), भगीरथी अनिल पवार (अपक्ष), प्रीती कुमार बंदपट्टे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १० (ब)** - वैभव शहाजी भोसले (भाजपा), संजय जवाहरलाल बंदपट्टे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक ११ (अ)** - आरती बळीराम बनसोडे (अपक्ष), वैशाली प्रकाश लोखंडे (अपक्ष), अनिता सिकंदर ढवळे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ११ (ब)** - प्रशांत शिवाजी मलपे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), राजेंद्र पवार (अपक्ष), नागेश प्रकाश पवार (अपक्ष), बालाजी अरुण मलपे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १२ (अ)** - शांताबाई माणिक काळे (अपक्ष), निता शामराव पडगळ (अपक्ष), निता नितीन परचंडे (भाजपा), मिनाक्षी दिगंबर चोरमले (अपक्ष), उमा ओदुंबर शिंदे (अपक्ष), पुनम युवराज भोसले (तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक १२ (ब)** - राजसिंह सत्यवान डुबल (अपक्ष), अमर वसंत सुर्यवंशी (अपक्ष), अभिषेक बाळासाहेब सावंत (अपक्ष), सचिन नंदकुमार कदम (अपक्ष) , विशाल दगडू मलपे (भाजपा), प्रशांत गणपत शिंदे ( तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर),प्रशांत गणपत शिंदे (अपक्ष) विक्रांत सज्जन आसबे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १३ (अ)** - रुक्मिणी धनाजी धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), अर्चना नवनाथ रानगट (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १३ (ब)** - गुरुदास विवेक अभ्यंकर (भाजपा), नागेश आण्णासाहेब भोसले (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक १४ (अ)** - शैलजा बाळासाहेब कसबे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , उज्वला म हादेव भालेराव (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १४ (ब)** - महादेव माणिक धोत्रे (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी), सुधाकर रामदास बंदपट्टे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १५ (अ)** - आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), धर्मराज आण्णाप्पा घोडके (भाजपा) ,प्रेम अनिल धोत्रे (श्री विठ्ठल परिवर्तन आघाडी ).

**प्रभाग क्रमांक १५ (ब)** - स्मीता आदित्य फत्तेपूरकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी ), चारुशीला गिरीश कुलकर्णी (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी), अश्विनी विवेक परदेशी (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १६ (अ)** - शिवाजी ज्ञानेश्वर मस्के (अपक्ष), अमोल विठ्ठल डोके (भाजपा), रामचंद्र दिगंबर राऊत (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १६ (ब)** - प्रमिला अरुण कबाडे (अपक्ष), मोनिका निलेश शिंदे (अपक्ष), रेश्मा शैलेंद्र घोगरदरे (अपक्ष), संध्या मालोजी शेंबडे (भाजपा), सुनिता ओदुंबर घुले (अपक्ष), प्रियंका विशाल राऊत (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १७ (अ)** - लोकेश नागनाथ यादव (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), अंबालाल किसन दोडिया (भाजपा), अमोल सुरेश घोडके (अपक्ष), किशोर महादेव खिलारे (अपक्ष), बादल शामराव यादव (अपक्ष), अमित दुर्योधन अवघडे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १७ (ब)** - प्रभावती दिगंबर सुडके (नँशलिस्ट काँग्रेस पार्टी), माधुरी दिलीप धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), आरती सागर चव्हाण (अपक्ष), अमृता विदुल अधटराव (अपक्ष), रसिका अशोक काळबांडे (अपक्ष), लता संजय निंबाळकर (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १८ (अ)** - विनायक बसवेश्वर देवमारे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), पिराजी लक्ष्मण धोत्रे (अपक्ष), सचिन सुरेश बंदपट्टे (अपक्ष), मुजिब सलीम तांबोळी (अपक्ष), शंकर सुभाष सुरवसे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १८ (ब)** - अर्चना काशिलिंग डोईफोडे, कविता मच्छिंद्र जाधव (अपक्ष), ज्योती अशोक शिंदे (भाजपा), संगीता अंगद धुमाळ (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

( अर्ज माघारी नंतर नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची अंतिम यादी ) - जैतुनबी अब्दुलरौफ मुलाणी (अपक्ष), प्रणिता भगिरथ भालके (तीर्थक्षेत्र विकास आघाडी पंढरपूर) , कांचन तुळजाराम बंदपट्टे (अपक्ष), शामल लक्ष्मण शिरसाट (भारतीय जनता पार्टी ), भारती राजू शिंदे (वंचित बहुजन आघाडी).

### सारिका साबळे यांची माघार

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून सारिका राहुल साबळे यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेला होता. मात्र त्यांनी आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी मागे घेतला. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठी शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर ) विरुध्द प्रणिता भगिरथ भालके यांच्या मध्येच खरीतर आता दुरंगी लढत होणार आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या लढती मध्ये शिरसट की भालके बाजी मारणार याकडे संपुर्ण पंढरपूरकरवासियांचे लक्ष लागले आहे.

# मोहोळमध्ये नगराध्यक्षपदासाठी ११ जण तर नगरसेवक पदासाठी ९७ जण रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२१ नोव्हेंबर-**

मोहोळ नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवकासाठी लागलेल्या निवडणुकीत आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी २८ नगर सेवक पदाच्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्याने आता नगरसेवक पदासाठी ९७ उमेदवार रिंगणात उभे आहेत. तर जनतेतून निवडल्या जाणाऱ्या महिला नगराध्यक्ष पदासाठी ११ महिला उभ्या राहिल्या आहेत.

नगराध्यक्षपदासाठी शीतल सुशिल क्षिरसागर भाजप, उज्वला अमर कांबळे, (शिवसेना ठाकरे गट) , सिद्धी राजू वस्त्रे शिवसेना (शिंदे), सोनल विठ्ठल जानराव (राष्ट्रीय काँग्रेस आय), अश्वीनी संदीप जाधव (राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट), सखुबाई तुकाराम क्षिरसागर (वंचीत बहुजन आघाडी), मुक्ता अमोल खंदारे, प्रिती राजेंद्र घाडगे, शुभांगी नागनाथ क्षिरसागर, आरती राजरत्न क्षिरसागर, अंजली अशोक वस्त्रे (अपक्ष) आदी ११ उमेदवार नगराध्यक्षपदासाठी नशीब अजमावत रिंगणात उतरले आहेत .

नगरसेवक पदासाठी भरलेल्या उमेदवारी माघारी घेणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपाचे नूतन जिल्हा चिटणीस महेश सोवनी,उबाठा शिवसेनेचे माजी शहर प्रमुख विक्रम पंडित देशमुख, भारतीय मजदूर संघाचे तालुकाध्यक्ष मच्छिंद्र गाडे पाटील शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख दीपक गायकवाड यांचे चिरंजीव शिवरत्न गायकवाड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्ष यशोदा कांबळे आदींसह २८ जणांनी अर्ज माघारी घेतले..

# अबब! शहरात ५० हजार मोकाट कुत्रे ?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

शहरात गेल्या काही वर्षात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली तरी महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सध्या शहराच्या गावठाण-हद्दवाढ भागांत सुमारे ५० हजारांहून अधिक मोकाट कुत्र्यांचा वावर असल्याचे चित्र आहे.

या मोकाट कुत्र्यांमुळे शहरवासीय असुरक्षित आहेत. अबालवृद्धांवर या मोकाट कुत्र्यांचा हल्ला होत आहे. त्यामुळे या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी विविध संस्था, संघटना व पक्षांकडून वेळोवेळी महापालिका प्रशासनाकडे करण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाकडून कुत्रे निर्बिजीकरणाची प्रक्रिया ठेकेदारावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे प्रक्रियेकडे बोट दाखवत प्रशासन निवांतच आहे. मात्र याचा फटका शहरातील आणि पर्यटनासाठी बाहेरून येणाऱ्या नागरिकांना बसत आहे.

महापालिका प्रशासनाने नेमलेल्या एका मक्तेदाराकडून केवळ दाखविण्यापुरतीच कार्यवाही आणि फोटोसेशन होत असल्याने लाखो रुपये खर्च करून निर्बिजीकरणाची प्रक्रिया राबवूनही शहरातील



नागरिक मोकाट कुत्र्यांपासून सुरक्षित नसल्याची बाब पुढे आली आहे. निर्बिजीकरणाचा ठेका 'नव समाज निर्माण' संस्थेला देण्यात आला आहे. प्रत्येक कुत्र्याच्या निर्बिजीकरणामागे चांगली रक्कम त्यांना देण्यात येते. शिवाय



यासाठी महापालिकेनेच पुणे रोडवरील जुना जकात नाका व इतर जागेत सोयीनियुक्त यंत्रणा मोफत उपलब्ध करून दिली आहे. अशावेळी तक्रारींवर कार्यवाही होत नाही. मोजकेच निर्बिजीकरण झाल्याचे दिसून येते. पण कुत्रे निर्बिजीकरण नोंदीचा घोळ कायम असल्याची चर्चा प्रभागातील लोकप्रतिनिधींकडूनच सुरू आहे. तर निर्बिजीकरण केलेले मोकाट कुत्रे इतरत्र सोडण्याचे प्रकारही होत असल्याची ओरड आहे. निर्बिजीकरणासाठी हेल्पलाइन क्रमांक ७६६६५१३०२६ संपूर्ण शहरवासीयांसाठी देण्यात आला. मात्र या क्रमांकावर तक्रार दिल्यानंतरही कार्यवाही होत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया काही भागातील नागरिकांनी व्यक्त केली. श्वान दंशाचे दररोज मोठ्या प्रमाणात रूग्ण सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात तसेच महापालिकेच्या डफरीनसह विविध नागरी आरोग्य केंद्रात रेबीज लसीकरण व उपचारासाठी येत असल्याची आकडेवारी पुढे आली आहे. मात्र महापालिका प्रशासन शांतच असल्याची ओरड लोकप्रतिनिधींमधून सुरू झाली आहे.

प्रशासनाच्या या गलथान कारभाराविरुध्द आंदोलनासह शहरातील मोकाट कुत्रे पकडून महापालिकेत आणून सोडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# तहसील कार्यालयात गोंधळप्रकरणी कुलकर्णी व साथीदारांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील उत्तर तहसील कार्यालयात दि.१९ नोव्हेंबर रोजी दुपारी झालेल्या गोंधळप्रकरणी प्रहार संघटनेचे अजित कुलकर्णी व त्यांच्या साथीदारांवर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे यांनी फिर्याद दिली आहे.

यातील आरोपी कुलकर्णी व त्याचे ७ ते ८ साथीदार यांनी तहसीलदार नीलेश पाटील यांच्या नावाच्या पाटीवर, अभ्यागतांच्या भेटीच्या वेळेच्या बोर्डावर तसेच कार्यालयाच्या दरवाज्यावर काळ्या रंगाचा स्प्रे मारुन विद्रुपीकरण केले. तसेच तहसीलदार चोर आहे अशा घोषणा दिल्या असे फिर्यादीत नमूद आहे.

ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झालेली आहे. या घटनेच्या तपासाची जबाबदारी उपनिरीक्षक प्रवीण पराडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

### कुलकर्णी यांनी ७ ते ८ गाड्यांची मागणी केली

अजित कुलकर्णी यांनी केलेल्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नाही. उलट त्यांनीच नागपूरला जाण्यासाठी ७ ते ८ गाड्यांची मागणी माझ्याकडे केलेली होती. मी त्यांना गाड्या देऊ शकत नाही, असे सांगितले होते. निवडणूक कामकाजासाठी मी मोहोळमध्ये असताना त्यांनी उत्तर तहसील कार्यालयात येऊन हे कृत्य केले आहे, असे उत्तर सोलापूरचे तहसीलदार नीलेश पाटील यांनी सांगितले.



# महापालिकेच्या वतीने १८ ठिकाणी आजोरा हटाव मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवारी शहराच्या विविध १८ भागात आजोरा, दूषित कचरा उचलण्याची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेसाठी ११ जेसीबी, २० डंपर यांच्या मदतीने दिवसभरात एकूण ८३ खेपा घेऊन आजोरा व दूषित कचरा उचलला.

शहरात दर शुक्रवारी आजोरा उचलण्याची मोहीम घेण्यात येते. यानुसार दि. २१ नोव्हेंबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या नियंत्रणाखाली हा मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. यावेळी महत्त्वाच्या भागांमध्ये आजोरा उचल, कचरा संकलन व स्वच्छता कामे करण्यात आली. जुना पुना नाका, शेळगी गावठाण, जिल्हा परिषद परिसर, शेळगी ब्रिज, एकतानगर रोड ते श्रीकृष्ण मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड, विमानतळ परिसर, म्हाडा कॉलनी, डी-मार्ट रोड ते गोविंदश्री मंगल कार्यालय, सहयोग नगर, नवोदय नगर, मीरा पिठाची गिरणी, छत्रपती संभाजी तलाव मैदान, वसंत नगर कॉर्नर, रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसर, दमाणी नगर, मरीआई चौक, जेल रोड परिसर, डफरीन हॉस्पिटल, शानदार चौक या भागात राबविण्यात आली. या मोहिमेसाठी ११ जेसीबी, २० डंपर यांच्या मदतीने दिवसभरात एकूण ८३ खेपाद्वारे आजोरा व दूषित कचरा उचलण्यात आला. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

यावेळी सफाई अधिकारी (वाहन) अनिल चराटे, तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक उपस्थित राहीले व मार्गदर्शन केले. महापालिका प्रशासन शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी कटिबद्ध असून, नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे सर्वाधिक १३ विभागांची जबाबदारी

## अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्याकडे ८ तर संदीप कारंजे यांच्याकडे ५ विभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या कारभाराच्या दृष्टीने आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांनी विविध विभागांचे सुधारितरित्या वाटप केले. महापालिकेतील महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू म्हणून गणले जाणारे उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे सर्वाधिक म्हणजे तब्बल १३ विभागांची जबाबदारी देण्यात आली. तर अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्याकडे ८ आणि अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्याकडे ५ विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली.

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्याकडे ३, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे ४ तर मनीषा मगर यांच्याकडे ७, मुख्य लेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर यांच्याकडे १ तर नियंत्रण अधिकारी तपन डंके



यांच्याकडे ४ विभाग देण्यात आले. उपायुक्त तैमूर मुलाणी यांची बार्शी येथे पदोन्नतीने बदली झाल्यानंतर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी आयुक्त यांचे नियत्रंण व पुनर्विलोकनाच्या अटीस अधिन राहून हे विभाग सोपविण्यात आलेले आहेत.

निर्गमित केलेले वित्तीय अधिकार व प्रशासकीय अधिकार यांच्या मर्यादेच्या अधीन राहून काम पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडित सर्व प्रस्ताव/प्रकरणे मंजूर करण्यापूर्वी मुख्य लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायासह सादर होतील, याची दक्षता घेण्यात यावी. स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेकडे पाठवावयाचे कोणतेही प्रस्ताव/प्रकरणे आयुक्त यांच्या पूर्वपरवानगीनेच नगरसचिव यांच्याकडे पाठवली जावीत, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी एका आदेशात म्हटले आहे.

### अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्याकडे देण्यात आलेले विभाग

उपायुक्त आशिष लोकरे-सामान्य प्रशासन विभाग (भांडारसह), कर आकारणी विभाग, अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, भूमी व मालमत्ता कार्यालय (हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालनासह), आरोग्य विभाग (दवाखाने/प्रसुतीगृह, एनयुएचएम जन्म-मृत्यु विभाग व विवाह नोंदणी, आरोग्य भांडारसह), मलेरिया विभाग, विधान सल्लागार विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ३ व ६, क्रीडा कार्यालय, संगणक विभाग, अभिलेखापाल, सुरक्षा विभाग, शिक्षण विभाग व महानगरपालिका १ ते ६ प्रशाला.

अतिरिक्त आयुक्त वीणा पवार-घनकचरा व्यवस्थापन विभाग, नगर सचिव कार्यालय, समाज विकास विभाग (एमयुएलएमसह), कामगार व जनता संपर्क कार्यालय (दिव्यांग विभागसह), महिला व बालकल्याण विभाग, उद्यान विभाग, पर्यावरण संवर्धन विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ५ व ७. अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे-शहर, नगर अभियंता (नागरी कामे, गलिच्छ वस्ती सुधारणा (तांत्रिक), सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय (पाणी पुरवठा व जल नित्सारण), निवडणूक व जनगणना कार्यालय, विद्युत विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र.१.

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले-घनकचरा व्यवस्थापन विभाग, अभिलेखापाल कार्यालय, संगणक विभाग. सहाय्यक आयुक्त गिरिश पंडीत-निवडणूक व जनगणना कार्यालय, शिक्षण विभाग व महानगरपालिका १ ते ६ प्रशाला, अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ४. सहाय्यक आयुक्त मनिषा मगर-क्रीडा कार्यालय, उद्यान विभाग, पर्यावरण संवर्धन विभाग, महिला व बालकल्याण विभाग, समाज विकास विभाग (एमयुएलएमसह), कामगार व जनता संपर्क कार्यालय (दिव्यांग विभागसह), क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ८. मुख्यलेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर-क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र.२. उपअभियंता तपन डंके-परिवहन विभाग, अतिक्रमण विभाग, मंडई, कोंडवाडा व लायसन (परवाना) विभाग, पशु वैद्यकिय विभाग व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभाग.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# बंगाल-झारखंडमध्ये कोळसा माफियांवर ईडीचे छापे

**४०**

**पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळी कारवाई**

**१००**

**पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचा समावेश**



ईडीच्या छाप्यांवेळी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि सोने जप्त करण्यात आल्याचे समजते. याविषयीची छायाचित्रे समोर आली असून, त्यात ५०० रुपयांच्या नोटांच्या गड्ड्यांनी भरलेल्या ब्रीफकेस आणि बॅगा स्पष्टपणे दिसत आहेत. मोठ्या प्रमाणावर सोन्याचे दागिनेही जप्त करण्यात आले आहेत.

**नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये कोळसा माफियांवर ईडीची कारवाई सुरू असून, अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ४० पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळी छापेमारी केली.

अधिकाऱ्यांच्या मते, ईडी पश्चिम बंगालमधील दुर्गापूर, पुरुलिया, हावडा आणि कोलकाता जिल्ह्यातील २४ ठिकाणी बेकायदेशीर कोळसा खाणकाम, वाहतूक आणि साठवणुकीच्या संदर्भात छापे टाकत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी सकाळपासून नरेंद्र खरका, अनिल गोयल, युधिष्ठिर घोष, कृष्णा मुरारी कायल आणि इतरांच्या ठिकाणांवर ईडीने छापेमारी केली. बंगालमध्ये छापे टाकताना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि दागिने जप्त करण्यात आले.

**झारखंडमध्ये १८ ठिकाणी छापे**

ईडीचे अधिकारी झारखंडमध्ये १८ ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत. हे छापे अनेक मोठ्या कोळसा चोरी आणि तस्करीच्या प्रकरणांशी जोडलेले आहेत, ज्यात अनिल गोयल, संजय उद्योग, एलबी सिंह आणि अमर मंडल, राजकिशोर यादव यांचा समावेश आहे. एकत्रितपणे, या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात कोळसा चोरी आणि चोरीचा समावेश आहे, ज्यामुळे सरकारचे शेकडो कोटी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. (वृत्तसंस्था)

**कफ सिरफ प्रकरण**

## लाच घेताना पोलिसाला अटक

**गाझियाबाद, २१ नोव्हेंबर**

बंदी असलेल्या कफ सिरप तस्करी रॅकेटचा तपास करणाऱ्या गुन्हे शाखेच्या एका निरीक्षकाला शुक्रवारी पोलिसांनी अटक केली. गुन्हे शाखेत तैनात असलेले निरीक्षक रमेश सिंग सिद्धू यांना गुरुवारी संध्याकाळी सिहानी गेट पोलिस ठाण्यातील पथकाने विशिष्ट माहितीच्या आधारे अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सिद्धूविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे, असे या कारवाईचे नेतृत्व करणाऱ्या नंदग्रामच्या सहायक पोलिस आयुक्त उपासना पांडे यांनी सांगितले. आरोपी निरीक्षकाला न्यायालयात हजर केले जाईल आणि न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर तुरुंगात पाठवले जाईल, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

# कर्नाटकात हेरगिरी मॉड्युलचा भंडाफोड

## दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक, नौकांची छायाचित्रे पाठविली





**उडुपी, २१ नोव्हेंबर**

कर्नाटक जिल्ह्यातील उडुपी पोलिसांनी देशाच्या सागरी सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या हेरगिरी मॉड्युलचा भंडाफोड करीत दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक केली. आरोपी उत्तरप्रदेशच्या सुलतानपूर जिल्ह्यातील रहिवासी असून, कोचीन शिपयार्डमध्ये नोकरीवर आहे. त्यांनी लढाऊ नौकांची छायाचित्रे पाकिस्तानी एजंटला व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याची माहिती चौकशीत समोर आली.

कोचीन शिपयार्डमध्ये काम करणारे हे दोघे पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात होते. गोपनीय माहितीच्या आधारे त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात आले आणि गुरुवारी त्यांना उडुपी येथून अटक केली, असे सहाय्यक पोलिस अधीक्षक हर्ष प्रियवदा यांनी सांगितले.

पहिला आरोपी रोहित हा मालपे येथील कोचीन शिपयार्डमध्ये काम करत होता, तर दुसरा आरोपी समीर हा केरळमधील कोचीन येथील शिपयार्डमध्ये कार्यरत होता. त्यांचे मोबाईल आणि लॅपटॉप जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या डिजिटल उपकरणांची तपासणी केली असता, जहाजबांधणीची गोपनीय कागदपत्रे, नौकांचे क्रमांक आणि इतर माहिती थेट पाकिस्तानी फोन नंबरवर व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याचे उघड झाले.

दोघांच्या मोबाईल फोनवरून अनेक चॅट्स, मीडिया फाइल्स आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली, त्यांची न्यायवैद्यक तपासणी केली जात आहे. हे दोघेही किती काळापासून या कृत्यात गुंतले आहेत आणि त्यांच्या मागे एक संघटित नेटवर्क कार्यरत आहे का याचाही तपास केला जात आहे. राष्ट्रीय सुरक्षा संस्था देखील या तपासात सहभागी झाल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# २५० बंदरांना मिळणार सीआयएसएफचे सुरक्षा कवच

**नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

भारतातील बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात् सीआयएसएफकडे सोपविण्याचा निर्णय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे विमानतळाप्रमाणेच आता देशातील सुमारे २५० बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसफकडे राहणार आहे.

सीआयएसएफचे उपमहानिरीक्षक अजय दहिया यांनी सांगितले की, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने १८ नोव्हेंबर रोजी संबंधित आदेश जारी केला. हा निर्णय बंदरांच्या सुरक्षेचे आधुनिकीकरण आणि सुधारणा करण्याच्या दिशेने एक दूरदर्शी पाऊल आहे. व्यापार, नौवहन आणि भारताच्या वाढत्या नील अर्थव्यवस्थेत बंदरांची भूमिका लक्षात घेता, सुरक्षेसंदर्भात अनेक उपाययोजना राबवल्या जात आहे. सीआयएसएफ आता बंदरांवर सुरक्षा योजना आणि मूलभूत सुरक्षा ऑपरेशन्सची तयारी करेल.

बंदरांच्या सुरक्षेसाठी हायब्रिड सुरक्षा मॉडेल, सुधारित स्क्रीनिंग प्रणाली आणि विशेष प्रशिक्षण संस्थाही सुरू करण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात सीआयएसएफ १३ प्रमुख बंदरांच्या सुरक्षेसाठी तैनात आहे, तर खाजगी सुरक्षा एजन्सी कार्गो झोन, गोदामे, प्रवेशद्वार आणि लहान बंदरांमधील इतर सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. (वृत्तसंस्था)

# कामगारांचे जीवनमान बदलणार

**नवीन श्रम संहितेमुळे सामाजिक सुरक्षा कवच ● आर्थिक विकासाला चालना ● नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होणार**



**नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

देशात नवीन श्रम संहिता लागू करण्याचा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय कामगारांचे जीवनमान बदलणारा असून, त्यांना सामाजिक सुरक्षा कवचही मिळणार आहे. नवीन संहितेमुळे सर्व कामगारांना वेळेवर आणि किमान वेतनाची हमी मिळेलच याशिवाय त्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि ग्रॅच्युईटीचा अधिकार मिळणार आहे.

देशातील ४० कोटी कामगारांचे भविष्य सुनिश्चित करणे आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हा या निर्णयाचा उद्देश आहे. नवीन कामगार सुधारणा कायदे लागू झाल्याने देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि नवीन रोजगाराच्या संधी देखील निर्माण होणार आहे. नवीन कामगार संहितांमध्ये रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदींचा समावेश आहे. महिला कामगारांना पुरुषांप्रमाणेच वेतन देण्याची तरतूद आहे. नवीन कामगार संहितांमध्ये छळ, भेदभाव आणि वेतनाशी संबंधित तक्रारींचे जलद निवारण करण्याच्या तरतुदींचा देखील समावेश आहे.

निश्चित मुदतीचा रोजगार आणि अनिवार्य नियुक्ती पत्रे कामगारांसाठी सामाजिक सुरक्षिततेची हमी देतील. नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीमुळे भारतातील कामगारांना जागतिक दर्जाचे सुविधा मिळण्याची हमी मिळणार आहे. (वृत्तसंस्था)

**नवीन कामगार संहितेतील महत्त्वाचे मुद्दे**


- नियोक्त्यांना वेतन विलंबाने करता येणार नाही
- कामगारांसोबत मनमानीने वागता येणार नाही
- कामगारांच्या शोषणाला आळा बसेल
- नोकरी सुरू होताच त्यांचे हक्क निश्चित होतील
- महिला कामगारांसाठी समान वेतनाची तरतूद आहे
- कामाच्या ठिकाणी लिंग-आधारित भेदभाव रोखण्यासाठी तरतुदी आहे
- ४० कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा हमी निश्चित होईल
- कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या नोकरीनंतरच ग्रॅच्युइटीची हमी मिळेल
- ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक मोफत आरोग्य तपासणीची हमी
- ओव्हरटाईम करणाऱ्या कामगारांना दुप्पट वेतनाची हमी मिळेल
- धोकादायक क्षेत्रातील कामगारांसाठी १०० टक्के आरोग्य सुरक्षा
- आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी

**अशा आहे संहितेतील तरतुदी**

- **औद्योगिक संबंध संहिता-२०२०** : या संहितेअंतर्गत, एका वर्षाच्या निश्चित मुदतीच्या नोकरीनंतर ग्रॅच्युइटी पात्र असेल. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक स्वतंत्र निधी तयार केला जाईल.
- **सामाजिक सुरक्षा संहिता- २०२०** : कर्मचारी राज्य विमा आता संपूर्ण भारतात लागू केला जाईल. १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापना नियाक्ता आणि कर्मचाऱ्यांच्या परस्पर संमतीने स्वेच्छेने या योजनेत सामील होता येईल.
- **वेतन संहिता-२०१९** : सर्व क्षेत्रांना किमान वेतन लागू असेल, समान कामासाठी समान वेतनाची हमी दिली जाईल आणि वेतन देयकाची अंतिम मुदत निश्चित केली जाईल. कामाच्या ठिकाणी जाताना अपघात झाल्यास तो रोजगाराशी संबंधित मानला जाईल.
- **व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि सेवा अटी संहिता-२०२०** : संहितेच्या तरतुदी आस्थापनेत एक कर्मचारी असला तरी लागू होतील, आस्थापनांसाठी एक परवाना, एक नोंदणी आणि एक परतावा अशी चौकट सुरू करण्यात आली.

# बंधुत्व हाच भारताचा धर्म : सरसंघचालक

## मणिपूरमध्ये जनजाती प्रतिनिधींसोबत संवाद



**इम्फाळ, २१ नोव्हेंबर**

स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाची घटनात्मक तत्त्वे गौतम बुद्धांच्या शिकवणींमध्ये रुजलेली आहेत आणि जेव्हा बंधुता-एकतेची भावना मजबूत असेल तेव्हाच ती संस्कृती भरभराटीला येऊ शकते. स्वातंत्र्य आणि समानता असूनही अनेक राष्ट्रे अपयशी ठरली. कारण त्यांच्यात बंधुत्वाचा अभाव होता. परंतु भारतासाठी बंधुत्व हाच धर्म आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

सध्या सरसंघचालक मणिपूरच्या तीन दिवसांच्या भेटीवर आहेत. शुक्रवारी भेटीच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी इम्फाळमधील जनजाती नेत्यांशी संवाद साधला. यावेळी मणिपूरच्या विविध जनजाती समुदायांचे प्रतिनिधित्व करणारे २०० हून अधिक नेते उपस्थित होते. यावेळी सरसंघचालक म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही समजाला बळकट करण्यासाठी समर्पित एक पूर्णपणे सामाजिक संघटना आहे. संघ कोणाच्याही विरोधात नाही, तो समाजाला नष्ट करण्यासाठी नाही तर समाज पूर्णत्वास नेण्याकरिता स्थापन झाला आहे. नेते, राजकारण, सरकारे आणि अगदी दैवी अवतार या समाजासाठी सहायक शक्ती आहेत. पण, समाजाला खरी गरज एकतेची आहे. संघ राजकारणात सहभागी होत नाही किंवा कोणत्याही संघटनेवर रिमोट कंट्रोल म्हणून काम करत नाही. संघ केवळ मैत्री, स्नेह आणि सामाजिक सौहार्दाद्वारे कार्य करतो.

**भारताचे सांस्कृतिक सातत्य**

भारताच्या सांस्कृतिक सातत्यावर भर देताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, अभ्यासातून असे दिसून येते की भारतातील लोकांचे आनुवंशिक आणि सांस्कृतिक डीएनए हजारो वर्षांपासून एक राहिले आहेत. आपल्या सामायिक जाणिवेमुळे आपण एक आहोत. आपल्यात सुंदर विविधता असूनही आपण एकाच संस्कृतीच्या कुटुंबातील आहोत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची निर्मिती कोणत्याही बाह्यशक्तीच्या प्रतिक्रियेस्वरूप झालेली नाही, तर अंतर्गत विसंगती दूर करण्यासाठी झाली आहे, हे स्पष्ट करून सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी डॉ. हेडगेवारांच्या समाज एकत्रीकरण संकल्पाचे स्मरण केले. ते म्हणाले, संघ ही मानवनिर्मिती आणि चारित्र्यनिर्मितीची चळवळ आहे. संघाचे काम वास्तवाच्या धर्तीवर कसे चालते, हे समजून घेण्यासाठी सर्वांनी शाखांना भेट द्यावी. आमच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीशी बांधिलकी ठेवून समाजाच्या भल्यासाठी काम करणारा कोणीही अघोषित स्वयंसेवकच आहे. आम्हाला चांगल्या समाजाशिवाय काहीही नकोय, असेही सरसंघचालक म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मनसे महाविकास आघाडीचा भाग नाही : संदीप देशपांडे

**मुंबई २१ नोव्हेंबर**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत ठिणगी पडण्याची शक्यता असून, विविध मार्गाने काँग्रेस पक्षाने मनसे सोबत युती न करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. मविआचा घटक पक्ष असलेल्या उबाठाने याबाबत अद्याप भूमिका स्पष्ट केली नसली तरी, मनसे ही महाविकास आघाडीचा भाग नसल्याचे स्पष्टीकरण मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिले.

उबाठासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यामुळे कुठल्याही परिस्थितीत उबाठाला मुंबई मनपा राखायची असल्याने, एकमकाविरोधात रान उठविणारे ठाकरे बंधू एकत्रित आले. यामुळे उद्धव ठाकरे यांनी मनसे सोबत एकत्र आलो तर एकत्र राहण्यासाठीच असे ठणकावून मविआतील घटक पक्षाला स्पष्टपणे संकेत दिलेले होते. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काँग्रेस पक्षाला पूर्वी आपल्या सोबत असलेल्या हिंदी भाषिक मतदारांना पुन्हा आपल्याकडे वळवायचे आहे. मात्र मनसे आणि उबाठा यांचे सोबत एकत्रित बृहन्मुंबई महानगरपालिका लढवल्यास काँग्रेसचे नुकसान होईल म्हणून काँग्रेस मनसेला जोरदार विरोध करीत आहे.

## बापानेच केले मुलीचे लैंगिक शोषण

गोंदिया : जिल्ह्यातील सडक-अर्जुनी तालुक्यात येणाऱ्या डुग्गीपार पोलिस ठाण्याच्या हद्दीत बापानेच स्वतःच्या १४ वर्षीय मुलीचे लैंगिक शोषण करून तिला गर्भवती केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंद करून त्याला अटक करण्यात आली.

# २५० बंदरांना मिळणार सीआयएसएफचे सुरक्षा कवच

**नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

भारतातील बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात् सीआयएसएफकडे सोपविण्याचा निर्णय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे विमानतळाप्रमाणेच आता देशातील सुमारे २५० बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसफकडे राहणार आहे.

सीआयएसएफचे उपमहानिरीक्षक अजय दहिया यांनी सांगितले की, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने १८ नोव्हेंबर रोजी संबंधित आदेश जारी केला. हा निर्णय बंदरांच्या सुरक्षेचे आधुनिकीकरण आणि सुधारणा करण्याच्या दिशेने एक दूरदर्शी पाऊल आहे. व्यापार, नौवहन आणि भारताच्या वाढत्या नील अर्थव्यवस्थेत बंदरांची भूमिका लक्षात घेता, सुरक्षेसंदर्भात अनेक उपाययोजना राबवल्या जात आहे. सीआयएसएफ आता बंदरांवर सुरक्षा योजना आणि मूलभूत सुरक्षा ऑपरेशन्सची तयारी करेल.

बंदरांच्या सुरक्षेसाठी हायब्रिड सुरक्षा मॉडेल, सुधारित स्क्रीनिंग प्रणाली आणि विशेष प्रशिक्षण संस्थाही सुरू करण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात सीआयएसएफ १३ प्रमुख बंदरांच्या सुरक्षेसाठी तैनात आहे, तर खाजगी सुरक्षा एजन्सी कार्गो झोन, गोदामे, प्रवेशद्वार आणि लहान बंदरांमधील इतर सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशात भूकंप; सहा जणांचा मृत्यू

## २०० जखमी

**ढाका, २१ नोव्हेंबर**

बांगलादेशात शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास झालेल्या विध्वंसक भूकंपात ६ जण ठार तर २०० पेक्षा जास्त जखमी झाले. भूकंपाचे केंद्र ढाक्यापासून २५ किमी अंतरावरील नरसिंगडी येथील माधाबादीत होते.

भूकंपाच्या तीव्रतेमुळे १० मजली इमारत एका बाजूला झुकली. बांगलादेशमध्ये सुरू असलेला बांगलादेश-आयर्लंड आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामनाही थांबविण्यात आला. तीन जणांच्या मृत्यूला पोलिसांनी दुजोरा दिल्याचे स्थानिक माध्यमांनी वृत्तात म्हटले आहे. बांगलादेशात १९६२ मध्ये सर्वांत मोठा भूकंप आला होता. त्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ८.५ होती. याला ग्रेट अराकान भूकंप म्हणून ओळखले जाते. त्यामुळे बांगलादेशात मोठे नुकसान झाले होते.

गाझीपूरमधील श्रीपूर येथे भूकंपादरम्यान एक मोठा अपघात झाला. भूकंपानंतर बहुमजली इमारतीतून कामगारांनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत १५० पेक्षा जास्त कामगार जखमी झाले. डेनिमेक नावाच्या कापड कारखान्यात ही घटना घडली. जखमींना श्रीपूर उपजिल्हा आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. भूकंप झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी कारखान्याचे मुख्य गेट उघडण्यास नकार दिल्याची तक्रार कामगारांनी केली आहे. गेट न उघडल्याने घबराट पसरली आणि ते अधिक जखमी झाले.



शुक्रवारी आलेल्या शक्तिशाली भूकंपात ढाक्यामध्ये एकीकडे कललेली ही इमारत. लोक मात्र धोक्याकडे दुर्लक्ष करून छायाचित्र काढत होते

**१० महिन्यांच्या मुलीचा मृत्यू**

आज सकाळी झालेल्या भूकंपात नारायणगंजच्या रूपगंज उपजिल्हा येथे भिंत कोसळून १० महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला. मुलाची आई आणि शेजारी जखमी झाले आहेत आणि सध्या उपजिल्हा येथील एका खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मुलीच्या आईने सांगितले की, भूकंपाचा धक्का जाणवताच मुलाची आई तिच्या मुलीसह घराबाहेर पळून गेली. ते जवळच असलेल्या तिच्या आईच्या घरी जात असताना, रस्त्याच्या कडेला असलेली भिंत अचानक त्यांच्यावर कोसळली. यात मुलीचा जागीच मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

**कोलकातामध्ये २० सेकंद जाणवले धक्के**

बांगलादेशमधील भूकंपानंतर कोलकातामध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. स्थानिकांच्या मते, हे धक्के सुमारे २० सेकंदांसाठी होते. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ५.२ होती. आतापर्यंत कोणतेही नुकसान झालेले नाही. कूचबिहार, दक्षिण दिनाजपूर, मालदा आणि नादिया येथील अनेक भागात भूकंपाचे धक्के जाणवले.

# राज्यात कामगार रुग्णालयांसाठी विनामूल्य सरकारी जमीन

## आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट

**मुंबई २१ नोव्हेंबर**

राज्यात उभारल्या जाणाऱ्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) रुग्णालयांसाठी सरकारी जमीन महसूलमुक्त आणि सारामाफीने मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागामार्फत शासन निर्णय जारी केला. यामुळे निर्णयामुळे राज्यभरातील कामगार रुग्णालये सक्षम होतील आणि या माध्यमातून कामगारांना योग्य सुविधा उपलब्ध होतील.

छ. संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी येथील १५ एकर गायरान जमीन २०० खाटांच्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) रुग्णालयासाठी मोफत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने जूनमध्ये घेतला होता. या माध्यमातून कामगार रुग्णालय अधिक सक्षम करण्यासाठी मदत होणार असल्याने, त्याच धर्तीवर राज्यात जिथे ईएसआयसी रुग्णालये प्रस्तावित आहेत, तिथे हाच नियम लागू केला जाईल. सरकारी जमीन उपलब्ध असल्यास ती विनामूल्य देण्याचा निर्णय घेऊन राज्यातील कामगारांना मोठा दिलासा दिला आहे. (तभा वृत्तसेवा)

**निकष**

- मागणी केलेल्या जमिनीचे बाजारमूल्य एक कोटी रुपयांपर्यंत असल्यास विभागाच्या स्तरावर निर्णय घेतला जाईल.
- जमिनीचे मूल्य एक कोटीपेक्षा जास्त असल्यास वित्त विभागाच्या सहमतीने जमीन मोफत दिली जाईल.
- या जमिनीचा ताबा हा भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.
- ५०० खाटांचे रुग्णालय : ८ ते १२ एकर जमीन.
- ३०० खाटांचे रुग्णालय : ६ ते ९ एकर जमीन.
- २०० खाटांचे रुग्णालय : ५ ते ७ एकर जमीन.
- १०० खाटांचे रुग्णालय : ३ ते ५ एकर जमीन.

अग्रलेख...

# सुशासनबाबू आणि विकासबाबू

बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ दहाव्यांदा घेऊन नितीशकुमार यांनी बिहारमध्येच नाही तर देशातही इतिहास घडवला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी महाआघाडीने राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. रालोआने मात्र आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआ विधानसभा निवडणूक लढवत असल्याचे भाजपाचे नेते वारंवार सांगत होते. निवडणुकीनंतर नवनिर्वाचित आमदार मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील, अशी भूमिकाही भाजपा नेते मांडत होते. दुसरीकडे, नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील, असा दावा जदयुचे नेते करीत होते. मतमोजणीनंतर नितीशकुमारच बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील, हे स्पष्ट झाले होते. कारण भाजपा खालोखाल ८५ जागा जदयुने जिंकल्या. जदयुला यावेळी बिहारमध्ये मिळालेले यश हे नितीशकुमारांची लोकप्रियता दर्शविणारे आहे. प्रदीर्घ काळ सत्तेवर राहूनही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा तसेच घराणेशाहीचा आरोप झाला नाही, ही त्यांची जमेची बाजू.

बिहारच्या जनतेसमोर यावेळी दोन पर्याय होते. पहिला म्हणजे तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात महाआघाडीचे सरकार आणणे वा गेल्या २० वर्षांपासून बिहारमध्ये सुशासनबाबू म्हणून ओळखले जाणारे नितीशकुमार यांनाच पुन्हा संधी देणे. यात बिहारच्या सुज्ञ जनतेने नितीशकुमार यांना संधी दिली. बिहारमध्ये महाआघाडीची सत्ता आली असती आणि तेजस्वी यादव मुख्यमंत्री झाले असते, तर तेथे पुन्हा जंगलराज आले असते. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या शासनकाळात बिहारच्या जनतेने जंगलराजचा अतिशय दाहक अनुभव घेतला आहे. बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येऊ नये, तर मंगलराज यावे म्हणून तेथील जनतेने यावेळी काही उण्या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत नितीशकुमार यांच्या बाजूने कौल दिला. गुरुवारी त्यांच्या नेतृत्वात २६ सदस्यीय मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. नव्या मंत्रिमंडळात भाजपाचा वरचष्मा दिसून येतो आहे. खरे म्हणजे भाजपा आणि जदयु यांच्या आमदारांच्या संख्येत फारसा फरक नाही. त्यामुळे फार तर भाजपाला मंत्रिमंडळात जदयुच्या तुलनेत एखाददुसरी जास्त जागा मिळेल, असे वाटत होते. पण, नव्या मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह भाजपाचे चौदा मंत्री आहे, तर जदयुचे फक्त आठ. रालोआतील अन्य मित्रपक्षांना ४ जागा मिळाल्या. नितीशकुमार आपल्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ३६ मंत्री घेऊ शकतात. म्हणजे मंत्रिमंडळात सध्या १० जागा रिक्त आहेत. याचा अर्थ नितीशकुमार भविष्यात मंत्रिमंडळाचा विस्तार करू शकतात. सुशासनबाबूंसाठी बिहार ही होम पीच असली तरी मुख्यमंत्रिपदाची दहावी कारकीर्द त्यांच्यासाठी तितकीशी सोपी नाही. त्यांच्यासमोर प्रचारदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान आहे. या आश्वासनांची खरोखर पूर्तता केली तर आधीच कमजोर असलेल्या बिहारच्या अर्थव्यवस्थेवर आणखी ताण येणार आहे. तो ताण कमी करण्याचे आव्हान नितीशकुमारांना पेलावे लागेल. २००० मध्ये नितीशकुमार यांनी पहिल्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांचा हा पहिला कार्यकाळ फक्त सात दिवसांचा म्हणजे औटघटकेचा ठरला. २००५ नंतर मात्र छोटा अपवाद वगळता गेल्या २० वर्षांपासून तेच बिहारचे मुख्यमंत्री आहेत. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या काळात जंगलराज म्हणून बिहारची जी प्रतिमा निर्माण झाली होती, ती त्यांनी या काळात पुसून काढली. बिहारमधील गुन्हेगारी निश्चितच कमी केली. बिहारमध्ये खंडणी आणि अपहरण हा मोठा उद्योग झाला होता. खून आणि दरोड्यांसोबत महिलांवरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात होत होत्या. बिहारमध्ये महिलाच नाही तर कोणीच सुरक्षित नव्हते. डॉक्टर, वकील सोडा पण राज्यातील आयएएस आणि आयपीएस अधिकारीही सुरक्षित नव्हते. लालूप्रसादांच्या एका कन्येच्या विवाहात तर शोरुममधून उंची फर्निचर आणि महागड्या चारचाकी गाड्या लुटण्यात आल्या होत्या, असा आरोप झाला होता. लालूप्रसादांचे दोन साळे- साधू यादव आणि सुभाष यादव यांच्या गुंडागर्दीला तर बिहारची जनताच नाही तर पोलिस खातेही घाबरत होते. बिहारमध्ये जंगलराजचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत. या जंगलराजचा शेवट करण्याचे आश्वासन नितीशकुमार यांनी दिले होते. त्यामुळे बिहारच्या जनतेने त्यांच्यावर वारंवार विश्वास ठेवला. बहुमताने निवडून दिले. त्यांनी बिहारमधील जंगलराजवर बऱ्यापैकी अंकुश आणला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. ज्यांनी बिहारमधील लालूप्रसादांच्या काळातील जंगलराजचा अनुभव घेतला आहे, त्यांना नितीशकुमार यांच्या काळातील मंगलराजचे महत्त्व समजेल. नितीशकुमार यांच्या कार्यकाळात बिहारमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली असली तरी त्यांच्या नेतृत्वात बिहारची अपेक्षित प्रगती अद्याप झालेली नाही. मोठमोठे उद्योगधंदे राज्यात यायला हवे होते, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण व्हायला हवा होता. तसे घडलेले नाही. बिहारच्या तरुणांना आजही रोजगारासाठी मोठ्या संख्येत आपले राज्य सोडून देशाच्या कानाकोपऱ्यात जावे लागते. मुख्यमंत्रिपदाच्या दहाव्या कार्यकाळात नितीशकुमार यांच्यासमोर राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग आणण्याचे तसेच रोजगार निर्माण करण्याचे आव्हान आहे. आधीच्या नऊ कार्यकाळांत नितीशकुमार यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत चांगले काम केले असले तरी रोजगाराच्या क्षेत्रात त्यांना बरीच मजल पुढच्या काळात गाठावी लागेल.

त्यांचा मुख्यमंत्री म्हणून हा दहावा आणि कदाचित शेवटचा कार्यकाळ आहे. आता त्यांची प्रकृती पूर्वीसारखी त्यांना साथ देत नाही. वयाची पंचाहत्तरी त्यांनी ओलांडली आहे. चालताना त्यांना कोणाचा तरी आधार घ्यावा लागतो. स्मरणशक्तीही क्षीण झालेली आहे. त्यामुळेच भाजपा नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करायला फारशी अनुकूल नव्हती. पण बिहारच्या जनतेने तरुण तुर्क असलेल्या तेजस्वी यादव यांना नाकारत वयस्क अर्क असलेल्या नितीशकुमार यांना संधी दिली. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या नऊ कार्यकाळातील पुण्याईवर ही संधी त्यांना मिळाली आहे. ही पुण्याई एकट्या नितीशकुमार यांची नव्हती. ती भाजपाचीही होती. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत रालोआने जागांचे जे द्विशतक मारले, त्याचे खरे श्रेय हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे आहे. लालूप्रसाद यादव बिहारमध्ये आपले राजकारण एमवाय म्हणजे मुस्लिम आणि यादव यांच्या भरोशावर करत होते. राज्यात यावेळी रालोआला मिळालेले यशही एमवाय फॅक्टरमुळे मिळालेले आहे. रालोआचा एक एमवाय फॅक्टर म्हणजे महिला आणि युवा. या दोन वर्गांनी विधानसभा निवडणुकीत रालोआला भरभरून मतदान केले. निवडणुकीपूर्वी नितीशकुमार यांच्या सरकारने महिलांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी महिला रोजगार योजना सुरू केली होती. प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात दहा हजार रुपये जमा केले होते. राज्यातील जवळपास दीड कोटी महिलांना या योजनेचा फायदा मिळाला. ही योजना पुढे चालवण्याचे मोठे आव्हान नितीशकुमार यांच्यासमोर आहे. महिलांसोबत युवा वर्गासाठी रोजगार निर्माण करण्याचे दुसरे आव्हान नितीशकुमार यांच्यासोबत भाजपालाही पेलावे लागणार आहे. जदयु हा प्रादेशिक पक्ष असला तरी भाजपाचे तसे नाही. तो राष्ट्रीय पक्ष आहे. नितीशकुमार यांच्यानंतर जदयुला कदाचित फारसे राजकीय अस्तित्व उरणार नाही. भाजपा हा व्यक्तिकेंद्रित पक्ष नाही, तर विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे भाजपाला बिहारच्या बाबतीत दीर्घकालीन विकासाची भूमिका घ्यावीच लागणार आहे. बिहारचा आर्थिक विकास झाला तर राज्यात आपोआप उद्योगधंदे येतील आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होईल. बिमारू राज्यांच्या श्रेणीतून नितीशकुमार यांनी बिहारला बाहेर काढले असले तरी ते अद्याप आर्थिकदृष्ट्या सुदृढ राज्य झाले नाही. नितीशकुमार सुशासनबाबू ठरले, पण विकासबाबू ठरलेले नाहीत. भाजपाला या दृष्टीनेही विचार करत पावले उचलावी लागणार आहेत. प्रसंगी नितीशकुमार यांना केवळ आमदारांच्या संख्याबळाचे नव्हे तर विकासाच्या रणनीतीचे पाठबळही भाजपाला द्यावे लागेल. नितीशकुमारांनी निवडणुकीची कसोटी पूर्ण केली. आता पुढच्या कसोट्यांच्या पूर्ततेसाठी जनता त्यांच्याएवढेच भाजपाकडेही पाहते आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# प्रांतवादाने घेतला युवकाचा बळी

**तुझी-माझी धाव आहे दातापासून दाताकडे**
**पिरॅमिडच्या दगडाखाली माझी छाती पिचली होती**
**रंगवलेली फिक्कट ममी तेव्हाच मला हंसली होती**

विंदा करंदीकरांची ही कविता. शोषित समाजाचे चित्र त्यांनी प्रतीकात्मकपणे मांडले होते. दात म्हणजे शोषण करणारे घटक. जे समाजात व्हाईट कॉलर म्हणून मिरवीत असतात. मात्र या कवितेत शोषणाची जाणीव तरी आहे. पण जगात असे अनेक समाज आहेत, त्यांना अजूनही शोषणाची जाणीव नाही. कुणीतरी आपलं शोषण करतंय हेच त्यांना ठावूक नाही. शोषण हे अनेक प्रकारचं असतं. जिहादी संस्कृती करत असलेलं बलात्काराने बाटवणारं शोषण, मानवाच्या गटाला पतीत मानून भेदभाव करणारं शोषण, भ्रष्टाचार करून लुबाडणारं शोषण, अस्मितेच्या नावाखाली जनतेला लढवून स्वतः मलई खाणारं शोषण... शोषणाची एक विशिष्ट परिभाषा करता येत नाही. मात्र एखाद्याला दुसऱ्या विरुद्ध भडकवून त्यांच्यात दंगल जुंपवणं हे देखील शोषणच आहे. अशा प्रकारचं शोषण जगभरात होत असतं. पण वर सांगितल्याप्रमाणे अनेकांना जाणीवच नसते की आपलं शोषण होत आहे. शोषण करताना ज्या समाजाचं शोषण होत असतं, त्या शोषणालाच गोड मानून स्टॉकहोल्म सिंड्रोमच्या आहारी गेल्यामुळे शोषण आनंदाने सहन करणारा समाजही अस्तित्वात असतो. त्यापैकी एक आपला मराठी समाज आहे, विशेषतः मुंबई, ठाणे, डोंबिवलीतील मराठी समाज. मराठी समाजाचा इतिहास देदीप्यमान आहे. आपल्याला ज्ञानदेवांपासून समर्थ-तुकोबांपर्यंत साहित्यिक संत लाभले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वा. सावरकरांपर्यंत योद्धे लाभले. बाबासाहेब आंबेडकर प्रभृती समाजसेवकही लाभले. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यापक दृष्टिकोन ठेवणारं नेतृत्व मराठी माणसाला लाभलं नाही. देशाचं नेतृत्व करणाऱ्या, अटकेपार झेंडा फडकवणाऱ्या मराठी माणसाच्या वैचारिक सीमा आकुंचित झाल्या. मराठी माणूस जातिवादात गुंतला तसेच तो प्रांतवादातही गुरफटत गेला. याला खतपाणी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांनी घातले. तसेच सभ्यतेचा बुरखा पांघरूण फिरणाऱ्या सो-कॉल्ड समाजसेवकांनीही यास पाठिंबा दिला. परिणामी अर्णव खैरेसारख्या जेन झी तरुणाची हत्या!

काय म्हणताय? तुम्हाला अर्णव खैरे माहिती नाही? कसा माहीत असणार? तो कोणत्याही स्टार कलाकारचा किंवा राजकीय नेत्याचा मुलगा नव्हता. 'युवा नेता' म्हणून त्याचे बॅनर कधी झळकले नव्हते किंवा कोणत्या तरी पक्षाचा झेंडा हाती घेऊन दारू पिऊन त्याने कधी तमाशा केला नव्हता. अर्णव हा १९ वर्षांचा तरुण होता. जग बघायला सुरुवात केली होती त्याने. मात्र त्याच्या घरच्यांनी जगाचं सुंदर चित्र रंगवलं होतं, पण प्रत्यक्षात तो द्वेषाचा बळी ठरला आणि बळी घेणारे आपापल्या आलिशान बंगल्यात दोन ग्लास एकमेकांना आपटत घोट घेत आहेत. पण कसला घोट घेत आहेत? नरडीचा! मंगळवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे अर्णव खैरे अंबरनाथ-सीएसटी लोकलने कॉलेजकडे निघाला होता. त्याच्या डोळ्यांत शिक्षण पूर्ण करून सेटल होण्याची चिमणी स्वप्ने होती. मात्र प्रांतवेडाने पछाडलेले हिंस्र शिकारी या चिमण्या स्वप्नांचा वेध घेतील याची त्याला जाणीवही नव्हती. लोकलमध्ये गर्दी असल्यामुळे एका मुलाला तो हिंदीत म्हणाला, "थोडं पुढे व्हा." अचानक अस्मितेचे कैवारी, योद्धे जागे झाले. या योद्ध्यांची गंमत अशी आहे की ते झुंडीत असतात. एकट्याने जाण्याची त्यांच्यात हिंमत नसावी. झुंडीचा फायदा घेत ते सावजाचा शिकार करतात. अचानक ४५ जणांच्या टोळक्याने अर्णववर झडप घातली. त्या टोळक्याने अर्णवला विचारलं, "तू मराठी बोलत नाहीस का? मराठी बोलण्याची लाज वाटते का?" अर्णव घाबरला. तोही मराठीच होता. मराठी माणूस होता. टोळक्याने अर्णवला बुक्क्यांनी मारहाण केली. अर्णवला मारहाण होत असताना आपल्या महान परंपरेप्रमाणे लोकलमधील बघ्यांपैकी कुणीही मध्यस्थी केली नाही. कारण त्यांचं मनोरंजन होत होतं. पण त्या कोवळ्या जीवाच्या शरीरावरच नव्हे तर मनावर आघात झाला होता. हा सारा प्रकार अर्णवने त्याच्या वडिलांना फोन करून सांगितला. अर्णव खूप घाबरला होता. जग इतकं वाईट असतं की आपली काहीही चूक नसताना आपल्यासोबत गलिच्छ प्रकार घडू शकतो, हे त्याला कळून चुकलं होतं. अर्णव खैरे घरी आला खरा. पण त्याने दार लावून घेतलं. ते अस्मितेचे कैरावी त्याचा पाठलाग करून त्याला मारतील या भीतीने तो ग्रासला होता. अखेर पंख्याला लटकून त्याने जीव दिला. आत्महत्या केली. पण ही आत्महत्या नव्हती तर हत्या होती. ही हत्या केवळ त्या टोळक्याने, त्या झुंडीने केली नाही. तर ही हत्या केली आहे त्या झुंडीला प्रेरणा देणाऱ्यांनी. प्रांतवादाचं विष मराठी माणसाच्या मनात कालवणाऱ्यांनी... नुकताच एका ३ वर्षांच्या लहान मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला. अर्णवसोबत झाला तो सुद्धा बलात्कारच होता, मनावर केलेला बलात्कार. चिमुरडीवर बलात्कार करणाऱ्यामध्ये आणि त्या झुंडीमध्ये कोणताच भेद नाही. मानसिकताही तीच आहे.



आता अस्मितेच्या नावाने बोंबा मारणारे नेते, सो-कॉल्ड प्राध्यापक, समाजसेवक बाहेर पडणार नाहीत. त्यांचे कार्यकर्ते सोशल मीडियावर अपशब्दांची फुले उधळतील आणि रात्री पार्ट्या करत झिंगतील. पण अर्णव खैरेसारख्या अनेक मराठी मुलांचे काय? अर्णव खैरेसारखी लहान मुलं या अस्मितेचं राजकारण करणाऱ्यांसाठी बळी देण्याचे साधन आहेत. या राजकारणात अर्णव हलाल झाला. अशा अनेक मराठी मुलांच्या थडग्यांवर या लोकांनी महाल उभारले आहेत. हा रोख केवळ राजकीय नेत्यांवर नसून असे अनेक लोक जे सभ्यतेचा, प्राध्यापकीचा, मराठी अस्मितेचा चेहरा घेऊन फिरतात आणि समाजात द्वेष पसरवतात त्यांच्यावर देखील आहे. मराठी मुलांना उकसवणाऱ्या लोकांवर कारवाई झाली पाहिजे की नको? लोकलमधील ते जीव घेणारे लोक सापडतीलच. पण त्यांना प्रवृत्त करणाऱ्यांवर कारवाई होईल का? यांच्या राजकारणासाठी मराठी माणसांनी किती वर्षे हौतात्म्य पत्करायचं? यांची मुलं आपल्याला सुट-बुट घालून आलिशान गाड्यांतून फिरताना दिसतात ना? मग सामान्य मराठी माणसांच्या मुलांचं काय? अर्णव गेला, त्याच्यावर हल्ला करणाऱ्या टोळक्यांनाही अटक होईल. कारवाई होईल, शिक्षा होईल. म्हणजे हल्ला करणाऱ्या मराठी माणसांचेही नुकसानच झाले. "मग फायदा कोणाचा झाला?" "कोणाचा फायदा झाला?" हा प्रश्न जेव्हा तुम्हाला पडेल तेव्हा खऱ्या अर्थाने तुम्ही जागृत झालेले असाल. तोपर्यंत,

**चीनच्या त्या भींतीवरती बुरूजागणिक भूत आहे**
**दगडाच्याही अंगावरती पिळणुकीची लुत आहे**
**मला एक कळले आहे सुवर्णाच्या रथात बसून**
**सत्य येथून पळले आहे प्रत्येकाच्या छातीवरती**
**चाकोरीची खूण आहे जिकडे तिकडे मुकी धडे**
**इतिहासाला गेले तडे त्यांत नवीन काय घडे**
**मराठी माणसा, तुझी-माझी धाव आहे**
**दातापासून दाताकडे.**

writerjayeshmestry@gmail.com

मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# लाचारीची परिसीमा!

१९४८ ते १९६० या कालावधीत महाराष्ट्राने अनेक चढउतार बघितले. अनेक संकटे झेललीत. अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिला. मुंबई महाराष्ट्राला जोडण्यासाठी मराठी माणसांनी केलेला एल्गार हा देखील महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पुस्तकातील एक सुवर्ण पान आहे. मुंबई महाराष्ट्राला हवी या मागणीसाठी अडून बसलेल्या मराठी आंदोलकांनी वेळप्रसंगी प्राणांची आहुती दिली. "डंके की चोट पर..." ताठ मानेने, स्वाभिमानाने ती मिळविली. पण कधीही लाचारी पत्करली नाही. मात्र, याच मुंबईला आम्ही मिळवलं, असा दावा करणाऱ्या उबाठा गटाची सत्तेसाठी चाललेली लाचारी बघितल्यावर, खरंच यांनी मुंबई मिळविण्यासाठी प्रयत्न केले असतील का? असा प्रश्न निर्माण होतो. कारण सत्तेसाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचा यांचा मागील काळातला एकूणच प्रवास बघितल्यास "लाचारीची परिसीमा" काय असते, याची प्रचीती येते.

काल-परवा उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी, एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यावर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीवर "अलिकडे तुम्ही बघितलं असाल, बाबा मला वाचवा करायला एक जण गेला दिल्लीला", अशा शब्दांत खिल्ली उडविली. एवढ्यावर ते थांबले नाहीत तर, पुढे ते म्हणाले, "योग्यवेळी चांगला गुरू मिळाला असता तर अशी लाचारीची वेळच आली नसती..." मुळात १९८० पासून २०२२ पर्यंत एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या शिवसेनेत होते. त्यांचे पहिले गुरू हे आनंद दिघे आणि श्रद्धास्थान स्व. बाळासाहेब ठाकरे होते. या दोघांच्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदे नावाचा हिरा महाराष्ट्राच्या राजकारणात उदयास आला. आणि सध्या अवघ्या ३ वर्षांपासून त्यांचा भाजपासोबत स्वतंत्र सहवास आहे. अर्थात यापूर्वी ते भाजपाच्या सहवासात नव्हते अशातला भाग नाही. कारण १९८९ साली भाजपा आणि शिवसेना युती झाली. त्यावेळी एकनाथ शिंदे हे शिवसेनेत कार्यरत होते. १९९७ साली ते शिवसेनेचे नगरसेवक होते. नंतर ठाणे महानगर पालिकेचे सभापती झाले. २००४ मध्ये बाळासाहेबांनी शिंदेंना विधानसभा लढविण्यासाठी निवडले. त्यानंतर ते सातत्याने २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग शिवसेनेच्या चिन्हावर भाजपा सोबतच्या युतीत विजयी होत आले. एवढेच नव्हे तर, २०१४ ला ते देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात मंत्रीदेखील होते. त्यामुळे शिंदे आता आता अलिकडे भाजपाच्या सहवासात आले आहेत. त्यामुळे ते दिल्लीला मुजरा करायला जात आहेत, असा कुणाचा समज असल्यास त्याच्या राजकीय विवेकावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्याही पलीकडे जाऊन गंभीर विषय तर वेगळाच राहिला... १९८० ते २०१२ या काळात एकनाथ शिंदे यांचे गुरू-मार्गदर्शक राहिलेले आनंद दिघे असोत किंवा मग दस्तुरखुद्द बाळासाहेब ठाकरे असोत हे योग्य गुरू नव्हते असे उद्धव ठाकरेंना म्हणायचे आहे का? उद्धव ठाकरे हे ज्यांच्या वारसामुळे नेते आणि पक्षप्रमुख आहेत, त्या बाळासाहेब ठाकरेंनी आपल्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदेंना नगरसेवकापासून तर विधानसभा सदस्यापर्यंत पोहचविले. त्यांचे मार्गदर्शन योग्य नव्हते किंवा त्यांची निवड योग्य नव्हती असा संदेश उद्धव ठाकरेंना या महाराष्ट्राला द्यायचा आहे का? आणि मुळात ३२-३५ वर्षे ज्यांच्या सहवासात आणि मार्गदर्शनात एकाला तयार केले, त्यांच्या संस्कारात तो संघटनेत वाढला, ते बाळासाहेबांचे संस्कार चुकीचे होते, असा अर्थबोध यातून काढावा असे उद्धव यांना अपेक्षित आहे का? हे एकदाचं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं पाहिजे.



बरं देशातल्या कोणत्याही राज्यातला उपमुख्यमंत्री दिल्लीला गेला आणि देशाच्या गृहमंत्र्यांना भेटला तर तो आपल्या राज्याच्या हिताच्या दृष्टीने काही गोष्टींचे सहकार्य मागायला जाऊ शकत नाही? तो मुजरा करायलाच जाणार कशावरून? हा उद्धव ठाकरेंना ती लाचारी आणि मुजरा करायला गेला असं वाटू शकतं... कारण ठाकरे जेव्हा महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री होते, तेव्हा ते आपलं मुख्यमंत्रिपद कायम ठेवायला दिल्लीच्या आपल्या राजमातांना मुजरा करायला जायचे. एवढेच नव्हे तर, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी मला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करा, अशी भीक मागायला देखील दोन ते तीन वेळा आपल्या युवराजासोबत दिल्लीला गेले होते. ते या नेत्यांकडून त्या नेत्यांकडे चपला झिजवताना अवघ्या महाराष्ट्राने बघितले. पण रिकाम्या हाताने परतावे लागले होते. मग उद्धवजींनी केलेल्या वक्तव्याच्या त्याच न्यायाने हा सगळा घटनाक्रम बघितल्यास याला देखील लाचारी म्हणायची की त्यांच्या शब्दकोशात काही वेगळा शब्द आहे?

बरं बाळासाहेब होते तेव्हा त्यांना भेटायला राष्ट्रीय नेते त्यांच्या निवासस्थानी यायचे. आता काँग्रेसचा कोणताही नेता उद्धव ठाकरेंना भेटायला त्यांच्या निवासस्थानी जात नाही. राहुल गांधी बाळासाहेबांना श्रद्धांजली, आदरांजली वाहत नाही, स्वातंत्र्यवीर सावरकर आमचे श्रद्धास्थान आहे म्हणणारे, त्याच सावरकरांचा वारंवार अवमान करणाऱ्या राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसतात, हिंदुत्व आम्ही सोडलं नाही म्हणताना, हिंदू धर्म कोरोना आहे, कॅन्सर आहे म्हणाऱ्यांसोबत सलगी करतात, आता आता अलिकडे मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा कपोलकल्पित दावा करत, भाजपासोबत न जाण्याचे आवाहन करताना, ज्या काँग्रेसने खऱ्या अर्थाने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला, मराठी बांधवांवर बेछूट गोळीबार केला, त्यांच्यासोबत लोकसभा, विधानसभेत तर आघाडी केलीच, मात्र मुंबई महापालिका निवडणुकीत पुन्हा आघाडी करायला लोटांगण घालताना हे दिसत आहेत. या दोगल्या भूमिकेमुळे यांचा खरा चेहरा उघडा पडला आहे. यावेळी मुंबई महापालिका निवडणूक काँग्रेसने स्वबळावर लढविण्याचे जाहीर करून टाकले आणि ठाकरे, त्यांचे शिलेदार, त्यांच्या घरचे मुखपत्र हे आघाडी करा, आघाडी करा अशी काँग्रेसकडे रोज भीक मागताना दिसत आहेत. या सगळ्याला काय म्हणायचे... स्वाभिमान की लाचारी!... "लाचारी में हर व्यक्ति सिधाही होता है, असली चेहरा देखना हो तो उसे कुछ वक्त ताकत, सत्ता, शौहरत सौपकर देखो..." ही शायरी उद्धव ठाकरेंच्याबाबतीत तंतोतंत लागू झालीय्... त्यामुळे मुंबई, महाराष्ट्राच्या जनतेला यांचा खरा चेहरा आता दिसू लागल्याने, यांनी कितीही मुखवटे बदलवले तरी, लाचारीशिवाय दुसरे काहीही पदरात पडणार नाही, एवढे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

वेध

अनिल फेकरीकर

# आज नागपूर, उद्या कारपूर

लोकसंख्येचा स्फोट होत असल्याचे लक्षात येताच भारत सरकारने नसबंदीचा कार्यक्रम युद्धपातळीवर राबविणे सुरू केला होता. आजही एक किंवा दोन अपत्यानंतर नसबंदीसाठी दाम्पत्यांना आग्रह केला जातो. आता अशाच स्वरूपाची नसबंदीरूपी नियंत्रण वाहन विकण्यावर येणे काळाची गरज आहे. लोकांची गरज आहे म्हणून ते वाहने खरेदी करतात. पण वाहन ठेवायला जागाच नाही तरीही त्यांची खरेदी ही लोकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नागपुरातील ही गंभीर समस्या आज अनेकांना जाणवू लागली आहे. म्हणूनच की काय आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर व्हायला वेळ लागणार नाही. ही चिंता केवळ माझीच नाही तर पार्किंग समस्येवरून उद्‌भवलेल्या वादानंतर संबंधित पीडितांनाही जाणवू लागली आहे.

नागपूरची लोकसंख्या ३५ लाखांपेक्षा जास्त आहे. तर वाहनांची संख्या २४ लाखांपेक्षा जास्त झाली आहे. नागपुरात एमएच ३१, एमएच ४० आणि एमएच ४९ अशा स्वरूपात वाहनांची नोंदणी केली जाते. २०२२ मध्ये प्रतिदिन १९७ नवीन वाहनांची विक्री होत होती. २०२३ मध्ये ती संख्या २०३ पर्यंत गेली. २०२४ मध्ये ती वाढून २५० झाली. आता २०२५ मध्ये तो आकडा ५०० पेक्षा जास्त झाला आहे. मान्य आहे की, लोकांकडे खूप पैसा जमा झाला आहे. याचा अर्थ त्यांनी धडाक्यात वाहनांचीच खरेदी करावी काय? याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. 'खिशात नाही दमडी आणि खायला हवी कोंबडी' ही बाब माणसाला पदोपदी लागू पडते. मग कार किंवा इतर वाहनांची खरेदी करताना जागेचा मुद्दा लागू पडू नये का? पार्किंगचा मुद्दा प्रचंड गंभीर आहे. टोलेजंग घर असले तरी त्यात वाहने ठेवायला जागाच नसते. मग ती मंडळी दुसऱ्यांच्या घरापुढे वाहने ठेवतात. तिथेही जागा मिळाली नाही तर रस्त्यावर ठेवून मोकळे होतात. त्या वाहनांमुळे अपघात झाले तरी त्यांना त्याचे सोयरसुतक नसते. अशा लोकांच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी काही युवकांनी कारच्या काचा फोडण्याचा उद्योग सुरू केला होता. पण अशाने ही समस्या सुटणार नाही. कुणाचे नुकसान करून समस्येवर उपाय निघत नसतो. पार्किंगची जागा दाखवा नंतरच कार खरेदी करता येईल अशा स्वरूपाची कडक अंमलबजावणी व्हायला हवी. शिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तगडी करायला हवी. सहजतेने चोवीस तास जाणे येणे होईल अशी माफक व्यवस्था झाल्यास कोणीही वैयक्तिक कारला प्राधान्य देणार नाही. पण त्याकडे होणारे दुर्लक्ष आज नागपूरला गुन्हेपूरकडे ढकलत आहे. जेव्हा वाहतूक पोलिस 'नो पार्किंग'मध्ये लावलेल्या वाहनांच्या विरोधात कारवाई करतात तेव्हा होणाऱ्या वादविवादांचा एकदा प्रत्यक्ष अनुभव घ्या. संपूर्ण शहरात असे अनेक वाद होतात अन् लोकांना दंड भरून स्वतःची सुटका करून घ्यावी लागते. ज्यांना ठेच लागली ते काही दिवसांपुरते सुधरतात पण पुन्हा काही दिवसांनी 'ये रे माझ्या मागल्या'प्रमाणे वागतात. विस्कळीत झालेली वाहतूक आणि कार पार्किंग व्यवस्था या समस्या नागपुरात कुठल्याही क्षणी उद्रेक करू शकतात. त्याचे वेळीच समूळ उच्चाटन झाले तरच बरे होईल. अन्यथा झालेला उद्रेक शांत करणे प्रशासनासाठी वेगळी डोकेदुखी ठरू शकते. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी अनेक उपक्रम सुरू असतात. पण त्यातून फायदा दिसतच नाही. उलट सुशिक्षित लोकांकडून कायद्याचे उल्लंघन वाढले आहे. कार खरेदीतही हीच मंडळी अग्रेसर आहेत. त्यांना रोखणे फार कठीण असले तरी अशक्य नाही. ऑटोमोबाईल उद्योगाची भरभराट व्हायला हवी. पण त्याकरिता लोकांचे जीव घेऊन किंवा लोकांना त्रास देता कामा नये. तसा विचार करता वाहन खरेदी करणाऱ्यांनीच आपली स्थिती समजून घ्यायला हवी. कायदा जरी केला तरी तो पालन करणाऱ्यांनी त्याचा मनापासून स्वीकार केल्यास लाभ होतो. अन्यथा कायदाही निरर्थक ठरतो. म्हणूनच कायद्याने आणि नागरिकांनी आपले नागपूर भविष्यात गुन्हेपूर होणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटी, भारतात नागपूर आज हृदयस्थळ म्हणून गणले जाते. या हृदयस्थळाला जपणे सर्वांचे कर्तव्य आहे. तेव्हा आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर होण्यापूर्वी शासनाने लोकसहभागातून यावर रामबाण तोडगा काढणे काळाची गरज आहे. जेव्हा हे होईल तेव्हाच नागपूर अधिक सुंदर होईल, नाही का?

९८२२४६८६६०

## आजचे संघगीत-९०

शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

### समाज पुरुषा होई जागृत

समाज पुरुषा होई जागृत ॥धृ.॥

या पृथ्वीच्या पावन पृष्ठी व्यक्तिहूनी अतिश्रेष्ठ समष्टी ।
तूच समष्टी तुझीच सृष्टी तूच कासया होसी निद्रित? ॥१॥

हिंदू तितुका तुझाच अवयव संघशक्ति तव समता सौष्ठव ।
विशालता ती जगास दाखव गती घेउ दे तुझा धर्मरथ ॥२॥

वेद श्रुति हे तव मुखमंडळ इतिहासाची तुला प्रभावळ ।
अजिंक्य केवळ तुझे तपोबळ भीति घालशिल तूच भयाप्रत ॥३॥

तू निजल्याने निजली नीती योद्ध्याहून दो बळी सारथी ।
भारतीयता नुरे भारती ऊठ शाप क्रोधे तू परमत ॥४॥

मोहमूढ तू रणात अर्जुन गीता सांगे माधव गर्जुन ।
कार्य करी तू फळास वर्जुन कुरुतीर्थासी करण्या पूनित ॥५॥

उरी शूरता करात गीता चाल विशाला उभवित माथा ।
अवघ्या विश्वा आण आर्यता ठायी ठायी ध्वजा उभारित ॥६॥

उघड आपुले सहस्र लोचन उठव मानसी निद्रित 'मी' पण ।
टाक तमासी तेजे जाळुन आत्मोद्धारा घेई नव व्रत ॥७॥

वाचक पत्रे

## भटक्या कुत्र्यांच्या नियोजनासाठी योग्य पद्धत असावी

नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अलिकडेच घडलेली एक घटना तर नागरिकांच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करते. भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी आमच्या भागात २० ते २५ वयोगटातील काही तरुण ३-४ दुचाकींवर डबलसीट बसून, हातात जाळी घेऊन, मोठ्या वेगात कुत्र्यांचा पाठलाग करत असल्याचे दिसले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत धोकादायक व असंवेदनशील होती. कुत्र्यांना जाळ्यात अडकवण्याच्या प्रयत्नात ती प्रचंड घाबरली होती, चवताळून इकडे-तिकडे पळू लागली. त्यांच्यामागे मुलांनी भरधाव वेगात गाड्या चालवल्याने अशा परिस्थितीत अपघाताची शक्यता असते. कारण रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना यातील काहीच माहिती नव्हती. घाबरलेले कुत्रे कुणावर हल्ला करण्याची भीती असते, तसेच ते कोणाच्या घरात घुसण्याचा धोका असतो. जग आज कितीही प्रगत झाले असले, तरी अशा अघोरी, जीवघेण्या व अव्यवस्थित पद्धती आजही वापरात असल्याचे चित्र अतिशय खेदजनक आहे. महानगरपालिकेने अशा मोहिमांबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नागरिकांना न देणे, तसेच प्रशिक्षित पथकाऐवजी अशा असुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे हे नक्कीच प्रश्न निर्माण करणारे आहे. नागपूरसारख्या महानगरात असे बेछूट, धोकादायक प्रकार घडत असल्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मनपा प्रशासनाने तातडीने या विषयावर अभ्यास करून वैज्ञानिक, सुरक्षित व मानवीय उपाययोजना राबवाव्यात, ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## निरोगी व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया!

जीवन वाचवणारा, जीवन जगण्याची आशा देणारा आणि मानवतेची सेवा करणारा सर्वोच्च असा व्यवसाय करणाऱ्यांना देवमाणूस असे म्हटले जाते. व्यक्ती मरणासन्न स्थितीत असताना त्याच्यावर योग्य उपचार करून रुग्णाला जीवनदान देणारे डॉक्टर देवमाणूसच आहेत. असे असताना वैद्यकीय क्षेत्रातील गैरप्रकार जेव्हा उघडकीस येतात, तेव्हा मनात भीती निर्माण होते. नुकताच गुजरात येथे झालेला एक गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथील 'जेसीसी हार्ट इन्स्टिट्यूट'ने चक्क ८०० निरोगी व्यक्तीच्या हृदयाची शस्त्रक्रिया करून त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत स्टेंट म्हणजे नळी घातली आहे. हे कशासाठी केले, तर 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजने'तून मिळणारे पैसे कमावण्यासाठी म्हणजेच स्वतःचे खिसे भरण्यासाठी निरोगी व्यक्तींच्या शरीराशी असा नीच खेळ खेळला गेला. २-३ नव्हे, तर शेकडो व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या प्रकरणामुळे चाचणी करणारे, अहवाल देणारे, तसेच संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आतापर्यंत डॉक्टरांनी अनावश्यक चाचण्या करण्यास सांगितल्या, महागडी औषधे दिली, अतिरिक्त शुल्क आकारले आणि कमी अधिक प्रमाणात अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यास सांगितले, अशा घटना घडत होत्या. मात्र गुजरातमधील घटनेने वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासला आहे. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमणे, त्यांनी शंकास्पद रुग्णालयांना अचानक भेटी देणे, तेथील व्यवस्था आणि चाचण्यांची कागदपत्रे तपासणे अत्यावश्यक आहे. तसेच वैद्यकीय शिक्षणात प्रवेश देताना केवळ परीक्षेतील गुण हा एकमेव निकष न ठेवता, नीतिमत्ता आणि चांगले आचरण हे निकषही असायला हवेत.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# महापालिका निवडणूक प्रारूप मतदार यादीवर एकूण ६ हरकती प्राप्त

## नावे दुबार किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचे निर्दशनास आल्यास सूचना करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण सहा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/ग्रापनि२०२३/प्र.क्र. ०३/का-८, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ च्यानुसार मुळ विधानसभा मतदार यादीत राज्य निवडणूक आयोग यांनी अधिसुचति केलेली दि.१ जुलै २०२५ या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी) नसलेले कोणतेही नवीन नाव समाविष्ठ करण्याचे अथवा सदर विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे तसेच यामध्ये कोणतेही नवीन नाव समाविष्ठ करण्याचे अथवा सदर विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे तसेच यामध्ये कोणतेही दुरूस्ती करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाची मतदार यादी तयार करण्याकरीता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

राज्य निवडूणक आयोगाकडून प्राप्त संभाव्य दुबार मतदारनुसार काही नावे दुबार किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आल्यास स्वतः मतदार आणि इतर मतदार यांनी सोलापूर महानगरपालिकेस



लेखी स्वरुपात अवगत करणेबाबत प्राधिकृत अधिकारी सोलापूर महानगरपालिका यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे. याबाबत सर्वेक्षण व खात्री अंती प्रभाग निहाय दुबार मतदारची यादी मतदान केंद्राध्यक्षकडे देण्यात येईल.

प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते २७ नोव्हेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद

### तर गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष /सचिव यांच्यामार्फत अर्ज करावा

आयोगाच्या निर्देशानुसार एकाच सहकरी गृहनिर्माण संस्थेत राहणाऱ्या एकापेक्षा अधिक मतदारांचे सोबतच्या नमुना अ मधील अर्ज त्या संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांच्यामार्फत, त्या संस्थेच्या लेटर हेड वर, संबंधित सचिव किंवा अध्यक्षाच्या स्वाक्षरीने अर्ज सादर करता येईल. हरकत अर्जाचा नमुना निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय. सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय. सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत म तदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे.

### हरकतीचे स्वरूप याप्रमाणे (यामध्ये प्रभाग क्रमांक, हरकतदाराचे नाव आणि कंसात हरकतीचे स्वरुप)

गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत. प्रभाग क्रमांक २० - नुरुद्दीन उस्मान मुल्ला (मतदार यादीतून नांव कमी करणेबाबत), प्रभाग २५ - पाटील धारेश्वर सुभाष (प्रभाग क्र.२५ मधून प्रभाग क्र. २४ मध्ये समाविष्ट करणेबाबत), प्रभाग २५ - पाटील सुगलाबाई सुभाष((प्रभाग क्र. २५ म धून प्रभाग क्र.२४ मध्ये समाविष्ट करणेबाबत), प्रभाग ११ - (रियाज) अहमद कासीम मोमीन (प्रभाग यादीतील प्रभाग यादी येत नसल्याने दुरूस्ती करून मिळणेबाबत), प्रभाग २६ - रोहीत मुकुंद तडवळकर (प्रभाग क्र. २६ मधून प्रभाग क्र.२४ मध्ये समाविष्ट करणेबाबत.), प्रभाग १२ - श्रीकांत रामलू कोंडा (प्रभाग क्र. १२ मधून प्रभाग क्र. १० मध्ये समाविष्ट करणेबाबत).



## आ. अभिजित वंजारी यांची ग्रंथालय कर्मचारी संघटनेने घेतली भेट

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात ग्रंथालय कर्मचारी यांना किमान वेतन दरमाह त्यांच्या खात्यात जमा करावे या इतर मागण्या बाबत माजी मंत्री आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार व आ.अभिजित वंजारी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात येणार आहे त्यासाठी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे पालकत्व स्वीकारून मोर्चाचे नेतृत्व करावे यासाठी आ.अभिजित वंजारी यांच्या दत्त नगर नागपूर येथील ऑफिस मध्ये निवेदन देऊन चर्चा केली मी केलेल्या विनंतीला होकार दिला असल्याचे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे यावेळी त्यांच्या शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी सदाशिव बेडगे, डॉ. रमेश जनबंधू, नथू वहाने,विदर्भ सार्वजनिक ग्रंथालय परिषदेचे समन्वय राजू मासूरकर उपस्थित होते.

## सोलापूर-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसला दौंड स्थानकावर अतिरिक्त थांबा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेने सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई वंदे भारत एक्सप्रेसला दौंड स्थानकावर अतिरिक्त थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती सोलापूर रेल्वे विभागाच्यावतीने देण्यात आली.

ट्रेन क्रमांक २२२२६ सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई वंदे भारत एक्सप्रेस २४ नोव्हेंबर पासून लागू होणार आहे. दौंड येथे सकाळी ०८:०८ वाजता आगमन होईल तर सकाळी ०८:१० वाजता प्रस्थान होईल. ट्रेन क्रमांक २२२२५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस २४ नोव्हेंबर पासून लागू होणार आहे. दौंड येथे रात्री ०८:१३ वाजता आगमन होईल तर रात्री ०८:१५ वाजता प्रस्थान होईल. रचनेमध्ये आणि इतर थांब्यांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेले नाही. सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी प्रवाशांना नवीन थांबा सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## विद्यार्थ्यांना आमंत्रित करत सीडीएसएलने केली आयडीयाथॉनची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६.७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने (''सीडीएसएल'') विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लाँच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.२१ कोटींहून अधिक गुंतवणूकदारांच्या डीमॅट खात्यांच्या मालमत्तेचे डिपॉझिटरी संरक्षण इकोसिस्टम करते. आपले भविष्य घडवण्याच्या या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आमंत्रित करतो,असे नेहल व्होरा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीएसएल म्हणाले. आयडीयाथॉनमध्ये नावीन्य आणि सर्जनशीलतेसाठी एकूण ११.५ लाखांचे बक्षीस दिले जाईल. विजेत्या कल्पनेसाठी ५ लाख, उपविजेत्यांना ३ लाख आणि २ लाख तर चौथ्या आणि पाचव्या स्थानासाठी प्रत्येकी ७५ हजार अशी बक्षिसे दिली जातील.

आयडीयाथॉन २०२५ साठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदणी खुली होईल. एका संघात चार विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक (एकाच संस्थेतील) सहभागी होऊ शकतात. प्रॉब्लेम स्टेटमेंट, मूल्यमापन आणि टाइमलाइनसंबंधातील अधिक तपशील https://ideathon.cdslindia.com/ येथे उपलब्ध आहेत.



**६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा**

**सोलापूर :** सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत हुतात्मा स्मृती मंदिरात शुक्रवारी सायंकाळी अस्तित्व मेकर्स फाउंडेशनने दोन अंकी ''इश्क का परचा'' नाटकाचे सादरीकरण केले. या नाटकास प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/28. वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नावः इलेक्ट्रिकल कामाचा TRD भाग 1) सोलापूर विभागात ट्रामवे OHe चे पारंपारिक OHe मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव. 2) वाडी यार्ड - NRD लाईन्ससाठी CSL वाढवण्यासाठी सोलापूरच्या टोकाकडे 40 मीटरने पॉइंट आणि स्टार्टर सिग्नल हलवणे. अंदाजे किंमतः 2,79,90,701.48. बोली सुरक्षाः 2,90,000/-. पूर्ण कालावधीः 12 महिने. ऑफरची वैधताः 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 23.12.2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-76
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवले आहेत. ई-टेंडर सूचना क्रमांकः 15-2025-SrDENCo. कामाचे नावः सोलापूर विभागातील SUR-वाडी विभागात कंत्राटी PQRS मशीनद्वारे CTR(P)/TSR(P)-47.0 Km काम. कामाची अंदाजे किंमतः रू. 15,26,59,084.43. बयाणा रक्कम 9,13,300/-. काम पूर्ण करण्याचा कालावधीः 12 महिने. देखभाल कालावधीः १२ महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळः 15-2025-SrDENCO - 12/12/2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः 15-2025-SrDENCO - 12/12/2025 दुपारी 3.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइटः www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-78
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) चा करार**

लातूर स्टेशनवर महिलांसाठी राखीव असलेल्या केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) च्या काम काजासाठी करार वाटपासाठी ई-लिलाव सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि सोलापूर स्टेशनवर दोन-पॅकेट प्रणाली अंतर्गत आणि एमपीएस स्टॉल्ससाठी ई-लिलाव. (1) लिलाव कॅटलॉग क्रमांकः SUR-C-CATG-LUR-4G-RE5. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळः बंद-दुपारी 14.00 11.12.2025. स्थानकांचे नावः लातूर येथील चहाच्या स्टॉलच्या वाटपासाठी ई-लिलाव (महिलांसाठी राखीव श्रेणी). पद्धतः IREPS द्वारे प्रक्रिया केली जाणारी दोन-पॅकेट प्रणाली अंतर्गत ई-लिलाव. (2) लिलाव कॅटलॉग क्रमांकः SUR-MPS-2025-5. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळः प्रारंभ- दुपारी 12.00 08.12.2025. बंद 12.40 08.12.2025. स्थानकांचे नावः कलबुर्गी आणि सोलापूर स्थानकावरील MPS स्टॉल्सचा ई-लिलाव. पद्धतः ireps ई-लिलाव (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव. निविदेचा कालावधीः वरील सर्व निविदा वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ताः- सर्व ई-लिलाव तपशील संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल www.ireps.gov वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती.

**एसीएम/वस्तू/सोलापूर**
Akar/Sur-79
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवले आहेत. ई-टेंडर सूचना क्रमांकः 44-2025-SrDENC कामाचे नावः 1-ADEN/BG/KWV अंतर्गत KEM (प्रकार-11 04 युनिट्स), JEUR (प्रकार-2 04 युनिट्स) BLNI (प्रकार-2 04 युनिट्स) आणि WSB (प्रकार-2 04 युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. 2- ADEN/PVR आणि ADEN/LUR अंतर्गत SGRE (प्रकार-2 04 युनिट्स), JTRD (प्रकार-2 04 युनिट्स), ARAG (प्रकार-2 4 युनिट्स), YSI (प्रकार-2 02 युनिट्स) आणि DKY (प्रकार-2 02 युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. 3- DEN/W/SUR उपविभागांतर्गत SUR (प्रकार-III 04 युनिट्स आणि प्रकार-खत ०२ युनिट्स), DEN/LUR उपविभागांतर्गत PJR (प्रकार-II ०४ युनिट्स) आणि YSI (प्रकारपेल 02 युनिट्स) येथे जुन्या क्वार्टर्सच्या जागी क्वार्टर्सचे बांधकाम. अंदाजे किंमत 9,02,55,439.70. बयाणा रक्कम : 6,01,300/- कामाचा कालावधीः 12 महिने. देखभाल कालावधीः 24 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळः 12/12/2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः 12/12/2025 दुपारी 3.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. पूर्णता वेबसाइटः www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-75
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/26. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. कामाचे नावः टिकेकरवाडी (फेज-1) येथील प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपोशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल ढठऊ भाग. अंदाजे किंमतः 5,62,96,465.20. बोली सुरक्षाः 4,31,500/-. पूर्ण कालावधीः 12 महिने. ऑफरची वैधताः 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 15.12.2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-77
तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा


## जाहीर समन्स

रे.मु.नं. १४७/१९९८
निशाण क्र. १६६

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा.श्रीमती पी.एस.गोवेकर साहेब)**

लक्षण निवृत्ती बाबर ---वादी
विरूद्ध
अशोक मारुती नरळे ---प्रतिवादी
वगैरे २
प्रति-
२इ) सारिका सोमनाथ कदम, वय-२२ वर्षे,
धंदा- शेती, रा. कासारवाडी, ता. बार्शी
२फ) तनुजा सौरभ चौगुले, वय-२० वर्षे
धंदा- शेती, रा. चौगुले वस्ती, मुंढेवाडी

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरूद्ध निरंतर ताकीदीचा दावा या न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २४/१२/२०२५ रोजी मध्यान्ही ११-०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रूजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिद्ध होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी. हे जाहीर समन्स आज रोजी माझे सहीनिशी प्रसिद्ध केले असे. आजची ता.१९/११/२०२५.

लिपीक (कोर्टाचा शिक्का)
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ

## जाहीर/नोटीस

रे.मु.नं. ४२१/२०१२
निशाण क्र. ३५

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा.श्री. एस.व्ही.मुंडे साहेब)**

भजनदास अंबऋषी खरात, वगैरे २ ---वादी
विरूद्ध
भागवत रामचंद्र खरात, वगैरे ७ ---प्रतिवादी

तमाम लोकांस विशेषतः मौजे वाळूज ता. मोहोळ, जि. सोलापूर व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मौजे वाळूज येथील भागवत रामचंद्र खरात, अमोल भागवत खरात, अजित भागवत खरात, अविनाश भागवत खरात, अविंदाबाई भागवत खरात, नवनाथ रामचंद्र खरात, गणेश नवनाथ खरात यांच्या विरूद्ध मौजे वाळूज, ता. मोहोळ येथील गट नं. ५१४ व ५१५ या मिळकतीमधुन असलेल्या पाऊलवाटेवरून जनावरे, बैलगाडी, ट्रॅक्टर, ट्रक अगर तत्सम वाहनांनी ने-आण करू नये अगर दावा मिळकतीमधून गाडी रस्ता तयार करू नये अशा प्रकारे प्रतिवादींच्या विरूद्ध निरंतरची ताकीद देवविण्याचा दावा वादी- भजनदास अंबऋषी खरात यांचे मौजे वाळूज, ता. मोहोळ येथील गट नं. ५१४ व ५१५ या मिळकतीमधुन असलेल्या पाऊलवाटेवरून जनावरे, बैलगाडी, ट्रॅक्टर, ट्रक अगर तत्सम वाहनांची ने-आण करू नये अगर दावा मिळकतीमधून गाडी रस्ता तयार करू नये अशा प्रकारे प्रतिवादींच्या विरूद्ध निरंतरची ताकीद देवविण्याचा दावा मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर मोहोळ, यांच्या कोर्टात दाखल केला आहे. तरी त्याचा क्रमांक रे.मु.नं. ४२१/२०१२ असा आहे. ज्याचा हक्क हितसंबंध आहे व त्यात त्यांना म्हणणे मांडावयाचे असल्यास अथवा हरकत असल्यास त्यांनी स्वतः अथवा वकीलामार्फत मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मोहोळ यांचे कोर्टात ही नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपले म्हणणे अथवा हरकत लेखी स्वरूपात मांडावी. अन्यथा मे. कोर्ट पुढील योग्य तो आदेश करेल याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस मे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे प्रसिद्ध केली आहे.

हे जाहीर नोटीस आज रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे १९/११/२०२५.

लिपीक (कोर्टाचा शिक्का)
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ**

## जाहीर/नोटीस

**ॲड. काकासाहेब दत्तु गुंड (लाडोळेकर) यांनी दिनांक ३१.१०.२०२५ रोजी दिलेल्या जाहीर प्रगटनास आक्षेप**

तमाम लोकांस विशेषतः शहर म्युनिसिपल हद्दीतील व बार्शी तालुका परिसरातील लोकांना दिनांक : ३१.१०.२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीशीस माझे अशिल नामे मिनाज इकबाल बागवान यांचा तिव्र आक्षेप असून सदरची मिळकत ही माझे अशिल यांची वडीलोपार्जित मिळकत असून जिल्हा सोलापूर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी महानगर पालिका हद्दीतील मिळकत याचा सिटीसर्व्हे नंबर ३०७३/+४२९३/+४२९४/२-ब यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र ४६.६ चौ.मी. आहे. यामध्ये कच्चे स्वरूपाचे बांधकाम यासह जागा याची चतुःसिमा पुर्वेसःबोळ रस्ता, दक्षिणेस सिटीसर्व्हे नंबर ३०७३ पैकी इम्तीयाज तांबोळी यांची जागा, पश्चिमेसः गल्ली बोळ रस्ता, उत्तरेसः सलिम बागवान यांची वगैरे सर्व तंगदभूत वस्तू व वहीवाटीच्या हक्कासह वर दिलेली मिळकत ही आमचे अशलि यांच्या आजोबाची अब्बास ईस्माईल बागवान यांची वडीलोपार्जित मिळकत होती. तरी माझ्या अशिलाचा वरील मिळकतीमध्ये असलेला वडीलोपार्जित हिस्सा डावलून रहीम अब्बास बागवान, अस्लम अब्बास बागवान, शरीफा अल्लाउद्दिन बागवान, हमीद अल्लाउद्दिन बागवान, समीर उल्लाद्दिन बागवान, शमशाद महेबूब बागवान, इम्रान महेबूब बागवना, रा. बार्शी वरील मिळकतीचे तसे माझ्या अशिलाच्या कब्जेवाटेस असलेली मिळकत विक्रीस काढलेली आहे सदरची मिळकत ही माझ्या अशिलाची वडीलोपार्जित मिळकत असल्याने तसेच माझ्या अशिलाचा हिस्सा डावलण्याच्या हेतून व माझ्या अशिलास अंधारात ठेवून परस्पर व्यवहार करण्याच्या तयारीत असल्याने सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर असून नमूद व्यक्तीसोबत कुठल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, व्यवहार हा बेकायदेशीर असून नमूद व्यक्तीसोबत कुठल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षिस, अथवा मिळकतीचे हस्तांतर होईल असा कुठलाही दस्त नोंद करू नये व व्यवहार करू नये. याउपरही कुठल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास व मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क निर्माण केल्यास तो माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. माझे पक्षकार हे वडीलोपार्जित नमुद मिळकतीमध्ये त्यांचे वारसाचे वाटणीसाठी हिश्यासाठी लवकरच दिवाणी दावा दाखल करणार आहे. वास्तवीक सदरील मिळकत ही वारसाचे वाटणीसाठी वारसामध्ये विवादीत असल्याने कुठल्याही व्यवहारास पात्र नाही याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी करीता जाहीर आक्षेप दिनांक २१/११/२०२५.

**सही/-**
जाहीर आक्षेप देणारा/मार्फत
**ॲड. आप्पासाहेब जे. नागोडे**
**हायकोर्ट, छ. संभाजीनगर**
सेक्टर ४१, गट नंबर २००, प्लॉट नंबर ८४,
शेंद्र जहांगीर ता. जि. छ. संभाजीनगर
मो. नं. ७७२१०६७१३१/९५७९४३३७५५

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

(महाराष्ट्र शासन अंगिकृत व्यवसाय)

**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सोलापूर**

सिंचन भवन, गुरूनानक चौक, सोलापूर क्लब जवळ, सोलापूर.
दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२७३२८५५ Email-eemid1solapur@gmail.com

**ई-निविदा सुचना क्रमांक. ०२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या वतीने सक्षम कंत्राटदाराकडुन खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवण्यात येत आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित रक्कम रु.लक्ष (वस्तु व सेवाकर वगळून) |
|---|---|---|---|
| १. | मौजे बेगमपूर ता. मोहोळ जि. सोलापूर येथील न्यु इंग्लीश स्कूल व ज़ु. कॉलेज जवळ भीमा नदीच्या तिरावर संरक्षक भिंत व घाट पायऱ्या बांधणे. | सोलापूर | ७६.५८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधीः- **दि. २६-११-२०२५ ते दि. ०३-१२-२०२५**
ई-निविदा उघडणेः- दि. ०४-१२-२०२५ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. ई-निविदा संबंधी काही अतिरिक्त माहितीसाठी वरील संकेतस्थळावर तसेच संबंधीत हेल्पकोड २४/७ फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
२. निविदा सुचनेबाबतची सविस्तर माहिती व इतर माहितीसाठी खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. व सदर नोटीसमध्ये काही बदल झाल्यास खालील संकेतस्थळावर सूचित करण्यात येईल.

Portal:https://mahatenders.gov.in

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१,**
**सोलापूर.**

**विमाका/पुणे/जाहि./२३३/२०१५-२६**

### दि. ०१.११.२०२५ रोजीच्या पान नं. ७ वरील दुरुस्ती

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**
५०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन ०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | *** राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणाप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. उत्तर सोलापूर, सोमपा हद्दीमधील सर्व्हे न. १५/२. सि.स. नं.६३० सी, पैकी प्लॉट नं. १३, गौरी रेसिडेन्सी, तळमजला, फ्लॅट न. २ चटई क्षेत्र ४९.१८ चौ.मी. व बिल्ट अप ५८.४२ चौ.मी (उताऱ्याप्रमाणे सुपर बिल्ट अप क्षेत्र ५२.२ चौ.मी) | | साईड मार्जिन | स्टेअर केस व लिफ्ट | साईड मार्जिन | रिअर मार्जिन | रु. २२,००,०००/- |
| श्रीशैल शरणाप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर, गट नं. १०६/अ+ब/३ (ऑनलाईन उतारा प्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं.१३०, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३२, क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३३, क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,९०,०००/- |
| | | प्लॉट नं.१३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३७ क्षेत्र १३७.५४ चौ.मी | गट नं. १०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,२५,०००/- |
| | प्लॉट नं. १३१, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. ऐवजी प्लॉट नं.१३०, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. असे वाचावे | | | | | | |
| | *** राखीव किमंत असे वाचावे | | | | | | |

**दिनांक - २३/१०/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारताचे लक्ष्य बरोबरी साधण्याचे


ऋषभ पंत


टेम्बा बावुमा

◆ **गुवाहाटी, २१ नोव्हेंबर**

शनिवारपासून येथील बारसपारा क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका संघादरम्यान दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्याला सुरुवात होणार आहे. शुभमन गिलच्या अनुपस्थितीत ऋषभ पंतला अत्यंत आव्हानात्मक नेतृत्व परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. चांगली तयारी असलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताला बरोबरी साधण्याचे कठीण काम करावे लागणार आहे.

दोन सामन्यांच्या या कसोटी मालिकेत पाहुणा दक्षिण आफ्रिका संघ १-० ने आघाडीवर आहे. कोलकाता येथे खेळला गेलेला पहिला कसोटी सामना ३० धावांनी गमावला. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासाठी आणखी कठीण परीक्षा आहे. त्यांच्या गोंधळात टाकणाऱ्या वक्तव्यांमुळे संघ स्पष्टतेसाठी संघर्ष करीत आहेत.

गत तीन दशकांपासून भारतीय संघांसोबत घरच्या मैदानावर खेळताना अजिंक्यतेचा जो आभास होता तो सध्याच्या कसोटी सामन्यात नाहीसा झाला आहे व तो आता कमकुवत दिसत आहे. २०२४ मध्ये न्यूझीलंडच्या एजाज पटेल व मिशेल सॅण्टनर या फिरकी जोडीने अजिंक्यतेच्या समजुतीला मोडून काढले होते, तर सायमन हार्मर व त्यांचे इतर सहकारी तरुण भारतीय संघाला आणखी असुरक्षित बनवत आहेत. फिरकीपटूंना हाताळण्यासाठी योग्य तंत्राचा अभाव स्पष्ट व धक्कादायक आहे. यात भर म्हणून, खेळपट्टीवर मानसिकतेत मोठ्या प्रमाणात बदल झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

अशा या कठीण परिस्थितीत शुभमन गिलच्या अनुपस्थितीत पंत नेतृत्व स्वीकारणार आहे. लाल मातीच्या बारसपारा खेळपट्टीवर त्याची फलंदाजी त्याच्या निर्णय घेण्याइतकीच महत्त्वाची असेल, याची त्याला चांगली कल्पना असेल.

मानेला दुखापत झाल्यानंतर २६ वर्षीय शुभमन गिलने विश्रांतीसाठी व बरे होण्यासाठी गुवाहाटी शहर सोडले आहे.

गिलची जागा घेण्यासाठी साई सुदर्शन हा सर्वात संभाव्य उमेदवार असल्याचे दिसते, जरी तो तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करतो की वॉशिंग्टन सुंदरला पुढे चालू ठेवण्याची परवानगी दिली जाते हे बघणे शिल्लक आहे. अक्षर पटेल व कुलदीप यादव या फिरकी गोलंदाजांपैकी एक अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीला संधी मिळू शकते. काही वर्षांपूर्वी रोहित शर्माला विश्रांती देण्यात आली, तेव्हा पंतने त्याच प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व केले होते. पण त्याच्या कसोटी क्रिकेटमधील निर्णय घेण्याच्या कौशल्याबद्दल पुरेशी माहिती नाही. आता गुवाहाटीमध्ये पंतला संघ निवडीच्या बाबतीत त्याच्या प्रशिक्षकांना काही विवेकी निर्णय घेण्यासाठी पटवून द्यावे लागेल.

गुवाहाटीच्या मैदानावर पहिला कसोटी क्रिकेट सामना खेळला जात आहे, त्यामुळे कोणत्याही कारणांमुळे सामन्याला गालबोट लागू नये असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांना वाटते.

**-प्रतिस्पर्धी संघ -**

**भारत :** ऋषभ पंत (कर्णधार व यष्टिरक्षक), के. एल. राहुल, यशस्वी जयस्वाल, बी साई सुदर्शन, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, देवदत्त पडिक्कल, आकाश दीप.

**दक्षिण आफ्रिका :** टेम्बा बावुमा (कर्णधार), कॉर्बिन बॉश, देवाल्ड ब्रेविस, टोनी डी झोर्झी, झुबेर हामझा, सायमन हार्मर, मार्को जॅन्सन, केशव महाराज, एडन मार्कराम, विआन मुल्डर, सेनुरान मुथुसामी, लुंगी नगिदी, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स आणि कायले. ◂(वृत्तसंस्था)

**दुसरा कसोटी सामना आजपासून**

**स्थळ :** बारसपारा क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** सकाळी ९.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## डेफलिम्पिकमध्ये शौर्य सैनीला रौप्यपदक




◆ **टोकियो, २१ नोव्हेंबर**

युवा नेमबाज शौर्य सैनीने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन प्रकारात रौप्यपदक जिंकले. या यशाबरोबरच शुक्रवारी येथे डेफलिम्पिकच्या नेमबाजी स्पर्धेत भारताचे वर्चस्व कायम राहिले.

सैनीच्या रौप्यपदकाबरोबरच भारताने नेमबाजीत आपली पदकांची संख्या १३ वर नेली आहे, यात चार सुवर्ण, सहा रौप्य आणि तीन कांस्यपदकांचा समावेश आहे. गत वर्षी पेरू येथे झालेल्या आयएसएसएफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेतलेल्या व सातव्या स्थानावर येण्यापूर्वी कनिष्ठ गटात अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या २२ वर्षीय सैनीने शुक्रवारी अंतिम फेरीत ४५०.६ गुण मिळवून जर्मनीच्या मॅथियास एरिक हेसच्या मागे स्थान मिळवले. हेसने ४५९.८ गुणांसह एक नवीन डेफ विश्वविक्रम प्रस्थापित केला.

अंतिम फेरीतील दुसरा भारतीय नेमबाज कुशाग्र सिंग राजावत याने यापूर्वी ५० मीटर रायफल प्रोनमध्ये कांस्यपदक जिंकले होते, मात्र यावेळी तो आठव्या स्थानावर राहिला. सैनीने ५८४ गुणांसह या कर्णबधिरांच्या जागतिक विक्रमाच्या पात्रता गुणांसह अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने पात्रता फेरीत अव्वल स्थान मिळविण्याच्या मार्गावर ९६, १००, ९६, ९८, ९७, ९७ अशी मालिका केली होती. ◂(वृत्तसंस्था)

## गिल संघातून बाहेर, तपासणीसाठी मुंबईला जाणार



◆ **गुवाहाटी, २१ नोव्हेंबर**

मानेला दुखापत झाल्यामुळे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याला शनिवारपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यापूर्वी शुक्रवारी कसोटी संघातून बाहेर काढण्यात आले आहे, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी एका निवेदनात म्हटले आहे. कोलकाता येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात फलंदाजी करताना गिलच्या मानेला दुखापत झाली होती आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत गिलच्या अनुपस्थितीत दुसऱ्या कसोटी सामन्यात संघाचे नेतृत्व करणार आहे.

कोलकाता कसोटीच्या दुसऱ्या दिवशी गिलला मानेला दुखापत झाली होती आणि दिवसाचा खेळ संपल्यानंतर त्याला तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले होते. त्याला निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आणि दुसऱ्या दिवशी त्याला सुटी देण्यात आली. तो १९ नोव्हेंबर २०२५ रोजी गुवाहाटीला गेला, असे निवेदनात म्हटले आहे.

दुर्दैवाने, तो दुसऱ्या कसोटीत खेळण्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त नव्हता आणि त्याच्या दुखापतीची अधिक तपासणी करण्यासाठी तो मुंबईला जाणार आहे. गिल आगामी एकदिवसीय मालिका खेळू शकतो का हे पाहणे शिल्लक आहे. आम्हाला खेळादरम्यान पुन्हा दुखापत होऊ नये असे वाटत आहे, असे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी गुरुवारी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)



## व्हीव्हीपी अभियांत्रिकीच्या सृष्टी शेटे हिची राज्य जलतरण व योगा स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

येथील विद्या विकास प्रतिष्ठान अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील संगणक विज्ञान अभियांत्रिकी विभागातील एम.टेक. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सृष्टी श्रीकांत शेटे हिने राज्य विद्यापीठ जलतरण व डायव्हिंग स्पर्धेमध्ये चारही प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.सृष्टीने ५० मीटर फ्रीस्टाईलसह १ मी. स्प्रिंगबोर्ड, ३ मी. स्प्रिंगबोर्ड आणि हायबोर्ड डायव्हिंगमध्ये सुवर्णपदक पटकाविले. तिची ऑल इंडिया अक्वाटिक चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सृष्टीने राज्य योगासन स्पर्धेतही प्रथम क्रमांक पटकाविला. यातही तिची बंगळुरू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमोल चव्हाण, संस्थापक चेअरमन प्रा. डॉ. जी. के. देशमुख, व्हाईस चेअरमन मधुकर कटकोंड, सचिव. रोहित देशमुख, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, विभाग प्रमुख डॉ. प्रीती देशमुख, स्पोर्ट्स इनचार्जप्रा. विवेक बामणे, प्रा. अर्चना मेटकरी आदींनी तिचे अभिनंदन केले.



## आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालय विजेता

**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेस निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले.

**विजेता संघ :** कादंबरी लोकरे, स्तुती लोंढे, तनुश्री बद्दुरकर, अमृता जेंबगी, समृद्धी पतंगे, समृद्धी कवठेकर, श्रावणी हब्बु, तन्वी राऊत, सोनाली ढगे, श्रेया शेळके, अंजली क्षीरसागर, तृप्ती कुंभारीकर.

## पंढरपूरच्या द. ह. कवठेकर प्रशालेचे वर्चस्व

### शालेय जिल्हा कॅरम स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

शालेय जिल्हा कॅरम स्पर्धेत पंढरपूरच्या द. ह. कवठेकर प्रशालेचे खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष व राष्ट्रीय जलतरण खेळाडू उदय चाकोते, वैजिनाथ हत्तूरे यांच्या उपस्थितीत झाले. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले. स्पर्धा पार पाडण्यासाठी संघटनेचे पंच म्हणून अमित कोर्टीकर, स्वप्नील बिराजदार, अशोक पाटील, अब्दुला चौधरी यांनी सहकार्य केले. माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांनी सूत्रसंचालन केले. संघटनेचे सचिव प्रा.डॉ.शिवानंद तोरवी यांनी आभार केले.

**स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे**

**अंतिम निकाल (प्रथम सहा) : १४ वर्षाखालील मुले :** रुद्र बु-हाडे, अर्णव महाजन (दोघे द.ह.कवठेकर, पंढरपूर), प्रदीप सूर्यवंशी (संगमेश्वर प्रशाल हंत्तरसंग कुंडल), रुद्र गायकवाड, विहांग गायकवाड (दोघे द.ह.कवठेकर, पंढरपूर), विराज सांवत (सिंहगड पब्लिक स्कूल केगांव). **मुली :** अनुष्का पाटोळे, श्रावणी हाके, जान्हवी कदम, विदया गवळी ( सर्व द.ह.कवठेकर, पंढरपूर). श्रावणी भिंगारे (आपटे प्रशाला पंढरपूर), संचिता चव्हाण (मनोहरभाऊ डोंगरे प्रशाला, मोहोळ).

**१७ वर्षाखालील मुले :** जयराज दळवी (करमाळा), अर्थव जगदाणे (द. ह.कवठेकर, पंढरपूर), विराज जिरगी (बार्शी), अर्थव खाडे (माळशिरस), वैश्वण घाडगे (दारफळ), भावेश निली (सिध्दराम म्हेत्रे प्रशाला कुंभारी).

**१९ वर्षाखालील मुले :** अर्थव वारकड (द.ह.कवठेकर, पंढरपूर), वरद गादे (सिहंगड, पंढरपूर), विजय शिर्के (दक्षिण सोलापूर), साहील शिंदे (पंढरपूर), करण गायकवाड (दक्षिण सोलापूर), सुदिप अक्कलंगी (दक्षिण सोलापूर)




## इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डचे शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेत वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

गारखेडा (छत्रपती संभाजी नगर) येथे झालेल्या शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कुल स्टेट बोर्डच्या खेळाडूंनी वर्चस्व मिळविले. यात १४ वर्षाखालील मुलांच्या फॉईल सांघिक प्रकारात अतुल चन्नाने सुवर्ण पदक पटकाविले. १९ वर्षाखालील मुलींच्या फॉईल सांघिक प्रकारात रुचिता कणकी व नक्षत्रा कोंगारी, १७ वर्षाखालील मुलींच्या फॉईल सांघिक प्रकारात समृध्दी तिपणे व मुलांच्या ईपी सांघिक प्रकारात पृथ्वीराज घाडगे यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. त्यांना क्रीडा शिक्षक अक्षय माने, प्रशिक्षक निर्जला तवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, अपर्णा कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

## सोलापूरच्या छत्रपती शिवाजी नाईट व अकलूजच्या मोहिते कॉलेजचे वर्चस्व

### आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टींग स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत सोलापरच्या छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज व अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वर्चस्व मिळविले.

शिवाजीने पुरुष गटात ४ व महिला गटात ३ तर अकलूजने पुरुष गटात २ तर महिला गटात ३ खेळाडूंनी अव्वल स्थान पटकाविले. शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे ही स्पर्धा पार पडला. या स्पर्धेमध्ये २५ महाविद्यालयांमधील ४० मुले व २० मुली सहभागी झाले होते. याचे उद्घाटन एस.एस.जी.एम.महाविद्यालय कोपरगावचे उप-प्राचार्य डॉ.घनश्याम भगत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.टिळेकर हे होते. यावेळी क्रीडा परिषदेचे सचिव विशाल होनमाने विद्यापीठाच्या निवड समितीचे अध्यक्ष धनंजय देशमुख, सदस्य संतोष गवळी, दादासाहेब कोकाटे, महाविद्यालय सीडीसी सदस्य डॉ.एच.के. आवताडे,प्रा.व्ही.बी. सूर्यवंशी,डॉ.बाळासाहेब मुळीक, ग्रंथपाल डी.एस.पाटील,डॉ.एन.टी. लोखंडे,डॉ.व्ही.एस.शिंदे,पर्यवेक्षक श्री शेंडगे,कार्यालयीन रजिस्टार राजेंद्र बामणे आदी उपस्थित होते.

स्पर्धा पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळातील क्रीडा शिक्षक प्रा. अरविंद वाघमोडे, संजय राऊत, बाळासाहेब भोसले, लोंढे सर, माजी खेळाडू ऋतुराज गायकवाड, चांदनी मुलाणी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.के.के.कोरे यांनी केले. प्रा.दादासाहेब कोकाटे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.स्मिता पाटील यांनी केले.

**वजनीगटनिहाय अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**पुरुष :** ६० किलो : हार्दिक अविनाश लबडे (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), पृथ्वीराज संतोष गायकवाड (बी. एम.आय.टी.सोलापूर), स्वप्निल दादासो पाटील(उमा कॉलेज पंढरपूर). ६५ किलो : मित्रप्पा (बी.पी.एड कॉलेज सोलापूर), भीमाशंकर मालगोंडे (संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा), युवराज वाघमारे (उमा कॉलेज पंढरपूर). ७१ किलो : आर्यन सणस (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), रिषभ सिंग (संगमेश्वर कॉलेज सोलापूर), अजिंक्य कुमार पोतराज(संगमेश्वर नाईट कॉलेज सोलापूर). ६९ किलो : नित्यानंद पट्टणशेट्टी(संगमेश्वर कॉलेज सोलापूर), ओंकार गरड(बी. पी.एड कॉलेज सोलापूर), रितेश पेढे(संगमेश्वर कॉलेज सोलापूर). ८८ किलो : आयुष मुरूमकर (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), प्रसाद बाळासाहेब जाधव (बी.एम.आय. टी. सोलापूर). ९४ किलो : यशराज सचिन कदम (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज). ११० किलो : अक्षय शांताराम कट्टिमणी (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), सुजित कोळेकर(बी.एम. आय.टी.सोलापूर) ११० किलोवरील : आदित्य सुभाष चव्हाण(शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर).

**महिला :** ४८ किलो : ऋतुजा लक्ष्मीकांत पेंटी(एच.एन.कॉलेज सोलापूर), ५३ किलो (ज्ञानेश्वरी संतोष महाडीक (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), ५८ किलो : आर्या विनय इब्रामपुरकर( शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर) आर्या अर्जुन काटकर (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), ६३ किलो : हर्षदा सचिन पठारे(शवाजी नाईट कॉलेज सोलापूर), शारदा अमर राजुर (सोलापूर), ६९ किलो : साक्षी सोमनाथ घाडगे (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), भाग्यश्री मल्हारी बनकर (अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर), संस्कृती जयकुमार कांबळे (वाय.सी.एम.कॉलेज करमाळा), ७७ किलो : आरती हनुमंत दाडमोडे (बी.पी.एड.कॉलेज, सोलापूर), साक्षी सूर्यकांत अहिरवाडी (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), ८६ किलो : सोनाली विश्वनाथ पवार (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज). ८६ किलोवरील : प्रांजली तुषार पगारे , वैष्णवी नारायण माने (दोघी शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), अस्मिता अजय पताळे (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज).

## सोलापूरच्या संध्याराणी बंडगरला राष्ट्रीय लॉन टेनिसमध्ये ५ पदके



**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

देहरादून येथे झालेल्या वन विभागाच्या २८व्या अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत लॉन टेनिस क्रीडा प्रकारात येथील संध्याराणी बंडगर हिने दोन सुवर्ण व तीन कांस्य अशी पाच पदकांची कमाई केली. महाराष्ट्राकडून खेळताना संध्याराणीने एकेरीत उत्तराखंडचा पराभव करून पहिले सुवर्ण व दुहेरी (प्रौढ गट) अंतिम फेरीत गुजरातचा पराभव करून दूसरे सुवर्ण पटकावले. खुल्या गटातील एकेरीत गुजरातचा पराभव करून पहिले कांस्य व दुहेरी (खुला गट) अंतिम फेरीत मध्य प्रदेशचा पराभव करून दुसरे कांस्य पदक तसेच मिश्र दुहेरी (खुला गट) अंतिम फेरीत मध्य प्रदेशचा पराभव करून तिसरे कांस्य पदक प्राप्त केले. सुधीर सालगुडे हे संध्याराणीचे प्रशिक्षक आहेत . संध्याराणी या येथे सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयात मुख्य लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

## मार्शल आर्ट संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी प्रा. पवार



**जेऊर दि.२१ नोव्हेंबर-**

करमाळा येथील जीवन शिक्षण फौंडेशन या शैक्षणिक संकुलाचे कार्यकारी संचालक प्रा.जयेश पवार यांची शस्त्रांग मार्शल आर्ट सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्रासाठी अध्यक्ष म्हणून तर सचिवपदी अमोल माळी यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सचिव मिलिंद कॅटमोरे यांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांचे यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. गणेश करे- पाटील यांनी प्रा.पवार व माळी यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व तरुणांचा व्यक्तीमत्व विकास, खेळ आणि सामाजिक आरोग्य यांचा समन्वय साधत संस्कारक्षम संपन्न यूवा पिढी निर्माण व्हावी या उद्देशाने शस्त्रांग मार्शल आर्ट महाराष्ट्र राज्य संघटनेचे कार्य सुरू आहे.

## महाविद्यालयीन डायव्हिंग स्पर्धेत बार्शीच्या राजर्षी शाहू कॉलेजचा लोखंडे तृतीय



**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर**

मार्कंडेय जलतरण तलावावर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन डायव्हिंग स्पर्धेत येथील राजर्षी शाहू लॉ कॉलेजचा कुणाल लोखंडेने ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व १० मीटर हायबोर्ड डायव्हिंगमध्ये तृतीय क्रमांक संपादिला. त्यास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता मनोहर सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. वाय. सोनकांबळे यांनी त्याचा सत्कार केला. याप्रसंगी प्रा. शिकारे एम. पी., प्रा.मिठा एम.एस., प्रा.साखरे दीपिका, प्रा. सुरवसे मॅडम, प्रा. समाधान काळे, गव्हाणे एस.एस., कोळी के. वी., कोल्हे ए.जी., वाघे आर. जी., माने एम.एम., कृष्णा सातपुते, ठोंबरे एस.के., शेळके एस.एम.उपस्थित होते. त्याचे शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार, यांनी अभिनंदन केले.

## 'आयएमएस'च्या नमनची राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसई मध्ये इयत्ता आठवी शिकत असलेला विद्यार्थी नमन साखरे याची वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली. यवतमाळ (दिग्रस) येथे झालेल्या राज्य स्पर्धेतून त्याची निवड झाली. त्याला क्रीडा शिक्षक श्री राजकुमार माने व वैष्णवी गडदे यांचे मार्गदर्शन लाभले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### एमआयटी ज्युनिअर कॉलेज बार्शीची इंटर एमआयटी स्पर्धेत चमकदार कामगिरी

**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

लोणीकाळभोर, पुणे येथे झालेल्या इंटर एमआयटी स्पर्धेत बार्शी येथील एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा आणि सांस्कृतिक विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेचे उद्घाटन अखिल भारतीय साहित्य परिषद, पुणे विभाग अध्यक्ष सूर्यकांत नामगुडे आणि एमआयटी एटीडी स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या प्राचार्या डॉ. अश्विनी पेठे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत बार्शीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत श्रेया लोढा हिने बुद्धिबळमध्येर अलीशा अरब हिने थाळी फेकमध्ये सुवर्णपदक पटकावले. फेस पेंटिंगमध्ये ऋषिका गुप्ता हिने रौप्यपदक तर रुपेश भडकवाड याने मुलांच्या थाळीफेकमध्ये रौप्यपदक पटकावले.प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### टेंभूर्णीच्या श्री गणपती फार्मसीची खोखोमध्ये विजयी सलामी

**टेंभुर्णी, दि. २१ नोव्हेंबर-**

टेंभुर्णी येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्चच्या खोखो संघांने डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या झोनल लेव्हल खोखो सामन्यांमध्ये कौतुकास्पद कामगिरी केली. ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने आयोजित केली होती. मुलींच्या संघाने श्री सिद्धेश्वर कॉलेज ऑफ इंजिनियरिंगवर २-१ने विजय मिळवला. संस्थापक सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे, संस्थेचे अध्यक्ष विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यानी त्यांचे कौतुक केले. टीम कोच म्हणून प्रा. धनश्री जाधवर, क्रीडा समन्वयक प्रा.शैलेश पेंदोर व प्रा.महेश दोडतळे यांनी मार्गदर्शन केले.

## निधन वृत्त...

### राधाबाई मामड्याल



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मार्केट यार्ड पाठीमागील जुना रंगराजनगर येथील रहिवासी राधाबाई सत्यनारायण मामड्याल (वय-६५) यांचे शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. प्रसिध्द वैद्य नरसिंहस्वामी मामड्याल यांच्या त्या मातोश्री होत.

### जाडीताबाई यादव



**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

बार्शीतील मराठा सेवा संघांचे जेष्ठ पदाधिकारी रावसाहेब यादव यांच्या मातोश्री जाडीताबाई उद्धव यादव (वय-८४) यांचे शुक्रवारी दुपारी वानेवाडी ता.बार्शी येथे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### राजेश्वरी यंगल



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सुनील नगर येथील राजेश्वरी भुमय्या यंगल (वय-८२) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांना कोणीही वारस नाहीत. पद्मशाली समाजाच्या शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### हरिभाऊ घुगरे



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

साखर पेठ येथील गवळी समाजाचे प्रमुख गाव कारभारी हरिभाऊ धोंडीबा घुगरे (वय-८२) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन बहीण, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शुभदा पाटील-खुपसंगीकर



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

परसबाग सोलापूरचे प्रवर्तक दै.तरुण भारतचे तत्कालीन पत्रकार नारायण पाटील-खुपसंगीकर यांच्या पत्नी शुभदा उर्फ माधुरी पाटील-खुपसंगीकर यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ६२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, एक मुलगी, जावई आणि तीन नातवंडे असा परिवार आहे.

### व्यंकटेश बडगू



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

पूर्वभागातील प्रसिध्द कारखानदार तथा हेरिटेज मणिधारी सांस्कृतिक मंडळाचे नेते श्रीनिवास बडगू यांचे वडील व्यंकटेश राजलिंगम बडगू यांचे गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ रोजी वार्धक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार मुले, मुलगी नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी शांती चौक पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे कार्यकर्त्यांना देणार बुस्टर डोस?

- दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान बैठका, गाठीभेटी अन् इच्छुकांशी संवाद
- पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूरच्या विकासाची अपेक्षा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे हे निवडीनंतर सोलापुरात पहिल्यांदाच येत आहेत. महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने ते दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान सोलापूर शहरात विविध बैठका घेणार आहेत. तसेच काही मान्यवरांची गाठीभेटी अन् इच्छुकांशी संवाद साधणार आहेत. यानिमित्ताने ते कार्यकर्त्यांना जणू बुस्टर डोस देणार असल्याचे सांगण्यात येते.

राज्याचे कृषिमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मदतीला उपसभापती अण्णा बनसोडे यांना सोलापूर शहर जिल्ह्याचे सहसंपर्क मंत्री करण्यासंबंधी निवेदन देऊन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना गळ घातली होती. त्यानुसार अण्णा बनसोडे यांची सोलापूर शहर जिल्ह्याच्या सहसंपर्क मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. दरम्यान, 'पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूरचा विकास करण्याकामी जीवाचे रान करू. केवळ तुमची साथ सोबत हवी आहे. अशी साद अण्णा बनसोडे यांनी सोलापूरचे पदाधिकारी व कार्यकते यांना घातली होती. याकडे लक्ष वेधताना त्यांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी सोलापूरचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे अण्णा बनसोडे यांच्या बैठकीसाठी पिंपरी चिंचवडला गेले होते. तेव्हा शहराध्यक्ष संतोष पवार आणि प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी अण्णा बनसोडे यांच्याकडे सोलापूर शहर जिल्ह्याच्या दौऱ्याची मागणी केली होती. तेव्हा, नोव्हेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात सोलापूरला येण्याचे त्यांनी मान्य केले होते. दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान सोलापुरात दाखल होणार आहेत.

#### इच्छुकांची मोर्चेबांधणी आणि स्वयंसिध्दता

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने उपसभापती तथा सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे सोलापूर दौऱ्यावर येणार असल्याचे समजल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक जोमाने तयारीला लागले आहेत. इच्छुकांची मोर्चेबांधणी आणि स्वयं सिध्दतेची तयारी सुरु केली आहे.

#### अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर वातावरण बदलणार?

उपसभापती तथा सोलापूरचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्याचे आहेत. त्यामुळे त्यांना सोलापूरविषयी आत्मीयता आहे. पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूर विकसित व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. पॉझिटिव्ह माईंडसेट घेऊन काम करत असल्याने, सोलापुरात त्यांच्या ऍक्टिव मोडमुळे विकासाची नवे दारे खुले होतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.

#### पक्षात आणखीन उर्जितावस्था येणार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने यापूर्वीच देखील स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात संपर्कमंत्री आणि सहसंपर्कमंत्री या पदाची नियुक्ती करून जबाबदारी सोपवली आहे. त्यानुसार अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर पक्षात आणखीन उर्जितावस्था येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बनसोडे यांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

#### सांगोला नगरपरिषद निवडणूक

## अध्यक्षपदासाठी ११ तर २३ सदस्यपदासाठी १०३ उमेदवार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२१ नोव्हेंबर -**

शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सांगोला नगराध्यक्ष पदासाठी एकूण २० उमेदवारांपैकी ९ जणांनी माघार घेतल्याने ११ तर २३ सदस्य पदासाठी २३२ उमेदवारांपैकी १२९ जणांनी माघार घेतल्याने १०३ उमेदवार राहिले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

नगराध्यक्ष पदासाठी इंगोले राहूल श्रीमंत, खतीब मोहसीन ईलाही, चव्हाण चंद्रकांत हणमंत, झपके विश्वेश प्रबुध्दचंद्र, नागणे स्वप्निल विश्वंभर, बनकर मारुती तुळशीराम, भाकरे बापुसाहेब भगवान, मंडले उमेश ज्ञानू, माने आनंदा गोरख, मुलाणी शौकत अब्दुल, राऊत मोहन विष्णू हे ११ उमेदवार राहिले आहेत. तसेच २३ सदस्य पदासाठी प्रभाग क्र.१ अ ४ अर्ज, १ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.२ अ ४ अर्ज, २ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.३ अ ४ अर्ज, ३ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.४ अ ३ अर्ज, ४ ब ७ अर्ज, प्रभाग क्र.५ अ ४ अर्ज, ५ ब ३ अर्ज, प्रभाग क्र.६ अ ३ अर्ज, ६ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.७ अ ५ अर्ज, ७ ब ४ अर्ज, प्रभाग क्र.८ अ ४ अर्ज, ८ ब ४ अर्ज, प्रभाग क्र.९ अ ५ अर्ज, ९ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.१० अ ५ अर्ज, १० ब ८ अर्ज, प्रभाग क्र.११ अ ५ अर्ज, ११ ब २ अर्ज, ११ क ४ अर्ज असे एकूण १०३ उमेदवार असल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

#### २६ नोव्हेंबरला चिन्हे वाटप

बुधवार दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता टाऊन हॉल येथे चिन्हे वाटप होईल. एकाच मुक्त चिन्हासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांनी मागणी केली असेल त्या ठिकाणी चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल. सर्व उमेदवारांसमोर सदर प्रक्रिया होईल.

**-सैपन नदाफ,**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

## करमाळा नगराध्यक्षपद : भाजपा उमेदवार देवी यांना राष्ट्रवादी (अप) चा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ नोव्हेंबर -**



करमाळा प्रतिनिधी करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ जागी निवडणूक लढवणार असल्याचे मत करमाळा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भरत भाऊ अवताडे यांनी व्यक्त केले.

करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुसंगाने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आशपाक जमादार कार्याध्यक्ष सुजित बागल तालुका प्रवक्ते एडवोकेट अजित विघ्ने राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरपंच विनय ननवरे, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब मोरे, सुहास ओहोळ सविताताई कांबळे, जयकुमार कांबळे उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रसाद जगताप उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेमध्ये माजी नगरसेविका सविता जयकुमार कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये प्रवेश केला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अपक्ष पुरस्कृत म्हणून त्यांना उमेदवारी दिल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यावेळी पुढे बोलताना भरत भाऊ आवताडे म्हणाले की करमाळा नगरपालिकेचे निवडणूक महायुतीच्या माध्यमातून आम्ही एकत्रच लढवणार होतो. त्या संदर्भात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आमचे नेते संजयमामा शिंदे यांच्याशी आमची चर्चा सकारात्मकपणे चालू होती आम्हाला नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये महायुती म्हणून योग्य जागा प्रतिनिधित्व दिले जाईल असा शब्द त्यांनी दिला होता परंतु ऐनवेळी भाजपच्या वतीने इच्छुकांची संख्या वाढल्याने आम्हाला फक्त तीन जागा देण्यास ची सहमती त्यांनी दर्शवली वास्तविक पाहता आम्ही वीस जागावर लढवण्याची आमची तयारी होती त्या अनुषंगाने दहा जागा तरी आम्हाला मिळतील अशी अपेक्षा होती.

परंतु त्यांनी अपेक्षित शब्द न पाळल्याने आमच्या कार्यकर्त्यांची ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेऊन मुस्कटदाबी होऊ नये म्हणून आम्ही आठ जागी नगरपालिका निवडणूक लढवण्याचा ठाम निर्णय घेतला असून आमचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार जिल्हाध्यक्ष उमेश दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संजयमामा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा नगरपालिका निवडणूक लढवणार असून महायुती म्हणून भाजपच्या नगराध्यक्ष पदाला आम्ही वरिष्ठांच्या आदेशानुसार कन्हैयालाल देवी यांच्या पत्नी सौ सुनीता देवी यांच्या उमेदवारी पाठिंबा देत असून राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा नगरपालिकेची निवडणूक स्वातंत्रपणे लढणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत भाऊ अवताडे यांनी सांगितले आहे.

## अक्कलकोटमध्ये कार्तिक आमावस्येनिमित्त दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २१ नोव्हेंबर -**



कार्तिक अमावास्याच्या मंगल पर्वावर शहरातील श्री शांतलिंगेश्वर हिरेमठासह श्री श्री नवसाचा मारुती मंदिर व हिंदू मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत शेख नुरुद्दीन बाबा दर्गाह समोर हजारो दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाले. श्री शांतलिंगेश्वर हिरेमठाचे शिष्य व भक्तगण यांच्या सहकार्याने आणि शहरवासीयांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मठाधिपती श्री.ष.ब्र. जयगुरू शांतलिंगराध्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात हिरेमठातील श्री रेणुकाचार्य मूर्ती, माजी मठाधिपती लिंगैक्य श्री गुरुशांतलिंग महास्वामीजी व काशी विद्यापीठाचे माजी वरिष्ठ प्रा. लिंगैक्य डॉ. श्री ष. ब्र. श्रीपतीपंडिताराध्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून आकर्षक फुलांची सजावट आणि सुंदर रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. पौरोहित्य वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांनी केले. तर महामंगलारती आझाद गल्ली महिला मंडळांनी केली. या कार्यक्रमाला अडत व्यापारी चंद्रकांत स्वामी, भीमाशंकर करकी, कुंभार समाजाचे अध्यक्ष भीमाशंकर कुंभार, बाबुराव बिराजदार, इरण्णा पाटील, मठाचे व्यवस्थापक कल्लप्पा सोमेश्वर, शरणप्पा कुंभार, अशोक पाटील, शिवप्पा कुंभार, कुंभार समाज महिला मंडळ आदीसह शहरातील शेकडो भाविक उपस्थित होते.

दिपोत्सवाचे महत्त्व प्रकाशाचे आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. हा अंधार दूर करून जीवनात सकारात्मकता, आनंद आणि समृद्धी आणतो. हे सण मानवी नातेसंबंध दृढ करण्यास मदत करते आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करते. मनातील अज्ञान आणि अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश आणणे हा दीपोत्सवामागील मुख्य हेतू आहे.जीवनात सकारात्मक ऊर्जा आणतो आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. **- श्री. जयगुरूशांतलिंगराध्य महास्वामीजी**

कुंभार गल्ली तरुण मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नियोजन केले. हिंदू व मुस्लिम समाज बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत शेख नुरुद्दीन बाबा दर्गाह समोर यावेळी पहिल्यांदाच कार्तिक अमावस्या निमित्त दीपोत्सव साजरा करण्यात आला.

या सोहळ्याने परिसरातील भाविकांचे लक्ष वेधून घेतले. दरम्यान, आकर्षक रांगोळी रेखाटून विविध सामाजिक संदेश रेखाटण्यात आले होते. समितीचे संस्थापक महंमदपाशा पिरजादे, कार्याध्यक्ष कमलाकांत होटकर, विरुपाक्ष कुंभार, सादिक बागवान, राजशेकर कापसे, नंदकुमार जगदाळे, स्वामीराव वाकडे, संजय झिपरे, भगत भोसले,महादेव कांबळे, गुरुनाथ मोकाशी,बसवराज धनोरे,लक्ष्मीकांत कोळी,आकाश मुसळे,आपाशा मलवे आदींनी परिश्रम घेतले. श्री नवसाचा मारुती मंदिरसुद्धा दीपोत्सवाने उजळून निघाले होते.

श्री वटवृक्ष स्वामी देवस्थान लगत असल्याने जागृत मारुती मंदिर आहे. म्हणून याचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे देवस्थानचे पौराहीत्य करणारे गणेश गुमास्ते आहेत. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. शेवटी तिन्ही ठिकाणी प्रसाद वाटप करण्यात आला. भक्तांनी या प्रसादाचा लाभ घेतला.



## मोडनिंब एमआयडीसीबाबत पालकमंत्र्यांना दिले निवेदन

#### दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी,दि.२१ नोव्हेंबर-**

मोडनिंब एमआयडीसी तसेच लोंढेवाडी व वडाचीवाडीसाठी निधी मिळणे व अन्य प्रलंबित कामाबाबत जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

माढा तालुक्यातील मोडनिंब येथील एम.आय.डी.सी. साठी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सोबत मिटीग लावणे, लोंढेवाडी व वडाचीवाडी (अ.उ.) येथे पर्यटनमधून तसेच नागरीसुविधेतून मोठ्या गावासाठी निधी मिळणेसाठी तसेच मागील दोन वर्षातील २५१५ मधील कामे पूर्ण झालेल्या परंतु बीले प्रलंबीत असलेल्या कामांची निधी मागणीची पत्रे दिली तसेच इतर महत्वाच्या कामासंदर्भात चर्चा केली. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे सबंधीतांना आदेश दिले. यावेळी कैलास तोडकरी, लोंढेवाडीचे सरपंच संतोष लोंढे, जाधववाडी (मा) चे मा.सरपंच अमोल चवरे, मोडनिंबचे ग्रा.पं. सदस्य सोमनाथ माळी, भाजपचे सरचिटणीस राहुल केदार, वैभव शिंदे, सुखदेव पवार, विकास शिंदे आदी उपस्थित होते.

## गादेगाव येथील फाटे कुटुंबियांकडून पर्यावरणपूरक पध्दतीने रक्षा विसर्जन

#### परंपरेला दिला फाटा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर -**

तालुक्यातील गादेगावचे माजी उपसरपंच आणि सहकार शिरोमणी कारखान्याचे संस्थापक संचालक ज्ञानेश्वर नारायण फाटे यांचे नुकतेच वृध्दापकाळाने गादेगाव येथे निधन झाले. त्यांच्यावर गादेगाव येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले.

मात्र फाटे कुटुंबियांनी कै.ज्ञानेश्वर उर्फ आप्पा नारायण फाटे यांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवसाचा अर्थात रक्षा विसर्जन कार्यक्रम परंपरागत पद्धतीने रक्षा किंवा



(माती) विसर्जित न करता कै. आप्पांच्या स्मृतींना साजेशा अशा वृक्षारोपणाचा मार्ग स्विकारुन त्यांच्या आयुष्यभराच्या संवेदनशील, समाजप्रिय आणि निसर्गप्रेमी विचारांना डोळ्यासमोर ठेवत जमिनीत खड्डे करुन त्यामध्ये रक्षा मिसळून त्या खड्यातून काही रोपे लावली आणि तिसऱ्या दिवसाच्या पर्यावरणपुरक विधीव्दारे त्यांच्या आठवणींना खरोखरच हिरवाईची शाश्वत भेट दिली. या कार्यक्रमाचे आयोजन करताना फाटे कुटुंबियांच्या मनात देखील वेदना दाटून आल्या. पण त्याच वेदनेतून एक सकारात्मक, पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी पाऊल उचलल्याचे समाधान देखील मिळाल्याची भावना समस्त फाटे कुटुंबियांकडून व्यक्त करण्यात आली.

दरम्यान परंपरागत पध्दतीने केल्या जाणाऱ्या रक्षाविसर्जन कार्यक्रमास फाटा देत या आगळ्यावेगळ्या पर्यावरणपुरक पध्दतीने केलेल्या रक्षाविसर्जन कार्यक्रमा बद्दल समस्त फाटे कुटुंबियांचे गादेगावसह पंचक्रोशीमध्ये सर्वत्र कौतूक केले जात आहे.

#### आप्पांच्या संस्काराचे जीवंत प्रतिक

आज हे केवळ रोप नाही तर आप्पांच्या संस्कारांचे, त्यांच्याकडून मिळालेल्या मायेचे, माणुसकीचे आणि मार्गदर्शनाचे जिवंत प्रतीक आहे. ते वाढत राहील, फुलत राहील आणि आप्पांच्या आठवणींप्रमाणेच आमच्या हृदयात सदैव रुजलेले राहील.

**- नागेश फाटे (प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या उद्योग, व्यापार सेल )**

## महत्वाचे...

### माजी उपसभापती दत्तात्रय शिंदे यांच्यावतीने आज मोफत नेत्र तपासणी

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय भास्कर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळे येथील शंकरशेठ साबळे नेत्र रूग्णालयाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शनिवार, दि.२२ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे सोलापूरमधील बाळे येथील शंकर शेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. ही तपासणी तामलवाडी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळी ९.३० ते ४.३० वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. तपासणीनंतर दोष आढळल्यास संबंधित रुग्णांच्या शस्त्रक्रिया बाळे येथील शंकरशेठ साबळे रुग्णालयामध्ये करण्यात येणार असून रुग्णांची येण्या-जाण्याची व निवास आणि भोजणाची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्तात्रय शिंदे व मित्र परिवाराने केले आहे. दरम्यान, तामलवाडी पंचायत समिती गण मोतीबिंदूमुक्त करण्याचा आपला संकल्प असून, तामलवाडीनंतर इतर काही गावात हे शिबीर राबविण्यात येणार असल्याचाही निर्वाळा माजी उपसभापती तथा युवा नेते दत्तात्रय शिंदे यांनी दिला.



### रंगरेज कलेक्शन कपड्यांच्या दुकानांना आग

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

शहरातील कोंतम चौक येथील रंगरेज कलेक्शन व रंगरेज फॅमिली वेअर या कपड्यांच्या दुकानाना अचानक आग लागून कपड्यांचे नुकसान झाले. गुरुवारी रात्री १०.२० वाजता ही घटना घडली. महापालिका अग्निशामक दलाने तत्काळ ही आग आटोक्यात आणली. कोंतम चौक येथील रंगरेज कलेक्शन व रंगरेज फॅमिली वेअर या कपड्यांच्या दुकानाला आग लागली. भाजपचे माजी सभागृह नेते संजय कोळी, माजी नगरसेवक विनायक विटकर, अविनाश पाटील, राजकुमार पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी या संदर्भात अग्निशामक दलास माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांनी तत्काळ अग्निशामक दलाच्या गाड्या पाठविल्या. अग्निशामक दलाकडून तात्काळ कार्यवाही करून तीन गाड्या पाण्याचा फवारा मारून संपूर्ण आग विझवण्यात आली. अग्निशामकलाच्या त्वरित कार्यवाहीमुळे दुकानातील इतर साहित्य व शेजारील दुकाने यांचे मोठे नुकसान झाले नाही. या आगीमध्ये कोणतीही जिवितहानी झाली नाही, असे अग्निशामक दलाचे सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांनी सांगितले.



### आजपासून बार्शी ते कोल्हापूर हायकोर्ट बस सेवा

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने बार्शी ते कोल्हापूर या हायकोर्ट बस सेवा शनिवार दि. २२ नोव्हेंबरला सकाळी ६ वाजता बार्शी बसस्थानक येथे शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती बार्शी आगार व्यवस्थापक मधुरा जाधवर- दराडे यांनी दिली. बार्शी शहर व परिसरातील नागरिकांना कोल्हापूर येथे हायकोर्ट कामाला जाण्यासाठी सोय झाली आहे. त्यामुळे प्रवाशांनी आनंद व्यक्त केला आहे. सदर बस सकाळी ६ वाजता व दुपारी २ वाजता या वेळेत सुरु करण्यात आली असून बार्शी बसस्थानकातून सकाळी ६ वाजता ही बस निघणार असून कुर्डूवाडी, पंढरपूर, मिरज, जयसिंगपूर, हातकणंगले मार्गे कोल्हापूरला दुपारी १२ वाजता पोहोचेल. तसेच बार्शीला येताना कोल्हापूर ते बार्शी ही बस कोल्हापूरमधून दुपारी २ वाजता निघेल. ही बस हातकणंगले, जयसिंगपूर, मिरज, पंढरपूर, कुर्डूवाडी मार्गे बार्शीला रात्री ८ वाजता पोहोचेल. बार्शी-कोल्हापूर या नवीन हायकोर्ट बससेवेचा सर्व प्रवासी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बार्शी आगाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# कोणतीही एक भाषा जबरदस्तीने लादण्याचा उद्देश नाही : डॉ.जाधव

- सोलापुरात त्रिभाषा धोरण समितीचा जनसंवाद
- साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, पालकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

त्रिभाषा धोरण समितीची रचना ही पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य (कंपल्सरी) करण्यासाठी करण्यात आलेली नाही. कोणतीही एक भाषा जबरदस्तीने लादणे हा समितीचा उद्देश नाही, असे स्पष्ट प्रतिपादन या समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र जाधव यांनी केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरणच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत



त्रिभाषा धोरण समितीच्या वतीने सोलापुरात आयोजित केलेल्या जनसंवाद बैठकीत ते बोलत होते. त्यास साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्या-त्या जिल्ह्याची लोकसंख्या, भाषा-वापराचा भूगोल, मुलांचे शैक्षणिक हित आणि पालकांची गरज, इ. या सर्वांचा विचार करून भाषा धोरण ठरविणे हा समितीचा मुख्य हेतू आहे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, उपस्थितांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम याप्रसंगी बोलताना म्हणाले, सोलापूर हा बहुभाषिक जिल्हा आहे. येथे विविध संस्कृती आणि भाषा एकत्र नांदतात. त्यामुळे त्रिभाषा धोरण राबविताना स्थानिक भाषिक वास्तव, विद्यार्थ्यांचे सामाजिक वातावरण आणि भाषिक विविधता समजून घेऊन निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या बैठकीत मांडलेली सर्व मते, सूचना आणि व्यावहारिक दृष्टिकोन समितीकडून संकलित करून त्यावर विचारविनिमय केल्यानंतर धोरणाचा अंतिम अहवाल राज्य शासनाकडे पाठविला जाणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी डॉ.वामन केंद्रे, डॉ.अपर्णा मॉरिस, डॉ.सोनल कुलकर्णी-जोशी यांनीही मनोगत व्यक्त केले.

#### हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा द्या

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा मानली जाते. तर इकडे भारतातील विविध राज्यात विविध भाषा बोलल्या जातात. तसे पाहता देशभरात हिंदी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा दिल्यास देशातील कोणत्याही राज्यात गेल्यास भाषेचा अडथळा येऊ शकत नाही, असे मत दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी या समितीजवळ व्यक्त केले.

यावेळी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वटारे, डायट अधिव्याख्याता गजेंद्र जमादार, बुधाराम आदी उपस्थित होते. विस्तार अधिकारी सुहास गुरव यांनी सूत्रसंचालन केले.





# बाळे येथील श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी नवरात्र उत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर**

तीर्थक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी नवरात्र उत्सवास (देवदीपावली) आज प्रारंभ झाला. चंपाषष्ठी षडरात्र श्री खंडोबा देवाचा प्रमुख उत्सव मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदेस देवाची घटस्थापना मोठ्या उत्साहात श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात करण्यात आली. आजपासून पाच दिवस दिवे प्रज्वलित करून धार्मिक विधींची सुरुवात करण्यात आली.

ज्या भक्तांच्या घरी खंडोबा कुलदैवत आहे. त्या भक्तांच्या घरांमध्ये ही घटस्थापना करण्यात आली. प्रतिपदेस घटस्थापना करून सहा दिवस हा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. घरातील कुटुंब प्रमुख उत्सवात उपवास केला जातो. घटावर फुलांची माळ सोडली जाते. चंपाषष्ठीस गटाचे उद्यापन करून कुलधर्म कुलाचार केले जातात. या धार्मिक विधीसाठी प्रत्येकी ५ काळ्या खारका, ५ फळे, १ डझन केळी, सव्वा किलो हळद, तांदूळ, ताम्हण, तांब्या, उदबत्ती, कापूर, हळदी, कुंकू, कापसाचे वस्त्र, नवीन कापड,५ लिंबू, हळद कुंकू भरून खोबरे वाटी एकात हळद व एकाच कुंकू, पांढरा दोरा प्रासादिक साहित्यांनी धार्मिक विधी संपन्न करण्यात आला. सहा दिवस समई पेटती ठेवावी लागते, असे सांगण्यात आले.

**पूजेची मांडणी :** ताम्हनामध्ये धान्य तांदूळ घेऊन त्यावर तांब्या अथवा पंचपात्र मांडण्यात आले. तांब्याच्या बाहेरील बाजूस सूत गुंडाळावे व कलशाची विधिवत पूजा करण्यात आली. घटासमोर ५ विडे मांडून त्यावर खारीक, खोबरे, बदाम, सुपारी, हळकुंड ठेवावे व देवांच्या शिपायाचे २ विडे ठेवण्यात आले. त्यावर सुपारी व लिंबू ठेवून भंडारा, गुलाल लावण्यात आला. ताम्हणामध्ये भंडारा पसरून त्यावर ५ विड्याची पाने व त्यावर सुपारी खोबऱ्याचे तुकडे व मधोमध भंडारा खोबरे वाटी ठेवावी. ५ मुलांना बोलवून येळकोट येळकोट म्हणत तळी उचलण्यात येते, असे श्री खंडोबा मंदिराचे पुजारी गणेश पुजारी यांनी सांगितले.

# स्थानिक राजकीय परिस्थिती पाहून आघाडीचा निर्णय घेणार

- खा.धैर्यशील मोहिते-पाटील
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

आगामी महापालिकेच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थिती पाहून आघाडीचा निर्णय घेणार असून, आघाडी करण्याबाबत आपला पक्ष सकारात्मक असल्याचे मत खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.



यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्या प्रमुख शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी हुतात्मा शॉपिंग सेंटर येथे कार्यान्वित केलेल्या नव्या शहर व जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यालयचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. २०१२ मध्ये महापालिकेच्या निवडणुकीत याच कार्यालयाच्या माध्यमातून कामकाज करताना १७ नगरसेवक निवडून आणले होते. कार्यालयातून भविष्यात महानगरपालिका निवडणुकीत १७ पेक्षा जास्त निवडून आणण्याचा मानस शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी व्यक्त केला. यावेळी भारत जाधव, शंकर पाटील, यु एन बेरिया, गोविंदराज एकबोटे, राजा शेख, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, दिनेश शिंदे, सुनिता रोटे, जावेद खरेदी, बिस्मिल्ला शिकलगर, अजित पात्रे, मोहम्मद इडिकर, मोनिका सरकार, सीया मुलानी, मनीषा माने, गौरा कोरे, प्रतीक्षा चव्हाण, सिद्धारूढ निंबाळे, जनार्दन बोराडे, प्रविण इराकशेट्टी, डॉ दादाराव रोटे, संपन्न दिवाकर, प्रशांत गायकवाड, सरफराज शेख, राजू कुरेशी, अक्षय जाधव, अमित मोतीवार, मुसा आत्तार, बिराप्पा बंडगर, लखन गावडे, संजय जाबा, विजय भोईटे, मिलिंद गोरे, अक्षय बचुटे, सिद्धार्थ सर्वगोड उपस्थित होते.

# पद्मशाली बांधवांकडून तिरुपतीच्या पद्मावतीदेवीला माहेरची साडी अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

तिरुपतीनजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवीला सोलापूरच्या पद्मशाली समाजातील २५ जोडप्यांनी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण २५ तसेच समाजबांधवांतर्फे सामूहिक 'पुट्टींटी पट्टूचिरा' अर्थात माहेरची साडी अर्पण करण्यात आली.

तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात सध्या ब्रह्मोत्सव सुरू आहे. या मंदिरात देवीला सोलापूरच्या पद्मशाली बांधवांना माहेरची साडी अर्पण करण्याचा मान आहे. सोलापुरातील पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेच्या माध्यमातून गत अनेक वर्षांपासून साडी अर्पण करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. यंदा या उपक्रमात पद्मशाली समाजाचे २५ जोडपी सहभागी झाली. त्यांनी प्रत्येकी एक असे एकूण २५ तसेच सामान्य समाजबांधवांच्या सामूहिक देणगीतून एक असे मिळून एकूण २६ रेशमी महावस्त्र देवीला अर्पण करण्यात आल्या. यंदा हा कार्यक्रम शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी नियोजित होता. याकरिता पद्मशाली बांधव गुरुवारी २० नोव्हेंबरला तिरुपती येथे पोहोचले होते. मात्र



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पद्मावती देवीच्या दर्शनासाठी शुक्रवारी येणार असल्याने देवस्थानच्या सूचनेनुसार सोलापूरच्या पद्मशाली बांधवांनी गुरुवारीच माहेरची साडी अर्पण केली. साडी अर्पण कार्यक्रमावेळी पद्मशाली बांधवांनी पद्मावतीदेवी मंदिर परिसरात भगवान बालाजी, पद्मावती, जय मार्कंडेय, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोषात केला.

या कार्यक्रमानंतर पद्मशाली बांधवांनी तिरूमला येथे जाऊन भगवान बालाजींचे दर्शन घेतले. यावेळी समितीचे संस्थापक माजी महापौर जनार्दन कारमपुरी, अध्यक्ष अंबादास बिंगी, सचिव व्यंकटेश पडाल, सहसचिव गोपीकृष्णा वड्डेपल्ली, खजिनदार नागेश सरगम, दतू पोसा, श्रीनिवास करली, दामोदर पासकंटी, व्यंकटेश दोंता, विश्वंभर मामडयाल, दिगंबर इप्पलपल्ली, श्रीहरी म्याकल, लक्ष्मीनारायण दुस्सा, माधवी अंदे, सुलक्षणा पोन्नम, लक्ष्मण पुल्ली, जयंत कोंडा, अजय पोन्नम, पापय्या दिकोंडा, मनोहर गुर्रम, नरेंद्र आडम, नामदेव बल्ला,पेंटा, कोटा आदी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

या यात्रेचे नियोजन पुण्य श्रीवारी सेवाचे स्वाती चिटकेन, रघुनंदन चिटकेन व प्रज्ञा इप्पलपल्ली यांनी केले.

# भाजपाने मारवाडी समाजाला तीन प्रभागात द्यावी उमेदवारी

- सकल मारवाडी आणि राजस्थानी समाजाची मागणी
- तीनही आमदारांना देणार निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मारवाडी समाज हा भारतीय जनता पार्टीचा पारंपारिक मतदार आहे. गेल्या अनेक निवडणुकांपासून या समाजाने भाजपाच्या पाठीशी आपली ताकद उभी केली आहे. त्यामुळे आगामी सोलापूर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत मारवाडी समाजाला प्रभाग क्रमांक एक, चार आणि पाच या तीन प्रभागांमध्ये भाजपाकडून उमेदवारी द्यावी, अशी मागणी सकल मारवाडी समाज आणि राजस्थानी समाजाकडून भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

सोलापूर शहराच्या तीनही विधानसभा मतदारसंघात मारवाडी समाज मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या अनेक लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकांमध्ये मारवाडी समाजाने भाजपाच्या पाठीशी आपली ताकद उभी करुन भाजपचे उमेदवार निवडून आणले आहेत. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून मारवाडी समाजाला सोलापूर महानगरपालिकेत भाजपाकडून प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. त्यामुळे मारवाडी समाज आणि राजस्थानी समाजात मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे. मारवाडी समाजाने एक गठ्ठा मते देऊन भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून आणण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे.




मात्र पक्षाकडून मारवाडी आणि राजस्थानी समाजावर अन्याय होत असल्याची भावना समाज बांधवांमध्ये निर्माण झाली आहे.

दरम्यान, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी सांगितले की, मारवाडी समाजाच्या योगदानाचा विचार करुन आगामी महापालिका निवडणुकीत मारवाडी समाजाला तीन ठिकाणी उमेदवारी देण्याबाबत पक्षाकडून सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील. सकल मारवाडी आणि राजस्थानी समाजातर्फे शहरातील तीनही आमदारांना निवेदन देत समाजाकडून मागणी करण्यात येणार असल्याचे मारवाडी व राजस्थानी समाजाचे श्रीनिवास दायमा आणि जवाहर जाजू यांनी सांगितले.

याप्रसंगी चंद्रकांत तापडिया, अनिल जोशी, उमेश लोया, प्रवीण चंडक, गिरीश जाखोटिया, भगवती व्यास, भाऊ पारिख, गोविंद उपाध्ये, आशिष उपाध्ये, आनंद शर्मा, गोकुळ झंवर, श्रीकांत लड्डा, ओमप्रकाश व्यास आदी उपस्थित होते.

# चामुंडा देवीच्या मुर्तीवर आढळला कदंब राजवंशाचा शिलालेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथे प्राचीन महादेव मंदिरामध्ये असलेल्या चामुंडा देवीच्या मूर्तीवर शिलालेख आढळल्यामुळे मराठवाड्याच्या इतिहासावर नव्याने प्रकाश पडला आहे. येथील चामुंडा देवीची मूर्ती चतुर्भुज आणि चार फूट उंच, तीन फूट रुंद आहे. देवी पद्मासनात बसलेली आहे. तिच्या पोटावर विंचू आहे. हातात डमरु, त्रिशूल, खडकवांग, नरमुंडके व खंजीर आहे. देवीच्या एका मांडीच्या खालील बाजूस मोठे नरमुंड आहे तर दुसऱ्या मांडीच्या खाली एडक्याचे मुंडके आहे.

अशा या भयावह मूर्तीच्या खालील बाजूस पट्टीवर हळ्ळेकन्नड लिपीत तीन ओळीचा शिलालेख कोरलेला आहे. 'कदंबकुळातील महामंडळेश्वर कुमार सोमदेव' याने ही देवीची मूर्तीची निर्मिती करून मूर्तीची मंदिरामध्ये प्रतिष्ठापना केली असा त्या शिलालेखावर उल्लेख आहे. कंदब राज्यकर्त्यांनी



बनवासी (आजचे उत्तर कर्नाटक) येथे इ.स.चौथ्या शतकात राज्य स्थापन केले. नंतर कदब वंशाच्या विविध शाखा हंगल, गोवा, त्रिपरवट, नालगुंड अशा अनेक भागांत कार्यान्वित झाल्या पुढे काटी-सावरगावात या वंशातील काही अधिकारी किंवा सामंत स्थायिक झाले असावेत, हे या शिलालेखावरुन सिध्द झाले आहे. या शिलालेखाचे वाचन प्रा.रवीकुमार नवलगुंद यांनी केले. याकामी अनिल दुधाने यांचे सहकार्य लाभले.

#### महामंडळेश्वर ही प्रतिष्ठित पदवी

'महामंडळेश्वर' ही पदवी तत्कालीन काळातील सामंताधिपती किंवा प्रादेशिक शासक यांना दिली जात असे. राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव काळात ही पदवी प्रतिष्ठेची मानली जात होती. कुमार सोमदेव यांना देखील 'कदंबकुल महामंडळेश्वर' अशी पदवी होती. यावरुन कुमार सोमदेव एखाद्या मोठ्या मंडळाचा प्रशासक किंवा शैव मठाधिपती असावा, असे इतिहास अभ्यासक विशाल फुटाणे यांनी सांगितले.

#### कंदब राजवंशाचा पुरावा

चामुंडा देवी ही शैव-शाक्त परंपरेतील उग्र रुप मानली जाते. चालुक्य, कदंब, राष्ट्रकूट काळात महादेव मंदिरांमध्ये चामुंडा, योगेश्वरी, भद्रकाली, माहिषमर्दिनी अशा देवींच्या मूर्ती स्थापना केली जात. सावरगाव येथील महादेव मंदिरातील चामुंडा देवीची मूर्ती म्हणजे मराठवाड्यातील कदंब राजवंशाच्या सत्तेचा पुरावा आहे, असे इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# उत्तर तहसीलदारांच्या कक्षावर लिहिले चोर

- **प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फासली काळी शाई**
- **गुन्हा दाखल करण्याचे आरडीसींनी दिले आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सर्वसामान्य नागरिकांची कामे न करता केवळ लाच मागणी होत असल्याची तक्रार करीत बुधवारी प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांच्या कक्षाच्या दारावर चोर असे लिहीत त्यांच्या फलकावर काळी शाई फासल्याने एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश आरडीसी अभिजित पाटील यांनी दिल्याची माहिती आज (दि. २१) दिली.

उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाकडून सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेले दाखले वेळेत देण्यात येत नाहीत. यात सातत्याने दिरंगाई करण्यात येते. याबाबत वरिष्ठांकडे तक्रार केल्यानंतरही त्याची दखल घेण्यात येत नसल्याचे यावेळी प्रहार संघटनेचे अध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी सांगितले. कायदेशीर नोंदी घेण्यासाठी तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांकडून सातत्याने लाचेची मागणी करण्यात येते. याबाबत संबधित कर्मचारी यांचे ऑडिओ क्लिपचे पुरावेही माझ्याकडे आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचा आरोपही यावेळी संघटनेच्या वतीने करण्यात आला. या आंदोलनात तहसीलदार कार्यालयात प्रवेश करताना असलेल्या फलकावरही काळे फासण्यात आले. त्यानंतर तहसीलदार निलेश पाटील यांच्या दालनाच्या दारावरही काळी शाई फासण्यात आली. प्रहार संघटनेच्या या आक्रमक आंदोलनाने यावेळी तहसील कार्यालयात चांगलीच खळबळ उडाली. याप्रकरणी अधिकाऱ्यांकडून संबधिताविरुध्द काय कारवाई करायची? याचीही चर्चा उशिरापर्यंत सुरु होती.






### गुन्हा दाखल करायला सांगितले होते : आरडीसी पाटील

प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांच्या कक्षाच्या दारावर चोर असे लिहित त्यांच्या फलकावर काळी शाई फासल्याने उत्तर तहसीलदारांना त्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्याचे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिले होते. यानंतर तहसीलदारांनी गुन्हा दाखल केल्याची माहिती आरडीसी पाटील यांना दिली नाही. इतकेच नाहीतर तहसीलदार पाटील यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता; त्यांनी फोन रिसिव्ह केला नाही.

# अल्पवयीन पिडीतेवर अत्याचार करणाऱ्यास ७ वर्षे सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**



अल्पवयीन पिडीतेवर अत्याचार करणाऱ्यास विशेष जिल्हा न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी ७ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

सतिश कांताराव जिल्ला (वय ४७, रा. सोलापूर) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीतेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.यातील पिडीता ही तिच्या घराजवळ खेळत असताना आरोपी सतिश जिल्ला याने पिडीतेला टीव्ही पाहण्यासाठी स्वतः च्या घरात बोलावून घेतले व तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचवेळी पिडीतेची आई ही पिडीता घरासमोर दिसत नसल्याने तिने पिडीतेला हाक मारली असता पिडीता ही आरोपीच्या घरातून रडत बाहेर आली. त्यावेळी तिच्या आईने पिडीतेला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने आरोपीने अत्याचार करीत असल्याचे सांगितले. त्यामुळे याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्यात तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार यांना आरोपीस अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले. याप्रकरणाची सुनावणी जिल्हा न्यायाधीश सुरवसे यांच्यासमोर झाली. याप्रकरणी सरकारच्यावतीने ५ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पिडीता, फिर्यादी, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. साक्षी ग्राह्य धरून विशेष न्यायाधीश सुरवसे यांनी आरोपी जिल्ला यास ७ वर्षे सक्तमजुरी व २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. प्रकाश जन्नू यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. फिरोज शेख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून महिला हवालदार जहागीरदार यांनी काम पाहिले.

## महत्वाचे...

### मल्लिकार्जुन मंदिरात नंदीध्वज काठीच्या सरावाला सुरुवात

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

शहरातील बाळवीस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिरामध्ये मानाच्या पहिल्या नंदी ध्वजाची नागफणीचे मानकरी सोमनाथ मेंगाने व सुधीर थोबडे यांच्या हस्ते विधीवत पूजन करून सरावास सुरुवात करण्यात आली. यावेळी राजू स्वामी, शिवयोगी होळीमठ, शांतेश्वर स्वामी, निलाआप्पा वाले यांनी पौराहित्य केले. यावेळी श्री सिद्धेश्वर यात्रेतील प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू, जगदीश हिरेहबू, मनोज हिरेहब्बू, विनोद हिरेहब्बू यांच्यासह, जयप्रकाश अमनगी, राजेश अमनगी, राजू भैरवपाटील, विजय भोगडे, रवी कोरे, योगीनाथ कुर्ले , अशोक वाले, गंगाधर कल्याणकर, सोमनाथ सरडे, सागर स्वामी, सागर हुमनाबादकर, प्रथमेश हिरेहबू, शिवराज कडगंची उपस्थित होते.

### पूर्व वैमनस्यातून मजरेवाडी स्टॉपवर दोन गटात हाणामारी

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

पूर्व वैमनस्यातून मजरेवाडी स्टॉपवर दोन गटात झालेल्या हाणामारीप्रकरणी पाचजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषिकेश बहादूर भोसले (वय १७, रा. राघवेंद्र नगर, मजरेवाडी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन शिवराज चव्हाण, श्रीशैल चव्हाण, भिमराव भरले (रा. मजरेवाडी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर श्रीशैल चव्हाण (वय ४०, रा. मजरेवाडी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन ऋषिकेश बहादूर भोसले, नारायण भोसले (रा. राघवेंद्र नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ऋषिकेश भोसले हा मजरेवाडी स्टॉपपवर होता. त्यावेळी त्याच्या शेजारी राहणारे शिवराज चव्हाण, श्रीशैल चव्हाण, भिमराव भरले यांनी जुन्या वादाच्या कारणावरून ऋषिकेश यास लोखंडी कोयत्याने व लाकडी बांबूने मारहाण करून जखमी केले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत. तर श्रीशैल चव्हाण यांच्या फिर्यादीनुसार १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ऋषिकेश भोसले याने चव्हाण यांचा मुलगा शिवराज यास मारहाण केली. त्याचा जाब विचारण्यासाठी श्रीशैल चव्हाण व त्यांची पत्नी हे घराजवळ गेले असता ऋषिकेश भोसले, नारायण भोसले यांनी लोंखडी कोयत्याने व हाताने मारहाण करून जखमी केले. याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.

# पत्नीचा खून करणाऱ्या पतीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

पत्नीस शिवगाळ करून तिच्या डोक्यात लोखंडी खुर्ची मारून तिचा खून करणाऱ्या पतीस प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. मैनुद्दीन अब्बास शेख (वय ६५, रा. कळमण, ता. उत्तर सोलापूर) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. तर लतीफा मैनुद्दीन शेख (वय ५५, रा. कळमण) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.



**कळमण येथे २०२२ मध्ये घडलेली घटना**

याबाबत यास्मीन समीर शेख (वय २१, रा. कळमण) हिने दिलेल्या फिर्यादीवरुन सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आरोपी मैनुद्दीन याची मयत लतीफा ही पत्नी असून फिर्यादी यास्मीन ही सून आहे. हे सर्वजण एकत्र राहण्यास होते. घटनेच्यावेळी मयत लतीफा हिची मुलगी सोहेरा कयुम सय्यद (रा. नान्नज) ही बाळंतपणासाठी माहेरी कळमण येथे आलेली होती. १३ जानेवारी २०२२ रोजी दुपारी १२ च्या सुमारास मैनुद्दीन व लतीफा यांचे भांडण झाले होते. दुपारी ४ च्या सुमारास मयत लतीफा व मुलगी सोहेरा हे घरात असताना मैनुद्दीन याने घरात येऊन लतीफास शिवीगाळ करून भांडण करण्यास सुरुवात केली. दोघांमध्ये शाब्दीक बाचाबाची झाल्यानंतर मैनुद्दीन याने लतीफास घरातून ढकलत बाहेर अंगणात आणून लोखंडी खुर्ची उचलून लतीफाच्या डोक्यात घातली. त्यामुळे खाली पडलेल्या लतीफाला लाकडी बांबूने डोक्यात मारहाण करून तिला गंभीर जखमी केले व मैनुद्दीन तेथून पळून गेला. त्यानंतर सून यास्मीन व मुलगी सोहेरा यांनी जखमी लतीफा हिस उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता १४ जानेवारी रोजी लतीफा या उपचारादरम्यान मयत झाल्या. त्यामुळे सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्यात पोलिसांनी मैनुद्दीन यास अटक करून तपास केला व सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश शर्मा यांच्यासमोर झाली. याप्रकरणी सरकारच्यावतीने ११ साक्षीदार तपासण्यात आले. प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान फिर्यादी यास्मीन फितूर झाली. परंतु, तिची परिणामकारक उलटतपासणी सरकार पक्षातर्फे होऊन तिची साक्ष न्यायाच्या बाजूने निष्प्रभ केली व अभियोग पक्षाचे बाजूने साक्षी पुराव्यातील भाग प्रभावित होत असल्याने न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले.

प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपास अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. त्यावरुन न्यायाधीश शर्मा यांनी आरोपीस जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. आनंद कुर्डूकर यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. सोलनकर यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस उपनिरीक्षक विजयकुमार जाधव, प्रिया जाधव, हवालदार एच पी माळी यांनी काम पाहिले.

# आगामी वर्षात लग्नाचे ४९ मुहूर्त

### अधिक मासामुळे जणू लग्नबंदीचा काळ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

तुलसी विवाहाने यंदाही लग्नसराईस प्रारंभ झाला आहे. तुलसी विवाहानंतरच पारंपरिकपणे विवाहाचे शुभमुहूर्त सुरु होतात. पुढील वर्षभरात म्हणजे सन २०२६ सालात तब्बल ४९ लग्नमुहूर्त असल्याने विवाहसोहळ्यांची धामधूम मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळणार आहे.

२०२५ च्या अखेरीस सात ते आठच विवाह मुहूर्त शिल्लक आहेत. दि. १७ मे ते दि. १५ जून दरम्यान येणाऱ्या अधिक ज्येष्ठ मासामुळे दीड महिन्यांचा जणू 'लग्नबंदी'चा काळही येणार आहे. फेब्रुवारी २०२६ पासून विवाह सोहळे रंगणार आहेत. तुळशी विवाहानंतर देवशयन संपून देवउठणी एकादशीपासून सर्व शुभकार्यांना प्रारंभ होतो. परिणामी, लग्न, गृहप्रवेश, मुंज यांसारखी शुभकार्ये पुन्हा सुरु होतात.

यंदा विवाहासाठी सर्वाधिक मुहूर्त नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे आणि जून २०२६ या काळात आहेत. यामध्ये विशेषतः माघ, फाल्गुन व वैशाख महिन्यांत शुभ तारखांची मुबलकता आहे.

#### आगामी विवाह मुहूर्त...

- नोव्हेंबर २०२५ - २२, २३, २५, २६, ३०.
- डिसेंबर २०२५ - २, ५.
- फेब्रुवारी २०२६ - ५, ६, ८, १०, १२, १४, १९, २०, २१, २५, २६.
- मार्च २०२६ - १, ३, ४, ७, ८, ९, ११, १२.
- एप्रिल २०२६ - १५, २०, २१, २५, २६, २७, २८, २९.
- मे २०२६ - १, ३, ५, ६, ७, ८, १३, १४.
- जून २०२६ - २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २९.
- जुलै २०२६ - १, ६, ७, ११.

विवाह हंगामामुळे हॉटेल्स, मॅरेज हॉल्स, केटरिंग सेवा, दागिने आणि वस्त्र व्यवसाय यांना चांगली चालना मिळणार आहे. येत्या वर्षभरात एकूण ४९ लग्नमुहूर्त असल्याचे गणित आहे. त्यामुळे लग्नासाठी तारीख मिळवण्याची धावपळ वाढणार आहे. दि.२२ नोव्हेंबरपासून लग्नसराईचा पहिला टप्पा सुरु होईल. नोव्हेंबर मध्ये सहा आणि डिसेंबर २०२५ मध्ये दोन असे एकूण आठच मुहूर्त लग्नासाठी आहेत. २०२६ च्या पंचांगानुसार १७ मे ते १५ जून या काळात विवाह, मुंजी, गृहप्रवेश यासारखे शुभकार्य पूर्णपणे थांबतील, असे स्थानिक पुजाऱ्यांकडून सांगण्यात येते.



# खराब कांद्याने केला शेतकऱ्यांचा वांदा

- **दुय्यम दर्जाचा कांदा, निर्यातबंदीचा बसतोय फटका**


- **व्यापारी, अडते, खरेदीदार यांच्यासमोर पेच**
- **बाजार नासवण्याची व्यक्त केली जातेय भीती**
- **लागवडीपासून ते काढणीपर्यंत हजारोंचा खर्च उत्पन्न तुटपुंजे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

दुय्यम दर्जाचा कांदा आणि निर्यातबंदीचा पटका बसत आहे. लागवडीपासून ते काढणीपर्यंत हजारोंचा खर्च उत्पन्न मात्र तुटपुंजे अशी परिस्थिती उद्‌भवल्याने व्यापारी, अडते, खरेदीदार यांच्यासमोर पेच निर्माण झाले आहे. दरम्यान, खराब कांदामळे बाजार नासवण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकूणच, काय तर खराब कांद्याने शेतकऱ्यांचा वांदा झाल्याचे सांगण्यात येते.

कांद्याच्या विक्रमी उलाढालीसाठी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सर्वदूर प्रसिध्द आहे. मात्र या समितीमध्ये विक्रीसाठी आलेल्या कांद्याला योग्य दर मिळेनासे झाले आहे. दुय्यम दर्जाचा खराब कांदा आणि निर्यातबंदी यामुळे कांद्यांची मागणी घटून दरात घसरण कायम आहेत. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची आवक कमी असताना देखील कांद्याचे दर वाढत नसल्याने शेतकरी चिंताक्रांत बनला आहे.





कांदा पिकवण्यासाठी आलेला भरमसाठ खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हातामध्ये कवडीमोल उत्पन्न मिळत आहे. एकरी ५० हजार इतका खर्च आला असता कांद्याची पट्टी २० हजाराची प्राप्त होत, असल्याने खर्च वजा जाता उत्पन्नचा ताळमेळ कसा बसवावा? असा यक्षप्रश्न बळीराजासमोर निर्माण होत आहे. सध्या शेतकरी बारमाही कांदा उत्पादन करत आहे. मात्र कांद्याचे खरे हंगाम खरीप हंगाम असून या हंगामातच कांदा शेतकऱ्यांना मोठे उत्पन्न प्राप्त करून देतो. परंतु सध्याचा खरीप हंगामात कांद्याचे दर गडगडल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा वांदा निर्माण झाला आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन, उडीद आणि कांदा अशी पिके पाण्याखाली गेल्याने ते पूर्णतः उध्वस्त झाले. खराब कांदा बाजारपेठेत विक्रीस आल्याने खरेदीदार कांदा घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यामुळे लिलावात कांद्याच्या बोलीला म्हणावा तसा, उठाव दिसून नसल्याचे चित्र आहे. सोलापूर बाजार समितीमध्ये गेल्या काही दिवसांपासून कांद्याचा सरासरी घाऊक दर हा ४०० ते ६०० रुपये याप्रमाणे आहेत. सर्वाधिक दर हे १,४०० ते १,६०० इतके आहेत. सर्वात कमी दर हा १०० ते २०० रुपये असा दर लिलावावत मिळत आहे. तर जुन्या कांदा सुमारे २ ते २,५०० रुपये याप्रमाणे घाऊक बाजारात विकला जात आहेत. सर्वात कमी दर हे ५०० रुपये याप्रमाणे आहेत. गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर सरासरी १,४०० रुपयांच्या पलीकडे गेले नाहीत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी सरकारकडे दरवाढीची अपेक्षा किंवा हमीभाव द्यावा, अशी मागणी करत आहे.

#### गतवर्षी होता चार ते पाच हजारांचा दर

सोलापूर बाजार समितीमध्ये गतवर्षीच्या ऑक्टोंबर ते नोव्हेंबर या महिन्यात कांद्याला चार ते पाच हजार रुपये प्रति क्विंटल असा दर होता. सरासरी दर देखील दोन हजार रुपये पर्यंत होता. त्यामुळे शेतकरी दरावर समाधानी होते. यंदा मात्र खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ बसेनासे झाले आहे.

**- सादिक बागवान, कांदा व्यापारी, सिध्देश्वर सोलापूर बाजार समिती**

#### खराब कांद्यामुळे दरात घसरण

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी आपला कांदा विक्री करण्यासाठी सोलापूर सिद्धेश्वर बाजार समितीमध्ये आणत आहेत. त्या कांद्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दुय्यम दर्जाचा कांदा आहे. ज्यामुळे कांद्याचे दर घसरललेच आहेत. निर्यात बंदी शिथिल केल्यास उच्च प्रतीचा कांदा देशाबाहेर विकला जाईल. परंतु खराब कांदा मोठ्या प्रमाणात असल्याने त्याची विक्री होणार नाही. त्यामुळे त्याचा दरावर परिणाम होणार आहे.

**- नासीर खलिफा, कांदा अडते व व्यापारी सिद्धेश्वर बाजार समिती सोलापूर**

#### कर्ज काढून जीवन कंठत आहेत

एक हेक्टर क्षेत्रफळात कांद्याच्या लागवडीपासून ते कांदा काढणीपर्यंत भरमसाठ खर्च येतो. आजच्या घडीला कांद्याचे बी-बियाणे देखील मोठ्या प्रमाणात महाग झाले आहेत. खते आणि तणनाशक यांचे देखील दर वाढलेले आहेत. अशा अवस्थेत खर्च जास्त उत्पन्न कमी झाल्यास कर्ज काढून शेतकरी जीवन कंठीत आहे. यावर शासनाने निर्णय घ्यावा.

**- बालाजी वाघमारे, कांदा उत्पादक शेतकरी अहिल्यानगर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ८० हजार शेतकऱ्यांचे अनुदान ई-केवायसीच्या कचाट्यात

## ई-केवायसीसाठी भाऊसाहेबांची धडपड सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आणि यातील सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ५ लाख ७८ हजार २२८ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७०७ कोटी ५४ लाख ५९ हजार १०७ रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ४ लाख ३६ हजार ५१६ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ५३३ कोटी ४० लाख ४३ हजार ३०९ रूपये झाले जमा झाले आहेत आणि ईकेवायसीअभावी पावणेदोन लाख शेतकऱ्यांचे २१२ कोटी २३ लाख पेंडिंग पडले आहेत. दरम्यान, ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे अजूनही तब्बल ८० हजार ७७६ शेतकऱ्यांचे ८९ कोटी ७६ लाख ४७ हजार ०४२ इतकी रक्कम अडकली आहे.

अतिवृष्टी होवून दीड महिना झाले तरी अजून ८० हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेण्यासाठी अडचण येत आहे. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यांसाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. ई-केवायसी नसली तरी आता फार्मर आयडी शेतकऱ्यांसाठी गरजेचा आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यावर सध्या थेट रक्कम जमा होवू लागली असून, अॅग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

जिल्ह्यात ६ लाख ९० हजार ७३६ इतके पीएम किसान सन्मान योजनेत शेतकरी समाविष्ट आहेत; यातील ६ लाख ५३ हजार १०७ शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅक केलेला आहे. आता प्रशासनाने चालू केलेल्या अॅग्रीस्टॅक शिबिरांमुळे ही संख्या वाढली आहे. यामुळे याद्या जसजशा अपलोड होत आहेत; त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत. हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या थोड्याच दिवसात पैसे मिळणार आहेत. गावोगावी शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, अॅग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विविध भागातील नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने जिल्ह्यात दौरा केला आहे. त्याचेही अहवाल केंद्राकडे जाणार आहेत. त्या काळात महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.

### गाव पातळीवर शिबिराचे आयोजन

अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम सध्या सुरु आहे. फॉर्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांचे फॉर्मर आयडी नाहीत, अशा शेतकऱ्यांची ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गाव पातळीवर शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी तलाठी यांना आदेश देण्यात आले आहेत; अशीही माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहीरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरीच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

## ज्ञानामृत आनंदलहरी १२७४

**जळो त्याचे ज्यालें पण ।**
**न देखेचि समचरण ।।**

पंढरीचा पांडूरंग हा केवळ समचरणी उभा नाही. तर त्याचे वर्तन आणि संदेशही समत्वाचा आहे. डोक्या खांद्यावर, हातावर, हातात, काखेत आदि ठिकाणी त्यांनी चोखा, नामा, ज्ञाना, मुक्ताई, जनाई, गोरा या सर्व संतांना स्थान दिले आहे. विठोबाच्या या वर्तनातून म्हणजेच कृतीतून संपूर्ण मानव जातीला समतेचा संदेश मिळतो. कर्तव्य हाच मानवतेचा खरा आधारस्तंभ असल्याने हा विठ्ठल कष्टकऱ्यांच्याच मदतीला जातो. केवळ त्याचे नाम घेतले म्हणजे झाले, असे याच्या बाबतीत होत नाही. कर्तव्य हीच पूजा मानणाऱ्यांच्या सेवेत हा पांडूरंग तत्पर असतो. म्हणूनच त्याने संत चोखाबा सोबत ढोरे ओढली, सजन कसाया सोबत मांस विकले, संत रोहिदासासोबत चर्म रंगले, सावता महाराजांसोबत खूरपले, संत एकनाथांच्या घरी पाणी भरले. यावरून सम चरणी उभा असलेला पांडूरंग कष्टकऱ्यांचा साथी असल्याचे दिसून येते. स्वतःच्या वर्तनातून समत्व जोपासणाऱ्या,लहान मोठा



किंवा इतर प्रकारचा भेद न करता व कसल्याही प्रकारची अपेक्षा न करता निस्वार्थ भावाने प्रेमाची देवाण-घेवाण करणाऱ्या आणि कर्तव्य करणाऱ्यांना साथ देणाऱ्या या पांडूरंगाचे एकदा तरी दर्शन व्हायला हवे. त्याच्या समचरणावर जीवनात एकदा तरी दृष्टी पडायला हवी आणि या दृष्टीतून आयुष्यभर समत्व जोपासायला हवे. ज्याला हे शक्य नाही, त्याच्या जीवनाला अर्थ नाही. असे रुक्ष जीवन जळो, जे पांडूरंगाचे समचरण पाहात नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, जळो त्याचें ज्यालेपण । न देखेचि समचरण ।। संसारात अडकलेल्या जीवाचे पाय जीवनात अनेक वेळा वाकडे तिकडे पडतात. पाय सातत्याने खालीवर होतात. अर्थात, हे पाय आप-पराच्या भावनेने चालतात. पण पांडूरंगाच्या पायाला आप-पर माहिती नाही. त्याचे पाय नेहमी समत्वासाठी पुढे सरसावतात. त्याला चढ उतार म्हणजे आप-पर, स्वार्थ, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, लोभ माहिती नाही. या चरणाला केवळ निस्वार्थ प्रेम, आपुलकी, कर्तव्य, समता एवढेच माहिती आहे. म्हणून या चरणांचा आदर्श प्रत्येकाने जीवनात घ्यायला हवा. हे चरण केवळ पाहण्यासाठी किंवा त्यावर डोके ठेवण्यासाठी नाहीत तर या समचरणामागील गर्भितार्थ जीवनात प्रत्यक्षात उतरविण्यासाठी म्हणजेच अनुभवण्यासाठी आहेत. ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांना पांडूरंगाच्या या चरणांचा वेगळा अनुभव घ्या, असे सांगण्याची वेळ येत नाही. संत साहित्य माणसाला जीवनाचा खरा अर्थ दाखवून देत असल्याने आपण संत साहित्य मन लावून वाचायला व अनुभवायला हवे. संत साहित्याचा अनुभव म्हणजे दुसऱ्या शब्दांत आनंदाचा अनुभव होय, असे आम्हास वाटते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना मिळते रेल्वे प्रवासात सूट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

भारतीय रेल्वे प्रवासामध्ये ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सवलतीबाबत सर्वांनाच माहिती आहे पण अनेकांच्या नकळत काही गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी देखील रेल्वेने मोठ्या प्रमाणात भाड्यात सूट देण्याची तरतूद केली आहे. या रुग्णांसोबत त्यांच्या परिचारालाही समान सवलतीचा लाभ मिळतो. रेल्वेने निर्धारित केलेल्या यादीतील रुग्णांना भाड्यात ५० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत मिळते.

योजनेअंतर्गत कर्करोग रुग्णांना सर्वाधिक सुविधा दिल्या गेल्या आहेत, फर्स्ट क्लास आणि सेकंड क्लास मध्ये ७५ टक्के सवलत आहे. स्लीपर आणि एसी थ्री टीआर मध्ये १०० टक्के मोफत प्रवास तर फर्स्ट एसी आणि एसी टू टीआर मध्ये ५०% सवलत मिळते. परिचारांना स्लीपर व एसी थ्री टीआर मध्ये ७५% सूट दिली जाते. या सवलतीमुळे उपचारासाठी दूरवर प्रवास करणाऱ्या रुग्णांना मोठा आर्थिक आधार मिळत आहे.

> सवलतीची ही योजना रुग्णांच्या कुटुंबासाठी मोठा दिलासा ठरते. दरवर्षी सोलापूरहून हजारो रुग्ण उपचारासाठी रेल्वे प्रवासात सुविधेचा लाभ घेतात.
>
> **- विक्रम सिंह, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सोलापूर मध्य रेल्वे विभाग**

**ही कागदपत्रे असणे आवश्यक**

सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित रुग्णांकडे सरकारी किंवा मान्यताप्राप्त रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. हे प्रमाणपत्र सादर केल्यावर तिकीट बुकिंग च्या वेळी सवलत मिळते.

**या आजारांवरील मिळते सवलत**

क्षयरोग ट्यूबर्क्लिओसिस, एचआयव्ही - एड्स, कुष्ठरोग, थॅलेसिमिया, हृदयशस्त्रक्रियाचे रुग्ण, मूत्रपिंडाचे रुग्ण, अनीमिया रुग्ण, हिमोलिफिया रुग्ण.



# चतुरबाई श्राविका विद्यालयात बालजत्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सम्राट चौक येथील चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयात अभ्यासाचा तणाव दूर करण्यासाठी बालमंदिर ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बालजत्रेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी १०० टक्के विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती राखी देशमाने तसेच बालमंदिर मुख्याध्यापिका प्रांजली काटकर, शालेय व्यवस्थापन समिती व पालक संघटना यांच्या हस्ते बालजत्रेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शालेय परिसर फुगेकमान फुले रांगोळीने सजवून विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने भारावून गेला. किती आणि काय खेळावे या भावनेतून विद्यार्थ्यांनी धम्माल मजा मस्ती केली. बालजत्रेत विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजक खेळ, जम्पिंग बलून, मेरी गो राऊंड, इलेक्ट्रिक कार, घोडस्वारी, तसेच आकाश पाळणा, कब बशी, रेल्वे या खेळातून आनंद लुटला. सर्व मुलांना शाळेकडून खाऊ वाटप करण्यात आले. संस्थेचे सचिव यतीन शहा, सीईओ देवई शहा विश्वस्त, करण शहा अंजली शहा, डॉ. रोहिणी शहा, अतुल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली जत्रा भरविण्यात आली. बालजत्रेच्या यशस्वितेसाठी प्रदीप डेरे, रोहन शहा, सुरज व्हसाळे, अरिहंत माणिकशेट्टी यांनी मेहनत घेतली.

# पीक विमा योजना : गहू, हरभरा, कांद्यासाठी १५ डिसेंबरची मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या नुकसानीपासून बचावासाठी रब्बी हंगामातही पंतप्रधान पीक विमा योजना लागू केली आहे. त्यासाठी राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६साठी अधिसूचित क्षेत्रातील गहू, रब्बी ज्वारी, हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग व रब्बी कांदा या ६ पिकांसाठी शेतकऱ्यांना विमा काढता येणार आहे. त्यासाठी अधिसूचित महसूल मंडळ, क्षेत्राची नोंद असणे आवश्यक असल्याचे कृषी अधीक्षक कार्यालयाच्या वतीने माहिती दिली आहे.

अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर सोलापूर, जळगाव, सातारा, परभणी, वर्धा, नागपूर, जालना, गोंदिया, कोल्हापूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यांसाठी भारतीय कृषी विमा कंपनी, धाराशिव, लातूर आणि बीड या तीन जिल्ह्यांसाठी आयसीआयसीआय कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी संबधित बँकेमार्फत विहित नमुन्यात अर्ज भरून देणे आवश्यक आहे. यासाठी विमा योजनेचे पोर्टल कार्यान्वित करण्यात आले असून, जास्तीत जास्त रब्बी उत्पादक शेतकऱ्यांनी योग्य त्या माहितीसह योजनेचा लाभ घ्यावा.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार
दि. २२ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशीर्ष शु. द्वितीया
ऋतु - हेमंत
नक्षत्र- ज्येष्ठा (१६.४६)
योग - सुकर्मा (११.२८)
करण - तैतिल (३०.१९)
....राहू काल....
शनिवार : स. ९ ते १०.३०

दिनविशेष -
२०००: अणूरसायनशास्त्रज्ञ, प्राध्यापक डॉ. हरी जीवन तथा एच. जे. अर्णीकर यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९१२)
२००२: हैदराबाद मुक्तिसंग्राम चे अध्वर्यू गोविंदभाई श्रॉफ यांचे निधन.
२००८: गीतकार रविंद्र सदाशिव भट यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १९३९)




# इच्छा व्यक्त करा व आपला मनपसंत कोर्स शासनाच्यावतीने करा : पंकज पाठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

आपल्याला कोणताही कोर्स करायची इच्छा व्यक्त करा व शासनाच्या वतीने अल्प फी मध्ये किंवा विनामूल्य करा, असे प्रतिपादन मंत्री कौशल विकास रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता महाराष्ट्र राज्य यांचे विशेष कार्य अधिकारी पंकज पाठक यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा सहायक आयुक्त कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर श्रीमती संगीता खंदारे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत बडवे सोलापूर जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मनोज बिडकर संस्थेचे विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड सचिव रुपेश गायकवाड उपस्थित होते.

विश्वकर्मा फाउंडेशन च्या वतीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत मोफत रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणात कस्टमर केअर एक्झिक्युटिव या कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले की, पूर्वी शासनाची योजना होती हात दाखवा व बस थांबवा तसेच आपण आपली एखादा कोर्स करायची इच्छा व्यक्त करावी व शासन तो कोर्स आयटीआयमध्ये स्टेप योजनेअंतर्गत सुरू करेल. हे सरकार आल्यापासून सरकारने आयटीआयच्या पुनर्विकासासाठी विविध उपक्रम केले आहेत. जसे ५११ गावात जी गावे छोटी आहेत ज्याठिकाणी खासगी संस्था पोचू शकत नाही अशा गावात ५११ स्किल सेंटर सुरू करण्यात आले. शासन आपल्या दारी हे वाक्य खरे करण्याचा प्रयत्न आहे. आयटीआय मध्ये न्यू एज कोर्सेसच्या माध्यमातून ॲडव्हान्स कोर्सेस सुरू केले आहेत त्यामुळे आगामी काळात चांगले व्यवसायिक उद्योजक तयार करू. जगभरात लेबरची मागणी आहे त्यामुळे आयटीआय मध्ये विविध देशाच्या भाषा शिकवण्याचे कोर्सेस सुरू केले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष सुहासिनी शाह यांनी मनोगत व्यक्त करताना सोनामाता शाळेमध्ये जी शाळा वंचित समाज व आर्थिक दृष्ट्या कमजोर असणाऱ्या वस्तीत आहे अशा शाळेमध्ये हे प्रशिक्षण केंद्र सुरू होत असल्यामुळे आनंद व्यक्त केला तसेच या परिसरात आणखीन काही तांत्रिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्याची विनंती विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांना केली त्यांनी आपल्या मनोगतात सोनामाता शाळेच्या विकासाची माहिती दिली तसेच प्रिसिजन फाउंडेशनच्या कामाची माहिती दिली

प्रास्ताविक करताना विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी विश्वकर्मा फाउंडेशन सध्या करीत असलेल्या विविध कामाची व प्रकल्पाची माहिती दिली संस्थेची आगामी दिशा काय असेल याबाबत सांगितले. चित्रलेखा अत्रे यांनी रामवाडी लिमयेवाडी या वंचित व आर्थिक दृष्ट्या कमजोर वस्तीत स्वतःची जागा संस्थेस दान देऊन ही संस्था सुरू केली तसेच संस्था उभारण्यासाठी आपले आयुष्य वेचले त्यांच्या या कर्तुत्वाचा सन्मान म्हणून विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी त्यांचा सत्कार केला.

पाहुण्यांचे स्वागत विश्वकर्मा फाउंडेशनचे सचिव रुपेश गायकवाड यांनी केले सूत्रसंचालन चन्नवीर बंकुर यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रशेखर सुतार, श्रीकृष्ण गायकवाड, समर्थ कळके, रेखा केंगार, अनिता आयवळे, लक्ष्मी मिश्किन, पूजा कुडल यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम घेण्यासाठी संस्थेच्या सचिव सुवर्णा अत्रे, मुख्याध्यापक शिंदे यांच्यासह इतरांनी मदत केली.

# प्रताप नगर ते सोरेगाव डीपी रस्त्याचे हद्द निश्चिती करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

**चुकीच्या पध्दतीने काम करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करा**

प्रभाग क्रमांक २३ मधील प्रतापनगर ते सोरेगाव या डीपी रस्त्याचे डीमार्केशन अर्थात रस्ता हद्द निश्चिती त्वरित करावी. हद्दवाढ भागातील रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा ही कामे चुकीच्या पद्धतीने करणाऱ्या महापालिकेच्या अधिकारी व नियंत्रण अधिकार्यांवर चौकशी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

जनता दरबारात महापालिका अधिकाऱ्यांना या संदर्भात निवेदनही देण्यात आले आहे मात्र कोणतीही दखल घेतली जात नाही, असा आरोप प्रा. भोजराज पवार यांनी केला आहे. प्रताप नगर व परिसरातील नगरात सुमारे सात हजार लोकसंख्या आहे. या ठिकाणी येण्या - जाण्याकरिता प्रताप नगर ते सोरेगाव हा एकमेव डीपी रस्ता आहे. येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता मंजूर असून ठेकेदाराला वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सध्या सुरू आहे. या डीपी रस्त्याच्या आजूबाजूला अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत. काही बांधकाम व्यवसायिकांनी या भागात प्लॉटिंग केले आहे. अतिक्रमण झाल्याने शेतकरी आणि बांधकाम व्यवसायिकामध्ये वाद होत आहेत. यामुळे या रस्त्याचे डीमार्केशन त्वरित करावे. प्रताप नगरला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन वरील व्हॉल्व व महावितरण विभागाचे हाय टेन्शन लाईन त्वरित इतरत्र हलविण्यात यावी. हद्दवाढ भागात ड्रेनेज लाईनचे काम झालेल्या रस्त्यांचे त्वरित खडीकरण आणि डांबरीकरण करण्यात यावे. सेंट थॉमस स्कूल ते सोरेगाव पर्यंत ड्रेनेज लाईन चुकीच्या पद्धतीने टाकण्यात आली आहे. जुन्या वांगी डीपी रस्त्याचे डी मार्केशन केल्यानंतर या भागातील लेआउट मंजूर करावे. जगदंबा नगर येथे टाकलेल्या ड्रेनेज लाईनची पातळी वर आणि येथील घरांची पातळी खाली आहे. यामुळे या ड्रेनेज लाईनचा उपयोग होत नाही. त्यामुळे त्वरित लेवल प्रमाणे ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी. या संदर्भात महापालिका प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी अन्यथा कॉंग्रेसच्या वतीने मोठे जन आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार यांनी यावेळी दिला. या पत्रकार परिषदेस सचिन पवार, प्रवीण चव्हाण, तुकाराम राठोड उपस्थित होते.

# खो-खो विश्वविजेत्यांच्या बक्षिसाला विलंब का?

## खेळाडू आणि खेळांमध्ये क्रीडा खात्याचा दुजाभाव







भारताने जानेवारी २०२५ मध्ये पहिला खो-खो विश्वचषक जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली. विशेष म्हणजे, पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांमध्ये भारताने विश्वविजेतेपद पटकावले आणि दोन्ही संघांचे कर्णधारपद महाराष्ट्राच्या खेळाडूंनी भूषवले होते. पुरुष संघाचा कर्णधार प्रतीक वाईकर आणि महिला संघाची कर्णधार प्रियंका इंगळे या होत्या. वाईकर व इंगळे यांच्यासह सुयश गरगटे, रामजी कश्यप, आदित्य गणपुले, अनिकेत पोटे, अश्विनी शिंदे व रेशमा राठोड या खेळाडूंचा या विश्वविजेत्या संघात समावेश होता.

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या, महाराष्ट्राचा पारंपारिक आणि अत्यंत लोकप्रिय मराठमोळ्या खेळ असलेला खो-खो. यातील विश्वविजेत्या खेळाडूंना सन्मान आणि रोख पारितोषिक मिळण्यास होणारा विलंब हा खोखो आणि क्रीडाप्रेमींसाठी चिंतेचा विषय बनला आहे. विशेषतः, जेव्हा क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी, अजित पवार गट) आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोन्ही महत्त्वाचे नेते एकाच गटात आणि सत्तास्थानी आहेत, तेव्हा ही उपेक्षा अधिकच खटकणारी आहे.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

**एका खेळाडूचा गौरव, दुसऱ्यांची उपेक्षा**

याच काळात राज्य शासनाने इतर विजेत्या खेळाडूंना तत्परतेने बक्षिसे देऊन तत्परता दाखवली. नोव्हेंबर २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भारतीय महिला क्रिकेट संघातील महाराष्ट्राचे तीन खेळाडू उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांचा भव्य सत्कार करून तिन्ही खेळाडूंना प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक तत्काळ देण्यात आले. याशिवाय मुख्य प्रशिक्षक अमोल मजुमदार आणि सपोर्ट स्टाफलाही भरीव रोख बक्षिसे देण्यात आली. याआधी बुद्धिबळातील विश्वविजेत्या दिव्या देशमुखलाही राज्य सरकारने ३ कोटी रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित केले होते.

या संदर्भात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ७ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या निर्णयानुसार, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडू व त्यांच्या प्रशिक्षकांना रोख पारितोषिक देण्याची तरतूद स्पष्टपणे नमूद आहे. दहा महिने उलटले तरी, खो-खो विश्वविजेत्यांना अद्यापही त्यांच्या बक्षिसाची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे 'खेळाडू आणि खेळांमध्ये सरकार दुजाभाव करत आहे का?' असा थेट प्रश्न उपस्थित होतो आहे. एकाबाजूला, क्रिकेट आणि बुद्धिबळ या खेळांतील विजेत्यांना तात्काळ आणि सन्मानाने बक्षिसे दिली जातात, तर दुसऱ्या बाजूला खो-खो सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या आणि महाराष्ट्राचा गौरव वाढवलेल्या खेळ व खेळाडूंना शासन निर्णय होऊनही सापत्न वागणूक दिली जात आहे. हा भेदभाव 'पॉप्युलर' आणि 'मातीतील' खेळांमधील दरी दर्शवतो. उपमुख्यमंत्री पवार हे महाराष्ट्र खो-खो संघटनेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी आणि क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी या विषयात तात्काळ हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. अन्यथा, या खेळाडूंना मिळणारा सन्मान केवळ कागदावरच राहील आणि शासनाच्या धोरणांवर 'क्रीडा न्याय' विषयी प्रश्नचिन्ह उभे राहील.

## महत्वाचे...



## एचएसआरपी नंबर प्लेट केंद्र सुरू होणार; सुतार यांच्या मागणीला यश

**माढा, दि. २१ नोव्हेंबर-**

शासनाकडून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवण्याचा निर्णय घेण्यात आला १ एप्रिल २०१९ पासून वाहन खरेदी केले असेल तर त्या वाहनाला ही नंबर प्लेट येत. परंतु यापूर्वी देखील वाहन खरेदी केली असेल तर त्या वाहनांना ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही नंबर प्लेट बसवण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार वाहनधारक नंबर प्लेट बसून घेत आहेत. माढा शहरात ही नंबर प्लेट बसवण्याची सुविधा नसल्याने माढा शहर व परिसरातील गावच्या नागरिकांना कुर्डूवाडी किंवा अकलूज या ठिकाणी नंबर प्लेट बसवण्यासाठी जावे लागत होते. त्यामुळे नागरिकांचा नाहक वेळ व पैसे खर्च होत होते. ही गोष्ट लक्षात घेऊन माढा शहर मनसे अध्यक्ष समाधान सुतार यांनी अकलूज परिवहन उपकेंद्राला या संदर्भात निवेदन दिले होते. अकलूज उपकेंद्र परिवहन विभागाने त्या निवेदनाची दखल घेऊन एफटीए एचएसआरपी सोलुशन कंपनीला पत्र पाठवून माढा शहरात तत्काळ नंबर प्लेट केंद्र सुरू करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे लवकरच माढा शहरात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट केंद्र सुरू होऊन वाहनधारकांची नंबर प्लेट बसवण्याची सोय होणार आहे. अकलूज येथे परिवहन विभागाला निवेदन देताना मनसे शहराध्यक्ष समाधान सुतार, शंकर मदने, दादा भांगे उपस्थित होते.




## सोलापूर विमानतळावर प्रथमोचार प्रशिक्षण कार्यशाळा

**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

सोलापूर विमानतळ येथे इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्यावतीने प्रथमोचार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे मुख्य प्रशिक्षक श्री शिवाजी महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्राचे माजी प्राध्यापक व श्रीमान रामभाई शाह ब्लड सेंटर, बार्शीचे मानद सचिव, डॉ. दिलीप कराड यांनी संपूर्ण प्रशिक्षण प्रभावीपणे घेतले. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि योग्य प्रतिसाद देण्याबाबत जागृती निर्माण करणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश होता. कार्यक्रमाचे उद्घाटन विमानतळ संचालक माधवराव सोनकुसळे यांनी केले. तसेच सिव्हील इन्चार्ज व उपमहाव्यवस्थापक चंद्रेश वंजारा यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. डॉ. दिलीप कराड यांना डॉ. चैताली मोरे व अनुराधा फोके यांनी सहाय्य केले. सोलापूर विमानतळाचे अग्निशमन सेवा अधिकारी निशांत म्हात्रे, तुकाराम दराडे, व शिवानंद म्हामणे (वरिष्ठ अधीक्षक, अग्निशमन सेवा) यांनी प्रशिक्षणाच्या संपूर्ण समन्वयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आवश्यक सुविधा, जागेची उपलब्धता आणि व्यवस्थापन सुरळीत पार पडण्यासाठी त्यांनी सक्रीय सहकार्य केले. प्रशिक्षणादरम्यान डॉ. कराड यांनी बेसिक लाइफ सपोर्ट, जखमांवरील तात्काळ उपचार, रक्तस्त्राव नियंत्रण, श्वसन अडथळा दूर करण्याच्या पद्धती, तसेच आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. डॉ. दिलीप कराड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले हे प्रशिक्षण कर्मचारी अधिक सजग, प्रशिक्षित आणि सक्षम होण्यासाठी उपयुक्त ठरले, असे मत व्यक्त केले.

## प्रभाग १ मध्ये तम्मा शेळके यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

**अक्कलकोट, दि.२१ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्र राज्यातील टॉप फाईव्ह चे तीर्थक्षेत्र बनविण्याचे उदिष्ठ आहे यादृष्ठीने विकास कामे चालू आहेत ती पुर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, प्रभाग १ चे उमेदवार तम्मा (मामा ) शेळके, सुनंदा स्वामी यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. प्रभाग १ मधील भाजपाचे उमेदवार तम्मा शेळके, सुनंदा स्वामी यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, मिलन कल्याणशेट्टी, उत्तम गायकवाड, शिवशरण जोजन, यशवंत धोंगडे, प्रमोद पाटील, रामचद्र समाणे, शिवराज स्वामी, इजि वरुण शेळके, स्वामीनाथ बेंद्र, इरण्णा गवंडी, श्रीशैल गवंडी, चंद्रकांत गवंडी, परमेश्वर शिंदे, सिद्धराम घाटकांबळे, अनिल मोरे, रफिक पालंडे, बाळू खैराटकर, वरूण शेळके, रमेश शंबेवाड, संजय जमादार, आप्पा शिंदे, किरण शिंदे, बाजीराव जाधव, वसंत बंडगर, बाबा सुरवसे, पिंटू गायकवाड, अनिल लोणारे, सुहास सुरवसे, उपस्थित होते.



## अरूण गवळी (डॅडी) विठ्ठल चरणी लिन

**पंढरपूर :** मुंबईचा ऐकेकाळचा डॉन अरुण गवळी यांनी गुरुवारी पंढरपुरात येवुन सपत्नीक विठ्ठलाचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर परिसरात त्यांनी फेरफटका देखील मारला. जगात सर्वत्र शांती, सुख आणि आनंद राहु दे अशी प्रार्थना आपण विठुरायाकडे केली असल्याचे आवर्जुन त्यांनी सांगितले.

# ‘आम्हाला योजना नको, मुलींचे संरक्षण करा’

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२१ नोव्हेंबर-**

‘यज्ञा दुसानेला न्याय मिळालाच पाहिजे’ ‘आम्हाला योजना नकोत; मुलींचे संरक्षण करा’ अशा घोषणा देत सरोळे (ता. बार्शी) येथे एकता महिला मंचतर्फे गुरूवारी दि.२१ नोव्हेंबर रोजी मालेगाव येथील यज्ञा दुसानेच्या क्रूर हत्येच्या निषेधार्थ मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला.

मालेगाव तालुक्यातील डोंगराळ येथील बालिका यज्ञा दुसाने हिच्यावर अमानुष शारीरिक अत्याचार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या क्रौर्याचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि बालिकेला त्वरित न्यायाच्या मागणीसाठी सोलापूर जिल्ह्यात प्रथमच सारोळे (ता. बार्शी) येथील एकता महिला मंच आणि गावातील महिलांनी धाडसी पाऊल उचलत हा मोर्चा काढला. सायंकाळी गावातील सर्वसामान्य महिलांनी हातात मेणबत्त्या घेऊन 'एकता महिला मंच'च्या नेतृत्वाखाली निषेध रॅली काढली. या रॅलीदरम्यान महिलांनी ‘यज्ञा दुसानेला न्याय मिळालाच पाहिजे’,‘बेटी बचाओ, बेटी पढाओ पण आता नराधमांपासून मुलींना वाचवा’, ‘नराधमाला फाशी द्या’ अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आरोपीला त्वरित फाशीची शिक्षा मिळावी, असी मागणी यावेळी करण्यात आली. सर्व महिलांनी दिवंगत यज्ञा दुसाने हिच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. पूजा भोसले यांनी शासनाच्या लाडकी बहीण योजनेपेक्षा आमच्या मुलींचे आणि महिलांचे संरक्षण करण्याची मागणी केली. अनिता गाटे यांनी प्रत्येक अत्याचाराविरोधात आम्ही

### मालेगावच्या क्रौर्याविरुद्ध सारोळेत एकता महिला मंचचा मेणबत्ती मोर्चा



आवाज उठवू आणि न्यायासाठी शेवटपर्यंत लढू, असे सांगितले. कल्पना कुलकर्णी यांनी समाजात महिला किती सुरक्षित आहेत? असा प्रश्न आज प्रत्येक आई-वडिलांना पडल्याचे सांगितले. प्रिया गाटे यांनी केवळ कागदी कायदे नकोत तर कठोर अंमलबजावणीची मागणी केली. सारिका पवार यांनी हत्येबद्दलचा राग नव्हे, तर महिलांवरील अत्याचारांविरुद्धचा तीव्र आक्रोश मनोगतातून व्यक्त केला. या रॅलीत सरपंच सुवर्णा काकडे, पूजा भोसले, प्रभावती साबळे, दमयंती कुलकर्णी, कल्पना कुलकर्णी, सरस्वती कुलकर्णी, सुनंदा भोसले, विजया निचळ, शैला जाधव, सारिका पवार, स्वाती गाटे, अनिता गाटे, हंसा भोसले, छानू कऱ्हाड, रेखा गाटे, मधू भोसले, रुक्मीण कोरेकर, सुनिता कोरेकर, शमा गाटे, पद्मा बनसोडे, काजल बनसोडे, सविता भगत, सविता कांबळे, प्रिया गाटे, उज्वला डोके, उषा कांबळे, सुनिता लाकड, प्रिती गाटे, शकुंतला गाटे, सुनिता गाटे, दिपाली गाटे, शिवानी हब्बू, गौरी ठोंबरे, पंचशीला साबळे, कोमल कराड, संगीता शेरखाने, रेश्मा चौधरी, पल्लवी चौधरी, सुमण चौधरी, संस्कृती करंडे, पूजा भोसले, रेखा भोसले, वंदना साबळे, रंजना चौधरी, शामल गाटे, रेखा गाटे, अनिता मुंबरे, सुनिता लोंढे, सारिका मुंबरे, शामल साबळे, मनीषा वडवे उपस्थित होते.

## हॉटेल मालक लखन माने यास न्यायालयीन कोठडी

### जामीन फेटाळला

### ७७७७ हॉटेल मॅनेजर मारहाण प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील टेंभुर्णी बायपासजवळील ७७७७ हॉटेलचे मालक आणि रील स्टार म्हणून ओळखले जाणारे लखन हरिदास माने यांना हॉटेल मॅनेजरवर अमानुष मारहाणप्रकरणी अटक करण्यात आली होती. या प्रकरणात माने यांनी दाखल केलेला जामीन अर्ज माढा न्यायालयाने फेटाळला असून न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे निरीक्षक नारायण पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, माने यांनी तीन महिन्यांपूर्वी हॉटेल मॅनेजर निवास नकाते यांच्यावर अत्यंत निर्दयपणे अत्याचार केला होता. मॅनेजरला कपडे काढून नग्न अवस्थेत लोखंडी पाइपने मारहाण करत शिवीगाळ करण्यात आल्याचा व्हिडिओ अलीकडेच सोशल मिडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर संतापाची लाट उसळली आणि पोलीसांनी तातडीने कारवाई केली. घटनेबाबत मॅनेजर निवास नकाते यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी, पोलीस हवालदार शिवाजी जाधव व पोलीस नाईक केशव झोळ यांच्या पथकाने चौकशी करून लखन



मानेला अटक केली. मंगळवारी त्यांना न्यायालयासमोर हजर केल्यानंतर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कुलकर्णी यांनी त्यांचा जामीन अर्ज फेटाळून न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

या घटनेमुळे टेंभुर्णी परिसरात मोठी खळबळ उडाली असून, सोशल मीडियावर यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

## वरिष्ठांच्या त्रासास कंटाळून ग्रा.प. अधिकाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून काळ्या फिती लावून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ नोव्हेंबर-**

येथील रहिवाशी व माढा तालुक्यातील अंबड येथे कार्यान्वित असलेल्या प्रकाश बावीस्कर या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांने वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून गळफास लावून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप करत सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी बार्शी पंचायत समिती कार्यालयासमोर काळ्या फिती लावून त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध नोंदवला. दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केल्याशिवाय असहकार आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका घेतली. बार्शी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीसह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष शरद भुजबळ म्हणाले, त्रास देऊन कामाचा ताण दिला जात असल्याने ग्रामसेवक तणावाखाली येऊ लागले आहेत. त्यामुळे आम्हाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जात आहे. दोषी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा व त्यांच्या सोबत असलेल्या इतर अधिकाऱ्यांना सहआरोपी करावे, जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्या अधिका-यांवर कारवाई करावी.

ग्रामपंचायत अधिकारी प्रकाश बावीस्कर यांनी बुधवारी बार्शीत त्यांच्या राहत्या घरी गळफास लावून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्यावर बार्शीत अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

## बार्शीत सख्ख्या भावाकडून बहिणीवर कोयत्याने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ नोव्हेंबर-**

शहरातील मांगडे चाळ परिसरात कौटुंबिक वादातून एका विवाहित महिलेवर तिच्या सख्ख्या भावाने कोयत्याने गंभीर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे.

सोनिया शिवाजी भोसले (वय २४, रा. माऊलीनगर बायपास, कुर्डुवाडी) या १७ नोव्हेंबर रोजी आपल्या आईकडे, मांगडे चाळ बार्शी येथे आल्या होत्या. दुपारच्या सुमारास त्यांचा भाऊ सतीश किशोर चौधरी (रा. मांगडे चाळ, बार्शी) हा हातात धारदार कोयता घेऊन घरात घुसला. त्याने बहिणीला तिच्या नांदण्यासंबंधी व पूर्वीच्या नातेसंबंधांवरुन वाद घालत धमकी दिली. वाद वाढताच सतीशने सोनियावर अचानक कोयत्याने वार केले. या हल्ल्यात सोनिया भोसले यांच्या उजव्या कानामागील डोक्याला तसेच डाव्या हाताच्या दंडाला गंभीर दुखापत झाली आहे. महिलेच्या आरडाओरडीनंतर तिची आई, सावत्र आई व चुलती यांनी तत्काळ धाव घेऊन सतीशला घराबाहेर हाकलले. जखमी अवस्थेत असलेल्या सोनियाला तातडीने जगदाळेमामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्या सध्या शुद्धीत असून घटनेविषयी जबाब दिला आहे. या प्रकरणी सतीश किशोर चौधरी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास बार्शी शहर पोलिसांकडून सुरु आहे.

## आरोपीला अटक करा अन्यथा आत्मदहन करु

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

लैंगिक अत्याचार व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संबंधित आरोपीस तत्काळ अटक करण्यात यावी. अन्यायग्रस्त कुटुंबीयांना पोलीस संरक्षण द्यावे अन्यथा आत्मदहन करणार असल्याचा इशारा पीडित महिलेने पत्रकार परिषदेत दिला आहे. आरोपी निवृत्त फौजदार असून वेळोवेळी धमक्या दिल्या जात आहेत. दहा दिवस उलटले तरी संबंधित आरोपीला अटक झालेली नाही. पोलीस केस मागे घेण्यासाठी संबंधितांकडून दबाव आणण्याचा प्रयत्न होत आहे असा आरोप करत कुटुंबाला जीवितास धोका असल्याने पोलीस संरक्षण द्यावे. आरोपीला तत्काळ अटक करून न्याय द्यावा अन्यथा आत्मदहन केल्याशिवाय पर्याय नाही असेही पीडित महिलेने स्पष्ट केले आहे.

## तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या १३ कर्मचाऱ्यांना दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगर पालिकेच्यावतीने नागरिकांच्या दैनंदिन समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने ‘आपली तक्रार पोर्टल’ व ‘माय सोलापूर’ पची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ‘आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर’वर नागरिकांकडून प्राप्त तक्रारी निर्धारित वेळेत निकाली न काढल्याबद्दल विविध विभागांच्या १३ कर्मचाऱ्यांवर दंड आकारण्यात आला आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी ही कारवाई केली आहे.

दि. २० फेब्रुवारी रोजीच्या आढाव्यात या कर्मचाऱ्यांकडे एकूण ४१ तक्रारी प्रलंबित असल्याचे आढळले. काही कर्मचारी तक्रारींचा निपटारा न करता त्या दीर्घकाळ प्रलंबित ठेवत असल्याचे तसेच दंडात्मक कारवाईच्या दिवशी तक्रारी ट्रान्स्फर केल्याचे आढळून आले आहे. दि. २० नोव्हेंबर रोजीच्या ‘आपली तक्रार पोर्टल’वरील पेंडिंग आफ्टर टाईम अहवालानुसार खालील अधिकारी/कर्मचारी यांच्या तक्रारी प्रलंबित असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. दंडाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या माहे नोव्हेंबर (पेड इन डिसेंबर) च्या वेतनातून एकरकमी वसूल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**या अधिकारी, कर्मचाऱ्यांना झाला दंड**

प्रशिक बडोळे - विभागीय कार्यालय क्र. ५ - दंड ५ हजार रुपये, परशुराम बोमकट्टी - विभागीय कार्यालय क्र. ५ - दंड २ हजार रुपये, सुफियान पठाण - अतिक्रमण विभाग - दंड ५०० रुपये, सुरज ढवळे - विभागीय कार्यालय क्र. ५ - दंड ५०० रुपये, संजय पाटील - विभागीय कार्यालय क्र. ५ - दंड ५०० रुपये, इरशाद जरतार - नगरअभियंता कार्यालय - दंड ५०० रुपये, इमरान बागवान - नगररचना विभाग - दंड ५०० रुपये, प्रमोद गोविंदवार - नगर रचना विभाग - दंड ५०० रुपये, येशुदास गायकवाड - भूमी व मालमत्ता कार्यालय - दंड ५०० रुपये, गणेश काकडे - नगर रचना विभाग - दंड ५०० रुपये, विष्णु कांबळे - नगर अभियंता विभाग - दंड ५०० रुपये, गणेश साखरे - नगर अभियंता विभाग - दंड ५०० रुपये, हारुण सिद्दीकी - नगरअभियंता विभाग - दंड ५०० रुपये आकारण्यत आला आहे.

## चोरट्यांनी वृध्देला गंडवले; साडेचार तोळ्याची सोनसाखळी लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ नोव्हेंबर-**

उपळाई रोडवर राहणारी वृद्ध महिला पायी घराकडे जाताना दोन अनोळखी व्यक्ती आले आणि पुढे खून झाला आहे, वातावरण तंग आहे, असे सांगून गळ्यातील साडेचार तोळ्यांची सोन्याची चेन काढावयास लावली. जवळची नकली चेन कागदाच्या पुडीत बांधून देत खरी चेन घेऊन पसार झाल्याचा प्रकार घडला.

ही घटना २० नोव्हेंबर रोजी दुपारी उपळाई रोडवरील शंभर फुटी रोडवर हा प्रकार घडला. याबाबत रतन महादेव गादेकर (वय ७५, रा.उपळाई रोड, देशमुख प्लॉट) यांनी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. संबंधित वृद्धा गल्लीतील पिठाच्या गिरणीत दळण ठेऊन पायी घराकडे शंभर फुटी रोडवरुन जात होत्या. दरम्यान एक व्यक्ती दुचाकीवर आला. त्याने कोणाचे तरी नाव सांगून ते कोठे राहतात विचारले. मला काही माहिती नाही असे वृद्धा सांगत असताना त्यांच्या हातात सोन्यासारख्या अंगठ्या दिसल्या. त्यावेळी त्यांनी पुढे खून झाला आहे, वातावरण तंग आहे. त्यामुळे गळ्यातील दागिने व्यवस्थित ठेवा, असे म्हणत त्यातील एकाने हातातील अंगठ्या दुसऱ्या व्यक्तीकडे दिल्या. त्यामुळे त्या वृद्धाने गळ्यातील साडेचार तोळ्यांची सोन्याची चेन काढून ती पर्समध्ये ठेवत असताना, असे ठेवू नका.. मी कागदात बांधून देतो.. म्हणताच त्याच्या ताब्यात दिली. ती कागदाच्या पुडीत बांधून दिली. ती पर्समध्ये ठेवली. ते दोघेही निघून गेले. वृद्धेने काही वेळाने चालत पुढे जाऊन पुडी सोडून पाहताच फसवणूक लक्षात आली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ‘त्या’ शिक्षणाधिकारी, आयोजकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### हिंदू जनजागृती समितीची मागणी; ‘क्रूरकर्मा टीपू सुलतान’ यांची जयंती साजरी करण्याचा प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागे ‘औरंगजेबाच्या अवलादींना सोडणार नाही’ असा कडक इशारा दिला असतानाही, बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ‘क्रूरकर्मा टीपू सुलतान’ याची जयंती साजरी करण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

शासकीय परिपत्रकात कोणताही उल्लेख नसताना, एका क्रूर शासकाचे उदात्तीकरण करणे हा केवळ नियमांचा भंग नाही, तर हिंदुच्या भावना दुखावून राज्यातील शांतता बिघडवण्याचा अक्षम्य प्रयत्न आहे. या राष्ट्रद्रोही कृत्यासाठी संबंधित शिक्षक, आयोजक आणि निष्काळजी शिक्षण अधिकाऱ्यांवर तातडीने 'गुन्हा दाखल' करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. टीपू सुलतान हा कोणताही आदर्श राजा नसून, त्याने सक्तीचे हिंदुचे धर्मपरिवर्तन, मंदिरांचा विध्वंस आणि हजारो निष्पाप हिंदुच्या हत्यांसारखी क्रूरकृत्ये केली आहेत. एका बाजूला संपूर्ण महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श जपत असताना, शासकीय यंत्रणेचा भाग असलेल्या शाळेत अशा क्रूरकर्मा व्यक्तीचे उदात्तीकरण करणे म्हणजे पुढील पिढीला



चुकीचा इतिहास शिकवून राष्ट्रविरोधी प्रवृत्तींना खतपाणी घालण्यासारखे आहे. फडणवीस यांच्या स्पष्ट इशाऱ्यानंतरही हा प्रकार घडणे, हे प्रशासकीय निष्काळजीपणामुळे झाले की, यामागे हिंदुविरोधी शक्तींकडून झालेले षडयंत्र आहे, याचा तपास होणे गरजेचे आहे. या गंभीर आणि राष्ट्रद्रोही कृत्यासाठी हिंदु जनजागृती समितीची मागणी आहे की, हा कार्यक्रम आयोजित करणारे शिक्षक, मुख्याध्यापक व निष्काळजी शिक्षण अधिकारी यांच्यावर भारतीय दंड संहिता अंतर्गत धार्मिक भावना दुखावणे आणि राज्यात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल गुन्हा दाखल करावा, तसेच संबंधित शिक्षकांचे निलंबन करावे. जर या प्रकरणातील सूत्रधारांवर तातडीने आणि कठोर कारवाई झाली नाही, तर हिंदु जनजागृती समिती तीव्र जनआंदोलन छेडण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा या प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात येत आहे.



## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांचा सोलापूर दौरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ता अतुल लोंढे यांचा आज सोलापूर दौरा झाला. या दौऱ्यात त्यांनी पक्ष संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणुका, केंद्र सरकारच्या अपयशांवर केलेली टीका तसेच महागाई व बेरोजगारीविरोधात काँग्रेसच्या भूमिकेवर मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कमिटीचे प्रवक्ते प्रा.काकासाहेब कुलकर्णी यांनी त्यांचा सत्कार केला.

प्रा.काकासाहेब कुलकर्णी म्हणाले की, अतुल लोंढे यांचे विचार आणि त्यांचे प्रभावी व तर्कशुद्ध राजकीय विश्लेषण आजच्या राजकीय वातावरणात काँग्रेस पक्षाला नवी दिशा देणारे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने सोलापूर जिल्ह्यातील काँग्रेस अधिक बळकट होणार आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, राजेंद्र दासरी, युवराज माळगे, पांडू विटकर, आदी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बार्शीत काँग्रेसच्या ४ उमेदवारांसह ६४ जणांची माघार

### नगराध्यक्ष ६ तर नगरसेवकपदासाठी १२० जणांचे अर्ज शिल्लक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

बार्शी नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शुक्रवारी माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत काँग्रेसच्या तीन उमेदवार आणि वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष धनंजय जगदाळे यांच्यासह शुक्रवारी नगराध्यक्षा पदासह एकूण ५८ उमेदवारांनी तर शेवटच्या दिवसापर्यंत ६४ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली.

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या दोन पक्षातच तुल्यबळ लढत होण्याची शक्यता आहे. शुक्रवारी राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसच्या रागिणी खुरंगुळे, योगेश लोखंडे, रवींद सांगोळे आणि चेतन कोठारी आणि वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष ॲड. धनंजय जगदाळे (अपक्ष) यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. बार्शी नगरपरिषद, नगराध्यक्षा उमेदवार पुढीलप्रमाणे- तेजस्विनी कथले (भाजप), निर्मला बारबोले (शिवसेना-उबाठा), सुप्रिया गुंड पाटील (अपक्ष), खाजाबी पठाण (एमआयएम), संजीवनी बारंगुळे (प्रहार), जाकीराबी शेख (काँग्रेस).




# अकलूज नगर परिषद अध्यक्षपदासाठी ५ तर सदस्य पदासाठी ९१ उमेदवार रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ नोव्हेंबर-**

अकलूज नगरपरिषधेच्या निवडणूकीसाठी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी चित्र स्पष्ट झाले. यामध्ये अध्यक्षपदासाठी पाच तर सदस्यपदासाठी ९१ उमेदवार रिंगणात असल्याचे स्पष्ट झाले.

**नगराध्यक्षाचे उमेदवार असे :** रेशमा अडगळे (राष्ट्रवादी काँग्रेस श.प.), पूजा कोतमिरे (भाजप), दिव्यानी रास्ते (राष्ट्रवादी काँग्रेस अ प,), उषा कांबळे (वंचित बहुजन आघाडी), सुवर्णा साठे (महाराष्ट्र विकास सेना).





**अकलूज नगरपरिषद १ ते १३ प्रभागात उभे असलेले उमेदवार**

**प्रभाग क्रमांक १ अ :** युवराज दोरकर (राष्ट्रवादी काँग्रेस श. प.), अक्षय वाईकर (भाजप), सचिन साळुंखे (राष्ट्रवादी काँग्रेस अ.प.). **प्रभाग क्रमांक १ ब :** ज्योतीदेवी माने पाटील (भाजप), उर्वशीराजे मोहिते-पाटील (राष्ट्रवादी अ.प.), वैशाली भोसले (राष्ट्रवादी श.प.). **प्रभाग क्रमांक २ अ :** प्रियांका गायकवाड (राष्ट्रवादी श.प.), स्नेहा कावळे (भाजप), वैशाली गायकवाड (राष्ट्रवादी अ.प.), जयश्री खंडागळे (अपक्ष). **प्रभाग क्रमांक २ ब :** सचिन देशमुख (राष्ट्रवादी श.प.), सचिन शिंदे (भाजप), रणजितसिंह देशमुख (राष्ट्रवादी अ.प.), बाबासाहेब गायकवाड (बीएसपी). **प्रभाग क्रमांक ३ अ** : विशाल मोरे (राष्ट्रवादी श.प.), तुषार लोंढे (भाजप), राजू जाधव (राष्ट्रवादी अ.प.). **प्रभाग क्रमांक ३ ब :** नम्रता जगताप (राष्ट्रवादी श.प.), शोभा शिंदे (भाजप), उर्वशीराजे मोहिते-पाटील(राष्ट्रवादी अ.प.). **प्रभाग क्रमांक ४ अ :** मोहसीन शेख (राष्ट्रवादी श.प.),विक्रांत देशमाने (भाजप), जावेद तांबोळी (राष्ट्रवादी अ.प.), साजिद सय्यद (अपक्ष). **प्रभाग क्रमांक ४ ब :** मंदाकिनी पाडोळे (राष्ट्रवादी श.प.), प्रीती ननवरे (भाजप), योगिता देशमुख (राष्ट्रवादी अ.प.). **प्रभाग क्रमांक ५ अ :** रेश्मा तांबोळी (राष्ट्रवादी श.प.), नंदा माने (भाजप), मुक्ताबाई शिंदे (राष्ट्रवादी अ.प.), **प्रभाग क्रमांक ५ ब :** सयाजी मोहिते-पाटील (राष्ट्रवादी श.प.), अमोल माने (भाजप), दीपक सुत्रावे (राष्ट्रवादी अ.प.), यशवंत कळसाईत (अपक्ष). **प्रभाग क्रमांक ६ अ :** अक्षता धोत्रे (भाजप), ज्योती कुंभार (राष्ट्रवादी अ.प.), उज्वला विटकर (शिवसेना उबाठा). **प्रभाग क्रमांक ६ ब :** गिरीराज माने-पाटील (भाजप), उर्वशीराजे मोहिते पाटील (राष्ट्रवादी अ.प.), पृथ्वीराज आंबूरे (शिवसेना उबाठा), किसन माने (मविसे). **प्रभाग क्रमांक ७ अ :** मृदुला सूर्यवंशी (राष्ट्रवादी श.प.), अंकिता पाटोळे (भाजप), दिव्यानी रास्ते (राष्ट्रवादी अ.प.). **प्रभाग क्रमांक ७ ब :** क्रांतिसिंह माने पाटील (राष्ट्रवादी श. प.), श्रीकांत दोरकर (भाजप), तेजस गायकवाड (राष्ट्रवादी अ. प.), अनिल साठे (मविसे). **प्रभाग क्रमांक ८ अ :** उज्वला अडाणे (राष्ट्रवादी श.प.), दिपाली वाघमोडे (भाजप), ज्योती कुंभार (राष्ट्रवादी अ.प.), **प्रभाग क्रमांक ८ ब :** योगेश गांधी (राष्ट्रवादी श.प.), महेश शिंदे (भाजप), महेश साळुंखे (राष्ट्रवादीअ.प.), अनिल साठे (मविसे), गिरीश शेटे (काँग्रेस). **प्रभाग क्रमांक ९ अ :** संजय साठे (राष्ट्रवादी श.प.), राहुल लोंढे (भाजप), हिरा खंडागळे (राष्ट्रवादी अ.प.), विक्रम धाइंजे (वंचित बहूजन आघाडी). **प्रभाग क्रमांक ९ ब :** प्रतिभा गायकवाड (राष्ट्रवादी श.प.), जया कांबळे (भाजप), अंजना साठे (राष्ट्रवादी अ.प.), ज्योती सकट (मविसे). **प्रभाग क्रमांक १० अ :** मनीषा तिकोटे (राष्ट्रवादी श.प.), कोमल भोसले (शिवसेना), वैशाली गायकवाड (राष्ट्रवादी अ.प.). **प्रभाग क्रमांक १० ब :** विलास क्षीरसागर (राष्ट्रवादी श.प.), किरण गायकवाड (शिवसेना), सिद्धार्थ गायकवाड (राष्ट्रवादी अ.प.), **प्रभाग क्रमांक ११ अ :** नाशिक सोनवणे (राष्ट्रवादी श.प.), सोमनाथ भोसले (शिवसेना), दीपक भोसले (राष्ट्रवादी अ.प.), आशुतोष साठे (मविसे), **प्रभाग क्रमांक ११ ब :** शितल बनपट्टे (राष्ट्रवादी श.प.), श्रेया भोसले (शिवसेना), स्वाती जाधव (राष्ट्रवादी अ.प.).**प्रभाग क्रमांक १२ अ :** स्वाती फुले (राष्ट्रवादी श.प.), सीमा एकतपुरे (भाजप), दिपाली शेंडे (राष्ट्रवादी अ.प.), **प्रभाग क्रमांक १२ ब :** शिवतेजसिंह मोहिते-पाटील (राष्ट्रवादी श.प.), अमरसिंह देशमुख (भाजप), अरुण शहाणे (राष्ट्रवादी अ.प.), राहुल जाधव (अपक्ष). **प्रभाग क्रमांक १३ अ :** नामदेव गलांडे (राष्ट्रवादी श.प.), अमित टिळेकर (भाजप), अलीम बागवान (राष्ट्रवादी अ.प.), श्रीकांत आगलावे (अपक्ष), **प्रभाग क्रमांक १३ ब :** सना शेख (राष्ट्रवादी श.प.), जयश्री एकतपूरे (भाजप), उर्वशीराजे मोहिते-पाटील(राष्ट्रवादी अ.प.), सोनाली कदम (अपक्ष).

# पांडुरंगाची नगरी ही विकासाच्या सोबतच : पालकमंत्री गोरे

### ▸▸महायुतीचाच झेंडा फडकणार; पंढरपुरात प्रचाराचा फोडला नारळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक ही कुणाची राजकीय व्यवस्था करण्याची निवडणूक नाही. तर ही निवडणूक पंढरपूर शहराच्या, पांडुरंगाच्या नगरीच्या विकासाच्या दिशेने जो कोणी घेऊन जाईल त्याच्या सोबत राहणारी आहे. त्यामुळे मी सर्व पंढरपूरकरवासीयांच्या वतीने अश्वस्त करतो की हे पंढरपूर शहर आणि पांडुरंगाची नगरी ही विकासाच्या सोबतच राहील. राजकीय पुर्नवसन किंवा राजकीय व्यवस्था मागणाऱ्या लोकांच्या सोबत निश्चितच राहणार नाही. त्यामुळे येथे निश्चितच आपलाच झेंडा फडकणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पदयात्रा विठ्ठल मंदिराजवळ आली. तेथे नामदेव पायरी तसेच श्रीसंत चोखामेळा यांच्या समाधी समोर नतमस्तक होवून पालकमंत्र्यांच्या हस्ते नारळ वाढवून मोठे शक्तीप्रदर्शन करीत प्रचार फेरीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, आवताडे शुगर्सचे प्रमुख संजय आवताडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शामल शिरसट (पापरकर), भाजपा, विकास आघाडीचे सर्व ३६ उमेदवार, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर, तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, शहराध्यक्ष लाला पानकर आदी उपस्थित होते. पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या निमित्ताने आपणा समोर आलेली जी मंडळीं आहेत त्यांच्या गावातील रस्ते देखील आपणच केलेले आहेत. त्यामुळे आज जी मंडळी आपणा समोर आहेत त्यांना कोणतीही आरेरावी, दबंगगिरी न करता गेल्या पंचवीस, तीस वर्षात आपण केलेल्या काम ाचा लेखाजोखा नागरिकांसमोर ठेवायचा आहे. केलेल्या विकास कामांच्या जोरावरच आपण मते मागावित असे आवाहन माजी आमदार तथा भाजपाचे नेते प्रशांत परिचारक यांनी केले.



**नगरपरिषदेवर महायुतीची सत्ता आणण्याचा संकल्प**
यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पंढरपूर नगरपरिषदेवर महायुतीची सत्ता आणण्याचा संकल्प व्यक्त केला. याबरोबरच सर्व कार्यकर्ते व उमेदवारांना निवडणुका संपूर्ण ताकदीने लढण्याचा देखील सल्ला त्यांनी दिला.




# करमाळ्यात नगराध्यक्षासाठी पंचरंगी लढत; तीन अर्जदारांची माघार

### भाजप-शिवसेना-शहर विकास आघाडीसह रासप व अपक्ष रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२१ नोव्हेंबर-**

नगरपालिका निवडणूकीत उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरीस तीन अर्ज मागे घेतल्याने नगराध्यक्षपदासाठी पंचरंगी लढत होणार आहे. त्यामुळे भाजप-शिवसेना- शहर विकास आघाडीसह राष्ट्रीय समाज पक्ष व अपक्ष रिंगणात राहिले आहेत. करमाळा नगराध्यक्ष पदासाठी यावेळी निवडणूक ही पूर्णपणे 'पक्षीय' रंगात रंगणार आहे.

सत्ताधारी गटात शिवसेना भाजपा-सावंत गटाच्या शहर विकास आघाडी असा सामना रंगणार आहे. या बरोबरच राष्ट्रीय समाज पक्षाने प्रथमच उमेदवार दिला आहे. भाजपाकडून दोन अर्ज जयश्री विलास घुमरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता तो आज मागे घेतला आहे. त्यामुळे भाजपा कडून सुनिता कन्हैयालाल देवी या तर शिवसेनेकडून दोन अर्ज दाखल होते. त्यापैकी संगीता श्रेणिक खाटेर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे शिवसेनेकडून महानंदा जयवंतराव जगताप, सावंत गटाच्या शहर विकास आघाडीकडून मोहिनी संजय सावंत, राष्ट्रीय समाज पक्षाकडून भावना भद्रेश गांधी तर अपक्ष प्रियंका सिद्धांत वाघम ारे अशा एकूण पाच उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे करमाळा नगराध्यक्षपदाची ही बहु-उमेदवारांची लढत यंदा लक्षवेधी ठरणार हे निश्चित.

# अक्कलकोट नगराध्यक्षपदासाठी भाजपा, काँग्रेस, शिंदे सेना, ठाकरे सेना, राष्ट्रवादी श.प. भिडणार

### मैंदर्गीत स्थानिक गटाला काँग्रेसचा पाठिंबा
### दुधनीमध्ये नगराध्यक्षसाठी ५ सदस्यासाठी ५३ रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ नोव्हेबर-**

दुधनी नपा नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवार सदस्यासाठी ५३ उमेदवार रिंगणात कायम राहिले आहेत. अक्कलकोट नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी, काँग्रेसचे अशपाक बळोरगी, शिंदे सेनेचे रईस टिनवाला, ठाकरे सेनेचे बाबासाहेब जाधव, राष्ट्रवादी शपचे इकरार शेख, अपक्ष नागनाथ उमदी या सहा जणांत लढत होणार हे अर्ज माघार घेण्याच्या २१ नोव्हंबरे रोजी स्पष्ट झाले. सदस्याकरिता १६ जणांनी माघार घेतली ७६ उमेदवार रिंगणात आहेत.

भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष अक्कलकोट मध्ये २५ पैकी फक्त १४ सदस्य उभे करू शकला . कॉग्रेस च्या तीन राष्ट्रवादी एक उबाठा सेना एक अपक्ष ११ जणांनी माघार घेतली भाजपाचा मित्र पक्ष शिंदे शिवसेनेचा धन्युष बाण अचुक लक्ष्य भेदणार का? भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी फिक्स नगराध्यक्ष होऊन मिनी आमदार बनणार ? दुधनी मध्ये शिंदे शिवसेना चा नगराध्यक्ष होणार का ? मैंदर्गी न पा मध्ये भाजपा चा नगराध्यक्ष होणार का? हे फारच उत्सुकतेचे बनले आहे.

अक्कलकोट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठीचे अपक्ष उमेदवार एक व सदस्यांसाठी चे १६ उमेदवारांनी माघार घेतली . शहरातील २५ सदस्या साठी ६ ब , ८ अ, १० अ ' , १२ अ या पाच ठिकाणी दुरंगी लढत आहे . प्रभाग १अ, प्रभाग २ अ, २ ब, प्रभाग ३ ब, प्रभाग ४ अ, ४ ब, प्रभाग ५ अ , प्रभाग ६ अ, प्रभाग ७ अ, प्रभाग ८ ब, प्रभाग १० ब, प्रभाग ११ अ ११ ब प्रभाग १२ ब, १२ क या पंधरा ठिकाणी तिरंगी लढत होऊ घातली आहे. प्रभाग १ ब, प्रभाग ५ ब, प्रभाग ७ ब, प्रभाग ९ ब मध्ये चौरंगी लढत आहे. प्रभाग क्र ९ अ मध्ये बहुरंगी पाच उमेदवारामध्ये लढत होत आहे. अर्ज माघार घेतलेल्यामध्ये नगराध्यक्षपदासाठीचे अपक्ष उमेदवार अशपाक बळोरगी सदस्यासाठीचे प्रभागात ७ अ मुजाईद बागवान, अपक्ष पुनम गायकवाड (९ अ), अपक्ष सद्दाम शेरीकर (३ अ ), अपक्ष प्रिया कामनुरकर, अपक्ष वैशाली पाटील (१० अ), अपक्ष युगंधरा हरवाळकर (७ ब), अपक्ष वैष्णवी धनशेट्टी (२अ), उबाठा शिवसेनेचे स्वामीराव मोरे (१० ब), अपक्ष प्रमिला मडीखांबे (११ अ), अपक्ष मजहर मुजावर (७ अ), अपक्ष संदिप मडीखांबे (११ ब), राष्ट्रवादीचे शंकर पाटील (१०ब), कॉग्रेसचे तीन उम ेदवार सैपन कोरबु (११ ब), कौसर नदाफ (५अ), निलेश लवटे (६ब) आदिचा समावेश आहे.

नगराध्यक्षपदासाठीचे प्रबळ दावेदार म्हणून गणलेले माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी न पा निवडणुक रिंगणात उतरलेच नाहीत. यामुळे भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी यांना लोकांच्या मनातील फिक्स नगराध्यक्ष एकतर्फी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी प्रबळ दावेदार भाजपा कडून मिलन कल्याणशेट्टी हे निवडणूक लढवत आहेत. काँग्रेस पक्षाकडून अशपाक बळोरगी हे निवडणूक रिंगणात आहेत. शिंदे शिवसेना गटाकडून रईस तिनवाला हे निवडणूक लढवत आहेत. खरी लढत मित्र पक्ष भाजप विरोधात शिंदे सेना यांच्या तच होण्याची शक्यता आहे कारण २५ नपा सदस्या पैकी १४ सदस्य उभा करू शकला. शिंदे शिवसेना मैंदर्गी दुधनी अक्कलकोट तीनही नगराध्यक्षपद लढवणार आहे कांग्रेस मैंदर्गी येथे स्थानिक आघाडी सोबत असणार आहे. येथे कॉंग्रेस ने उमेदवार दिले नाहीत. दुधनी येथे कॉंग्रेस नगराध्यक्ष साठी व १३ सदस्य निवडणुकीत उमेदवार उभे केले आहेत.

# पंढरपुरचे पाच वाळूमाफिया सोलापूर जिल्ह्यातून तडीपार

### आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने तालुका पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ नोव्हेंबर-**

आगामी नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समि ती निवडणुकीच्या अनुषंगाने पंढरपूर तालुक्यातील वाळू चोरी व इतर गुन्हे करणारे गुन्हेगार यांच्याविरोधात सोलापूर जिल्ह्याच्या पोलिस अधिक्षकांनी काढलेल्या आदेशाप्रमाणे पंढरपूर तालुक्यातील पाच वाळूमाफियांना सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून सहा महिन्याकरिता तडीपार करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोमवारी (दि. १७ नोव्हेंबर) निर्गमित केल्याची माहिती येथील तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

दरम्यान ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग प्रशांत डगळे यांचे मार्गदर्शनाखाली तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, एपीआय श्रीमती रेळेकर, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, भारत भोसले, दत्तात्रय तोंडले, पोलीस हवालदार योगीराज खिलारे, सचिन आटपाडकर, बाजीराव काकडे, पोलिस हवालदार सागर गवळी साळुंखे व स्थानिक गुन्हे शाखा पोहेकॉ अनिस शेख यांनी केली.




**सहा महिन्याकरीता या पाच जणांची तडीपारी**

तडीपार करण्यात आलेल्या वाळू माफियांची नावे पुढील प्रमाणे हद्दपार टोळीतील टोळी प्रमुख राहुल प्रभाकर सावंत (रा. गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर). श्रेयश ईश्वर यादव रा.गोपाळपूर ) , केबी उर्फ पप्पू कोळी (रा. गोपाळपूर), आप्पा उर्फ बंटी अनुसे आणि सतिश मोहन जगदाळे, (रा.तावशी) या पाच तडीपार इसमांना शुक्रवारी पंढरपूर तालुका पोलिसांनी ताब्या मध्ये घेऊन सोलापूर जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यातील पुणे, सांगली, या जिल्ह्यातील पोलीस स्टेशनच्या ठिकाणी नेऊन तडीपारची आदेशाची प्रत आरोपीला बजावून तडीपारीची कारवाई केली आहे.

# 'सहकारमहर्षी' मध्ये एक लाख ५१ हजार १५१ व्या साखर पोत्याचे पूजन

### १ लाख ८५ हजार ६४ मे.टन ऊसाचे झाले गाळप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२१ नोव्हेंबर-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या यंदाच्या ६४ व्या गळीत हंगामात उत्पादित झालेल्या १ लाख ५१ हजार १५१ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची प्रगतीपथावर वाटचाल चालू आहे. कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२०२६ हा अखंडितपणे पुर्ण क्षमतेने सुरू असून आज अखेर १ लाख ८५ हजार ६४ मे.टन ऊसाचे गाळप होऊन १ लाख ५१ हजार १५१ क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. सध्या प्रतिदिन सरासरी ८ हजार ५०० मे.टन प्रमाणे ऊसाचे गाळप चालू आहे. या सिझनमध्ये को-जन वीज निर्मिती प्रकल्प दि.२५ ऑक्टोबर रोजी सुरू झाला असून दि. २० नोव्हेंबर रोजीअखेर १ कोटी ४७ लाख ४५ हजार ९६० युनिट वीज निर्माण झाली असून त्यामधून ८९ लाख ९४ हजार २०० युनिट वीज विक्री केलेली आहे. तसेच उपपदार्थ प्रकल्प डिस्टिलरी मध्ये दि. २० नोव्हेंबर अखेर २२ लाख ८५ हजार ७४८ लिटर्स रेक्टिफाईड स्पिरिट तसेच १९ लाख ३० हजार ६ लिटर्स इथेनॉल उत्पादन झाले असल्याची माहिती कारखान्याचे सेक्रेटरी अनिल काटे यांनी दिली.



यावेळी व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, ॲड. विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे, गोविंद पवार, डॉ.सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक ॲड.प्रकाशराव पाटील रामचंद्रराव सावंत-पाटील संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजीत रणनवरे, माजी संचालक भिम राव काळे, महादेवराव घाडगे, रामचंद्र चव्हाण, सुनिल एकतपुरे, महादेवराव चव्हाण, चांगदेव घोगरे, राजेंद्र मोहिते, महाळूंग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भिमराव रेडे, शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडिया लेजर शो कमिटी संचालक बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, सौ.हर्षाली निंबाळकर तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर साखर पोती पूजन प्रसंगी कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे स्वागत चिफ केमिस्ट एस.एन.जाधव व सत्कार चिफ इंजिनियर एस. के. गोडसे यांनी केला.

# कुर्डुवाडीत नगराध्यक्षपदाचे २ तर नगरसेवकपदाच्या २० उमेदवारांची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२१ नोव्हेंबर-**

कुर्डूवाडी नगरपरिषद निवडणुकीत अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी शुक्रवार दि २१ रोजी नगराध्यक्षपदाचे २ तर नगरसेवक पदाच्या २० उमेदवारांनी माघार घेतली. नगराध्यक्षपदासाठी साक्षी डिकोळे धनंजय (अपक्ष), घुगे सारिका गणेश (अपक्ष) या दोन उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत.



नगरसेवक पदासाठी प्रभाग १ अ मधून चव्हाण मंजुषा सागर (शिवसेना), प्रभाग १ ब खोत श्रीकांत सुधाकर (अपक्ष), प्रभाग ३ ब काकडे दीपक लक्ष्मणराव (अपक्ष), प्रभाग ३ ब देवकाते सोमनाथ चंद्रकांत (राष्ट्रीय समाज पक्ष), प्रभाग ३ ब पवार लक्ष्मण सुर्यकांत (अपक्ष), प्रभाग ४ अ पोळके राजश्री चंद्रकांत (अपक्ष), प्रभाग ४ ब टोणपे क्षितीज संजय (अपक्ष), प्रभाग ४ ब गव्हाणे अक्षय दत्तात्रय (अपक्ष), प्रभाग ४ ब चांदणे विकी विजय (भाजप), प्रभाग ४ ब पवार पल्लवी लक्ष्मण (अपक्ष), प्रभाग ५ अ चौधरी रेश्मा शिवाजी (अपक्ष), प्रभाग ५ ब काकडे विक्रम विशाल (अपक्ष), प्रभाग ६ ब बागल उर्मिला हरिदास (अपक्ष), प्रभाग ७ अ कांबळे गणेश लक्ष्मण (अपक्ष), प्रभाग ७ ब लोंढे हिरकण दिलीप (अपक्ष ),प्रभाग ८ अ कांबळे विपुल गणेश (अपक्ष), प्रभाग ८ ब सातारकर संगीता राजू (अपक्ष), प्रभाग ९ ब भराटे हरिबा निवृत्ती (अपक्ष), प्रभाग ९ ब धायगुडे विजय निवृत्ती (अपक्ष), प्रभाग १० अ गोरे लता प्रभाकर अशा वीस उमेदवारांनी माघार घेतली आहे.

**एकपेक्षा अधिक अर्ज असल्याने असणार उमेदवार**

नगरसेवक पदासाठी २० उमेदवारांनी माघार घेतली असली तरी यातील गव्हाणे अक्षय दत्तात्रय, पवार लक्ष्मण सुर्यकांत, देवकाते सोमनाथ चंद्रकांत या उमेदवारांचे अन्य अर्ज मंजूर आहेत.